# प्रकरण चार

## ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

**4.235 अनुक्रमांक 1 ते 18 बोअरवेल मारणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)**

**पंचायत समिती वाडा, जिल्हा पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रुपये 8,34,030/- खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बोअरवेलच्या कामासाठी एकूण रुपये 8,34,030/- खर्च केला आहे. यासाठी ई-टेंडरींगचा व जाहिर निविदा प्रक्रीयेचा अवलंब न करता दरपत्रकांनी कामे केलेली आहेत व सर्व कामे एकाच मक्तेदाराने केलेली आहेत.

2) भूजल सर्वेक्षण विभाग यांच्याकडून ज्या जागेवर बोअरवेल मारली त्या जागेत पाणी लागल्याचा दाखला नस्ती सोबत उपलब्ध नाही. त्यामुळे बोअरवेल चालू स्थितीत आहे किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही.

3) सदरच्या बोअरवेल ग्रामपंचायतकडे हस्तांतरीत केल्याचे अभिलेखे नस्ती सोबत उपलब्ध नाही.

4) सदरच्या बोअरवेल चालू स्थितीत आहेत किंवा कसे याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र नस्ती सोबत उपलब्ध नाही.

5) बोअरवेल केल्याबद्दलचे छायचित्र नस्तीसोबत जोडले नाही.

**4.236 ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यामधील अनियमितता बाबत.**

**पंचायत समिती माणगांव, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत समिती माणगांव सन 2015-2016 अखेर पाणी पुरवठा विभागाकडील लेखा तपासणी केली असता अर्ध समास पत्र क्रमांक 2, दिनांक 28/07/2016 अन्वये सादर केलेल्या माहिती आधारे खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

माणगांव तालुक्यात एकूण 3 प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत असून त्यांची 31 मार्च अखेर थकित रक्कम पुढील प्रमाणे आहेत.

1) लोणेरे देवळी योजना- 36.43 लाख

2) वारक कुराडे योजना- 4.07 लाख

3) उणेगांव पळसगांव योजना-3.24 लाख

एकूण (एकंदर)- 43.74 लाख.

1) वरील योजनांची पाणी पट्टी वसूलीकरीता ठेकेदारांना दिलेली असून ठेकेदार स्वत: पावती पुस्तके छापून वसूली करत असून त्यावर उपविभागाचे नियंत्रण असणे पावती पुस्तके मोहोर बंद करून घेणे आवश्यक असतांना तसे न केल्याने किती पावती बुके वापरली व त्यांची रक्कम वसूली भरणा प्राप्त होत असल्याची खात्री करता येत नाही.

2) योजनांची पाणीपट्टी वसूलीचे ठेकेदारांना काम दिल्याने एकूण मागणी रूपये 65,51,000/- असून पैकी रूपये 43,74,000/-रक्कम वसूल झाल्याचे उपलब्ध अभिलेख्यांवरून दिसून येते. म्हणजेच रूपये 21,77,000/- इतकी रक्कम थकित आहे. ठेकेदारांची 100 टक्के वसूलीची जबाबदारी असतांना नियमानुसार उचित कार्यवाही झाली नाही.

3) पाणीपट्टी योजनांची मागणी नोंदवही व वसूली नोंदवही तपासणीस उपलब्ध झालेली नाही. त्यामूळे मागणी व वसूलीची नमुद रक्कम बरोबर असल्याची लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

4) उपरोक्त तीनही पाणी पुरवठा योजनांत एकूण खाजगी नळ कनेक्शन किती पैकी किती कनेक्शन बंद आहेत. तसेच सार्वजनिक नळ संख्या व वसूली यांची संख्या पैकी सद्यस्थितीत किती चालू आहेत व किती कनेक्शन बंद आहेत. याबाबत कोणतीही अभिलेखे लेखा परिक्षणास प्राप्त न झालेने नमुद वसूली व थकबाकीची रक्कम बरोबर असल्याची लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही. नियमबाहयते बाबत सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत खुलासा करून पाणी पुरवठा योजनेसंबंधीची सर्व अभिलेखे अदयावत करून पुर्तता दाखववावी.

**4.237 विहीर अधिग्रहण खर्चाबाबत.**

**पंचायत समिती कळवण, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 26) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, कळवणचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात लेखाशीर्ष 2245 नैसर्गिक आपत्ती अंतर्गत विहीर अधिग्रहणाकरिता रक्कम रुपये 3,93,600/- खर्च नोंदविला असून सदर खर्च रक्कमेबाबत संबधीतांना वेळोवेळी अनुषंगिक लेखे, अभिलेखे व नोंदवह्या उपलब्ध करणे करीता अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 08/10/2016 व 15, दिनांक 27/10/2016 अन्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करण्यात आले नव्हते. परंतु, दरम्यानच्या काळात उपलब्ध केलेल्या लेखे व अभिलेख्यांच्या पडताळणी अंती खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

प्रमाणक क्रमांक 7 दिनांक 31/08/2015 मध्ये समाविष्ट श्री. शिवाजी लक्ष्मण चौधरी रा.देवळी कराड तालुका कळवण यांना 01/06/2015 ते 20/07/2015 या कालावधी करिता प्रतिदिन रुपये 400/- प्रमाणे रक्कम रुपये 20,000/- विहीर अधिग्रहनाकरीता अदा केलेली आहे.

श्री. चौधरी यांच्या उपलब्ध केलेल्या विहीर अधिग्रहण प्रस्तावाची पडताळणी केली असता सदर प्रस्तावासोबत जोडलेल्या गट क्रमांक 7 च्या 7/12 उताऱ्यावर विहीर अथवा बोअर असलेबाबत नोंद नाही.

7/12 उताऱ्यावर विहीर अथवा बोअर नोंद नसल्याने पाणी स्त्रोत उपलब्ध असल्याची खात्री लेखापरीक्षणात करता येत नाही. तरी सदर विहीर अधिग्रहण योग्य असलेबाबत लेखापरीक्षणास अभिलेखासह खात्री पटवावी. अन्यथा प्रदान रक्कम रुपये 20,000/- संबंधितांकडून वसुल करण्यात यावी.

**4.238 टंचाईग्रस्त भागात टँकरने पाणी पुरवठा योजनेतील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती येवला, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती येवला सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणामध्ये पाणीटंचाई निवारणार्थ टँकर वरील खर्च व विहीर अधिग्रहणावरील रक्कम रुपये 14,58,259/- खर्च यांचे लेखापरीक्षण केले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणी टंचाई काळात टँकरव्दारे पाणी पुरवठा करतांना जिल्हाधिकारी, यांनी खाजगी टँकर ठेकेदारांची नियुक्ती केलेनंतर तालुक्याला टँकर प्राप्त झाल्यानंतर कोणत्या गावाकरीता, कोणता टँकर, त्याचा क्रमांक, त्याची पाणी वहन टाकीची क्षमता इत्यादी आदेशात नमुद केलेले नसल्याने प्रत्यक्षात पंचायत समिती येवला गट विकास अधिकारी यांना किती टँकर, कोणत्या दिवशी प्राप्त झाले याबाबत लेखापरीक्षणात पडताळणीकामी प्राप्त झाले नाही.

2) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील परिपत्रक क्रमांक मंशा/कार्या-2/टंचाई/3/ 22862/6538/ 2008, दिनांक 17/04/2008 नुसार गटविकास अधिकारी/ तहसिलदार यांनी प्रत्येक महिन्यात सर्व टँकरग्रस्त गावांना भेटी देऊन तपासण्या कराव्यात अशा सूचना असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 मध्ये दिलेल्या सूचनांनुसार संबंधित गावासाठी मंजूर केलेला संबंधित क्रमांकाचा टँकर वेळच्या वेळी संबंधित गावामध्ये जाऊन त्याव्दारे मंजूर खेपांइतका पाणी पुरवठा नियमितपणे केल्या बाबत, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेल्या समिती मधील 2 महिला सदस्यांच्या स्वाक्ष-या वाहन रोजवहीत (लॉगबुकात) घेण्यात याव्यात, असे सुचित केलेले आहे. त्यामुळे संबंधित गावाला/तेथील रहिवासी यांना मंजूर खेपांइतके पाणी नियमितपणे मिळते किंवा नाही याबाबत खात्री होण्यासाठी पारदर्शकरित्या नोंदी ठेवणे गरजेचे आहे. तथापि सदर नोंदवहीमध्ये संबंधीत ग्रामपंचायत कर्मचारी /ग्रामसेवक/ सरंपच यांच्या स्वाक्ष-या दिसून आल्यात. ज्याअर्थी पाणी पुरवठा विहीत वेळी विहीत खेपांइतका प्राप्त झाल्याबाबत ग्रामस्थ किंवा 2 महिला सदस्यांच्या स्वाक्ष-या काही ठिकाणी घेण्यात आलेल्या असुन काही ठिकाणी त्या आढळून आलेल्या नाहीत, त्या अर्थी नियमितपणे विहीत वेळी विहीत खेपांइतका पाणीपुरवठा संबंधीत टँकरकडून झाला असे खात्रीपुर्वक म्हणता येत नाही.

4) पुरवठादाराने मागणी केलेल्या देयकांची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तसेच मागणी करण्यात आलेल्या देयकांपैकी प्रदान केलेल्या देयकांचा स्वतंत्र तपशिल ठेवलेला नाही. त्यामुळे मागील वित्तीय वर्ष सन 2014-2015 मधील अनुदाना अभावी प्रलंबित राहिलेली देयके व त्यांची रक्कम, चालू वित्तीय वर्षात पुरवठादाराने मागणी केलेली एकूण देयके संख्या व त्यांची रक्कम तसेच सन 2015-2016 मध्ये मागील व चालु यापैकी नेमक्या किती देयकांची किती रक्कम प्रदान केली व कोणत्या देयकांची किती रक्कम अद्यापी प्रदान करणे बाकी आहे याची तपासणी करता आली नाही.

कामकाजाची गुंतागुंत पहाता, कोणत्याही तपासणी पथकाला सुस्पष्टपणे व निश्चित अशी माहिती तात्काळ उपलब्ध होऊ शकेल यासाठी, कामकाजाच्या पारदर्शकतेसाठी अशी नोंदवही ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र अशा नोंदवही अभावी सदर लेखाशिर्षाखाली दिनांक 31/03/2016 अखेर करण्यात आलेला खर्च योग्य आहे व दुबार प्रदान झालेले नाही याची खात्री होऊ शकली नाही.

5) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्र.क्र.53/ पा.पु.14, दिनांक 30/04/2012 अन्वये जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर खाजगी टँकरची निविदा प्रकिया पार पाडतांना अटी व शर्ती नुसार पाणी पुरवठा टँकरवरील टाकीची पाणी वहन क्षमता आरटीओ मार्फत प्रमाणीत करुन घेतले बाबतचे आदेश नसल्याने लेखापरीक्षणात तपासणी कामी प्राप्त झाले नाहीत.

6) खाजगी टँकर यांच्या वापरातील धाव संख्या, प्रति किलोमीटर धाव मोजणे यंत्राव्दारे करुन सक्षम प्राधिकारी यांच्याकडून प्रमाणीत केल्याबाबतचे प्रमाणपत्र तपासणी कामी उपलब्ध झाली नाही.

7) पाणी टंचाई काळात प्राप्त झालेले पाणी टँकर वाहनाचे परिवहन विभागाकडील नोंदणीचे प्रमाणपत्रे (रजिस्ट्रेशन, आरसी बुक इत्यादी) लेखापरीक्षण तपासणी कामी उपलब्ध न झाल्याने टँकरचा कालावधी, कालबाहयता, त्याची स्थिती, किती वर्ष जुना आहे इत्यादीचा मेळ घेता आला नाही.

8) खाजगी टँकर मध्ये इंधन भरणे कामी पंचायत समितीने दिलेल्या पावत्या वापरल्याबाबतची साठा नोंदवहीतील क्रमांक, दिनांक व इतर तपशील तसेच टँकर करीता अधिकृत पावतीने विक्रेत्यांनी इंधन दिले व संबंधित टँकर धारकांने वापरले बाबतची पडताळणी करता आली नाही.

9) महाराष्ट्र शासन, शासन अधिसुचना व्हॅट/1505/सीआर/123/टॅक्शेसन01, दिनांक 01/04/2005 नुसार नोंदणीकृत असलेल्या मक्तेदाराकडून मुल्यवर्धीत कर 2 टक्के व नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदाराकडून विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई, विक्रीकर भवन, माझगाव, मुंबई दिनांक 04/04/2012 ची अधिसुचनानुसार अन्वये 5 टक्के विक्रीकर वसुल करणे आवश्यक आहे.

10) परिशिष्ट क्रमांक 6 नुसार 1 ते 5 वाहनांची लॉग बुकाशी पडताळणी केली असता देय किलोमीटर 55283 असतांना दिलेले किलोमीटर 57231 जादा किलोमीटर 1948 चे रुपये 24/- प्रति किलोमीटर प्रमाणे रुपये 46,752/- जादा प्रदान झालेले आहे. तरी सदर रक्कम संबंधिताकडुन वसुल करुन भरणा करावी.

**4.239 टंचाईग्रस्त भागात टँकरने पाणी पुरवठा योजना- शासकिय टँकरसाठी केलेल्या डिझेल खर्चाबाबत.**

**पंचायत समिती सिन्नर, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 33) -** पंचायत समिती सिन्नरचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणामध्ये पाणीटंचाई निवारणार्थ लावलेल्या 15 शासकीय टँकरसाठी डिझेल खरेदी करीता रुपये 1,59,02,030/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सदरचे टँकर हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पंचायत समिती सिन्नर यांना पुरविण्यात आलेले आहेत. अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 25/08/2016 अन्वये मागणी करुनही या सर्व 15 टँकरचे लॉगबुक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिले नाहीत. त्यामुळे या टँकरने कोणकोणत्या गावांना पाणीपुरवठा केला, किती कालावधीसाठी पाणी पुरवठा केला याची तपासणी करता आली नाही. सदर टँकरच्या डिझेलसाठी रुपये 1,59,02,030/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. तथापि, लेखापरीक्षणासाठी टँकरचे लॉगबुक उपलब्ध न केल्यामुळे प्रति टँकरसाठी झालेला डिझेलचा खर्च, व प्रतिलिटर डिझेलची सरासरी तपासणी करता आली नाही. 15 टँकरसाठी रुपये 1,59,02,030/- म्हणजेच एका टँकरसाठी सरसरी रुपये 10,60,135/- एवढा खर्च झालेला आहे. एकूण 150

दिवस पाणीपुरवठा केला असे गृहित धरले तर प्रतिदिन रुपये 7,068/- खर्च डिझेलसाठी (एकूण 141 लिटर डिझेल) केल्याचे दिसून येते. सदर शासकीय टँकर हे अतिशय जुने असल्यामुळे त्यांची प्रती लिटर डिझेलची सरासरी धावसंख्या 2.5 ते 2.7 कि.मी. असते. म्हणजेच प्रतिदिन सरासरी 365 कि.मी. टँकरने पाणी वाहतूक केल्याचे दिसून येते. शासकीय टँकर हे जूने असल्याने प्रतिदिन एवढया किलोमीटरची पाणी वाहतुक होणे शक्य नाही.

त्यामुळे डिझेलसाठी केलेला खर्च योग्य आहे किंवा कसे याबाबत संशय निर्माण होतो. मागील लेखापरीक्षण अहवाल सन 2014-2015 परिच्छेद क्रमांक 4 मध्ये पंचायत समितीकडील पाणीटंचाई शाखेने पाणीटंचाई खर्चाचे लेखे उपलब्ध केले नसल्याचे म्हटलेले आहे. सन 2014-2015 व 2015 -2016 या लागोपाठ दोन वर्षाचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न करणे ही गंभीर अनियमितता आहे. म्हणजेच संबंधितांनी संगनमत करुन मोठया प्रमाणावर डिझेलसाठी खर्च दर्शविल्याचे दिसून येते.

शासन निर्णय क्रमांक टंचाई 2014/प्र.क्र./पापु14, दिनांक 12/05/2014 अन्वये टँकरद्वारे पाणी पुरवठा करतांना जीपीएस प्रणालीव्दारे टँकर फेऱ्यांची नोंद होणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**4.240 टंचाईग्रस्त ग्रामीण भागात (नैसर्गिक आपत्ती 2245) टँकरने पाणीपुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती पाथर्डी, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 48) -** पंचायत समिती कडील सन 2015-2016 या वित्तीय वर्षात टंचाईग्रस्त गावांना- जामखेड तालुका वीट उत्पादकांची सहकारी मोटार वाहतूक संस्था, जामखेड यांनी पाणीपुरवठा केलेला आहे. प्रमाणक क्रमांक 187, दिनांक 29/02/2016 अन्वये रक्कम रुपये 37,14,565/- खर्च नोंदविणेत आलेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी यांनी ठरविलेला दराचा प्रस्ताव मूळ आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

2) गावातील लोकसंख्या ही जनगणेनुसार ठरविणे आवश्यक आहे. लोकसंख्या जनगणेनुसार असल्याचे प्रमाणित केलेले नाही.

3) खाजगी टँकरचे आर.सी.बुक उपलब्ध न झाल्याने पाण्याच्या टाकी क्षमते बाबत खात्री करता आली नाही.

4) स्पीडमीटरप्रमाणे प्रत्यक्ष उद्भव ते टंचाई गाव अंतर लॉगबुक उपलब्ध नसल्याने खात्री करता आली नाही.

5) पाण्याच्या खेपा टाकल्याबाबत शासन परिपत्रक दिनांक 08/12/2003 नुसार संबंधित ग्रामीण पाणी पुरवठा समितीच्या दोन महिला सदस्य सहया लॉगबुकात घेणे आवश्यक आहे.

6) गटविकास अधिकारी/तहसीलदार यांनी लॉगबुकाची अचानक तपासणी करून खेपा व प्रत्यक्ष अंतर तपासुन लॉगबुकावर तसे प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे.

7) महसुल यंत्रणेनी टँकरच्या किती खेपा टाकावयाच्या बाबत आदेश उपलब्ध झालेला नाही.

8) लॉगबुकात सर्व पानावर कार्यालयाची मुद्रा उमटवून पान क्रमांक नमुद करून व गटविकास अधिकारी यांचे नोंदवहीत प्रमाणपत्र तसे प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे.

9) अर्धसमास पत्र क्रमांक 17, दिनांक 25/07/2016 अन्वये सदर खर्चाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांचेकडील मुळ आदेश, प्रस्ताव तसेच अनुषंगीक कागदपत्रांची मागणी केली असता सदर अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाले नाहीत.

10) 5 प्रमाणकान्वये नोंदविणेत आलेल्या रक्कम रुपये 5,56,26,188/- खर्चाबाबत टँकरचे इतिहास नोंदवही, लॉगबुकातील गोषवारे, उदभव नोंदवही, तसेच संबंधीत अभिलेखे लेखापरीक्षणात उपलब्ध न केल्यामुळे झालेला खर्च अचूक झाल्याची तपासणी करता करता आली नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असुन याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

11) विहीर व पाणीपुरवठा उद्भव अधिग्रहणाबाबत विहित केलेली नमुना नोंदवही उपलब्ध झालेली नाही.

12) विहीर व पाणीपुरवठा उद्भव अधिग्रहण ठिकाणापासुन प्रत्यक्ष टंचाई अंतर उपअभियंता यांनी तपासूण प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

13) विहीर व पाणीपुरवठा उद्भव अधिग्रहण ठिकाणापासून प्रत्यक्ष टंचाई अंतर गटविकास अधिकारी / तहसीलदार यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

**4.241 पाणी टंचाई निवारणार्थ विहीर अधिग्रहण व टँकरने पाणीपुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती जुन्नर, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 67) -** पंचायत समिती जुन्नरचे लेखापरिक्षण 2015-2016 या कालावधी पाणी पुरवठा विभागाकडील टँकरने पाणी पुरवठा करणे प्रमाणके व नस्तीची तपासणी केली असता रक्कम रुपये 3,70,121/- खर्च नोंदविणेत आलेला असून लेखापरीक्षणात आढळुन आलेल्या उणिवांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सेवाकर अधिसुचना 2/94 एसटी दिनांक 28/06/1994 व अधिसुचना 47/2012 एसटी दिनांक 28/09/2012 अन्वये सेवा पुरवठा करणाऱ्या संस्थाच्या देयकावरील 70 टक्के रकमेवर 12.36 टक्के दराने सेवाकर वसुल करणे आवश्यक असताना सेवाकर कपात का केला नाही?

2) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्र.क्र.53/पापु-14, दिनांक 30/04/2012 या आदेशातील अट क्रमांक 2 अन्वये तसेच करारनाम्यातील अट क्रमांक 15 अन्वये वाहनाच्या क्षमतेबाबत सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल असे असताना खाजगी टँकर्स वरील टाकीची पाणी वाहन क्षमता आरटीओ मार्फत प्रमाणित करणे आवश्यक आहे. मात्र, प्रस्तूत प्रकरणी पाणी टंचाईसाठी वापरलेल्या खाजगी टँकर अजीत दादा सहकारी वाहतूक संस्था बारामती यांचेकडील 3 वाहनाचे पाणी वाहन क्षमता आरटीओ मार्फत प्रमाणित केलेले नाही.

3) टॅकरचे आरसीटीसी दप्तरी उपलब्ध नाही. त्यामुळे वापरणेत आलेले टँकर हे पाणी पुरवठा करण्यासाठीचे वाहन असलेबाबत खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्रक्रं.53/पापु-14 दिनांक 30/04/2012 या आदेशातील अट क्रं. 2 अन्वये खाजगी टँकर्स वरील टाकीची पाणी वाहन क्षमता आरटीओ मार्फत प्रमाणित केलेले नसताना प्रति टँकर 5000, 10000, 20000 (टन) क्षमतेचे गृहीत धरुन देयके काय आधारे अदा केली. त्याचप्रमाणे ज्या रोडवरुन टँकर्सने पाण्याची वाहतुक केली जाते, त्या रोडच्या वाहन क्षमतेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र घेणेत आले नाही. त्यामुळे योग्य प्रमाणामध्ये पाणी पुरवठा झालेची खात्री करता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1008/प्रक्रं.05/पापु-14, दिनांक 25/03/2008 मधील अट-2 विहीर मालकाशी कायदेशीर करार करण्यात यावे. मात्र याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. प्रस्तूत प्रकरणी विहीर अधिग्रहण केले त्या मालकाचे करारपत्र दप्तरी नाही.

6) उपजिल्हाधीकारी (रोहयो) आदेश क्रमांक टंचाई/कावि/1146/15, दिनांक 12/08/2015 अन्वये पाणी पुरवठा करणा-या टँकर वर जीपीएस प्रणाली बसविणे आवश्यक आसुन त्या नुसार फे-यांची नोंद घेऊन सदर प्रणालीवर नोंद होईल अशाच फे-या अनुज्ञेय होतील. तसेच या प्रणालीशिवाय आदायगी झालेल्या देयकास गट विकास अधिकारी यांना व्यक्तिशा जबाबदार धरण्यात येईल, असे असताना सन 2015-2016 मध्ये जीपीएस यंत्रणा अहवाल सादर न केल्याने टँकर फे-या नुसारच देयके अदा केले बाबतची खात्री पटत नाही.

7) अटी व शर्ती नुसार खाजगी टँकरचे लॉगबुक, खेपाबाबत ग्रामसेवक, महिला सदस्य, यांचे टँकर पुरवठा केल्याचे खेपेंची स्वाक्षरी असलेली पोहोच गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित करुन देयकासोबत जोडणे आवश्यक असताना गट विकास अधिकारी यांनी सदर पोहोच प्रमाणित केलेली नाही.

8) पाणीपुरवठा टंचाई गावातील रस्तेच्या अंतराचे प्रमाणपत्र उप अभियंता बांधकाम विभाग (इवद) आंबेगाव यांचे घेतलेले आहे. सदर बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सक्षम प्राधिकारी यांचे रस्त्याच्या अंतरा बाबतचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असताना तसे केलेले नाही.

9) सदर योजनेवरील शिल्लक अनुदान रक्कम रुपये 1,29,879/- शासन सदरी भरणा केल्याची पुर्तता दर्शवावी.

**4.242 टंचाई निवारणा अंतर्गत टँकर भाडे खर्चाबाबत.**

**पंचायत समिती माण दहिवडी, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदर बाबत 6 प्रमाणकांन्वये रक्कम रूपये 52,38,078/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आर.सी. बुकनुसार ठरवून दिलेल्या क्षमतेपेक्षा जादा क्षमतेने 8 वाहनांनी पाणी पुरवठा केलेला आहे. आरसी बुकमध्ये नमूद केलेल्या क्षमतेपेक्षा जादा क्षमतेने ठेकेदारांस रक्कम आदा केली असल्याने अतिप्रदान झालेले आहे. टँकर सुरु केलेल्या दिनांकापासून क्षमतेपेक्षा जादा अदा झालेली रक्कम परिगणित करुन संबंधीतांकडून वसुल करुन शासन निधीत भरणा करावी.

2) 5 वाहनांनी प्रांताधिकाऱ्यांची प्रतिदिन मंजूर केलेल्या खेपांपेक्षा जास्त खेपा केलेल्या आहेत.

3) 4 वाहनांनी प्रांताधिकारी यांनी मंजूर केलेल्या खेपांपेक्षा कमी खेपा केल्या आहेत.

निविदेतील मंजूर दरानुसार प्रतिदिन प्रतिटन भाडे ठरलेले असल्याने मंजूर खेपांनुसार खेपा करणे आवश्यक होते. तथापि, मंजूर खेपांपेक्षा कमी खेपा करुनही प्रतिदिन देय भाडे संबंधीतांना दिले असल्याने रक्कम रुपये 13,293/- जादा अदा झाले आहेत. सदर रक्कम संबंधीतांकडून वसुल करावी.

4) वाहन क्रमांक 1) एम 12 सी.टी. 8052, 2) एम.एच.04 बी.जी. 9937, 3) एम.एच.12 सी.टी. 1524, 4) एम.ए.डब्ल्यु. 4636, 5) एम.एच. 23 डब्ल्यु 6786, 6) एम.एच.04 ए. 577, 7) एम.एच. 122 9501, 8) एम.एच.11 बी.एल. 5994, 9) एम.एच.06 के. 4231 या टेंडरनी आदेशाने नेमून दिलेल्या आर.सी. बुक नस्तीसोबत उपलबध नसलेने वाहनांची वाहतुक क्षमता तपासता आली नाही.

5) फिडींग पॉईंटवरील फिडींग रजिस्टर लेखापरीक्षणास उपलबध न झालेने फिडींग पॉईंटवर पाणी भरलेले टँकर कोणत्यावेळी व किती लिटर क्षमतेने भरले यांची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे फिडींग पॉईंटवरील नोंदी व संबंधीत वाहनांच्या लॉगबुकातील नोंदी यांचा ताळमेळ घेता आला नाही.

6) करारनाम्यातील अटी/शर्ती क्रमांक 28 नुसार सरकारमान्य अंतर बांधकाम खात्याकडून आलेवरच वाहतुक बिलाची सर्व रक्कम आदा केली जाईल असे नमूद आहे. तथापि, पंचायत समितीने त्याप्रमाणे कार्यवाही न करता अंतराचे दाखले प्राप्त होण्यापूर्वी ठेकेदारास कमी रकमा आदा केल्या आहेत.

**4.243 खाजगी टँकरद्वारे वाहतूक भाडे अदाईबाबत.**

**पंचायत समिती खटाव वडूज, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** खाजगी टँकर वाहतुक भाडे अदाईपोटी 4 प्रमाणकांन्वये रक्कम रूपये 33,09,322/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वाहन क्रमांक एम.एच.12 क्यू.ए. 9036 या वाहनास उपविभागीय अधिकारी, दहिवडी यांचे क्रमांक टंचाई/कावि/1125/2015 दिनांक 13/05/2015 मधील अनुक्रमांक 3 अन्वये धोंडेवाडी गावासाठी प्रतिदिन 2 खेपा कान्हरवाडी नळ पाणी पुरवठा योजना येथून भरण्यास मंजूरी दिली आहे. गटविकास अधिकारी पंचायत समिती खटाव यांचे पत्र क्रमांक पंसख/टंचाई/कावि/138/2015 दिनांक 27/05/2015 अन्वये याऐवजी आगासवाडी, धोंडेवाडी करीता खातवळ पाणी पुरवठा योजना येथून टँकर भरणेस परवानगी मागितली. तथापि उपविभागीय अधिकारी, दहिवडी यांचे दुरुस्ती आदेश क्रमांक टंचाई/कावि1134/2015, दिनांक 25/05/2015 अन्वये अनुक्रमांक 3 नुसार फक्त धोंडेवाडी या गावास प्रतिदिन 2 खेपा कान्हरवाडी नळ पाणी पुरवठा योजना येथून भरणेस परवानगी दिली. त्यामुळे आगासवाडी, तालुका माण येथे दिनांक 01/05/2015 ते दिनांक 26/05/2015 असे एकूण 26 दिवस प्रति दिन 60 कि.मी. प्रमाणे 780 कि.मी. (कान्हरवाडी ते आगासवाडी), तसेच दिनांक 27, 28, 29, 30 व दिनांक 31/5/2015 प्रतिदिन 60 कि.मी. प्रमाणे 300 कि.मी. असे एकूण 1080 कि.मी.साठी कान्हरवाडी ते आगासवाडी मंजूर किमी भाडे प्रति मे. टन रुपये 1.69 व देय कि.मी. भाडे 12.547 मे. टन प्रति कि.मी.प्रमाणे रक्कम रुपये 22,900.78/- एवढे प्रदान मंजूर मार्गाशिवाय व टँकर भरणा ठिकाण बनपुरी हे उपविभागीय अधिकारी यांची मंजूरीशिवाय केले असल्याने मान्य करता येत नाही.

2) उपरोक्त एम.एच.11 एम. 6496 या वाहनाचे लॉगबुक पाहता आगासवाडी येथे पाणी पुरवठा केल्याबाबत, सरपंच व ग्रामविकास अधिकारी कुकुडवाड, ता. माण यांनी वाहन फेऱ्या साक्षांकित केल्या आहेत. यावरुन सदरचे ठिकाण माण तालुक्यात येते. उपविभगीय अधिकारी, माण-खटाव यांचे आदेश क्रमांक टंचाई/कावि/814/2015 दिनांक 30/03/2015 अन्वये या गावास पाणी पुरवठा करणेसाठी यादवेंद्र दिलीप शर्मा (राघवेंद्र रोडलाईन्स) यांचा ठेका 2014-2015 मध्ये मंजूर आहे. सन 2015-2016 मध्ये याचा मक्ता अल्ताफ नुरमहम्मद तांबोळी यांना मंजूर आहे. त्यांचेव्दारे पुरवठा करावयाच्या गावात याचा समावेश असल्याचे आढळले नाही. टंचाईग्रस्त गांव जाहीर करण्याच्या यादीमध्ये महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम 2009 चे कलम 25 खालील अधिकारानुसार मा. जिल्हाधिकारी सातारा यांनी सदरचे गांव टंचाईग्रस्त केल्याबाबत मंजूरी आदेश नस्तीसोबत आढळले नाही. तसेच मा. जिल्हाधिकारी यांचे टँकर पुरवठा मंजूरीचे आदेश क्रमांक रोहयो/पाणी टंचाई/कावि/197/15 दिनांक 11/02/2015 या आदेशान्वये मंजूर गावांमध्ये सदर गावाचा समावेश नाही. सन 2014-2015 मध्ये मंजूर गावास सन 2015-2016 मध्ये पुरवठा सुरु ठेवल्याबाबत प्राधिकार नमूद करावा. अन्यथा, मंजूरीशिवाय केलेल्या पुरवठयाचे प्रदान वसूल करणेची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3) जिल्हाधिकारी, सातारा यांचे आदेश क्रमांक राहयो/पाणी टंचाई/कावि/197/15, दिनांक 11/05/2015 अन्वये टंचाईग्रस्त गावातील बाधीत लोकसंख्या व प्रतिदिन मंजूर सेवा यानुसार अनुक्रमांक 4 अन्वये डिस्कळ अंतर्गत बाधीत 325 लोकसंख्येसाठी प्रतिमाणसी 20 लिटर प्रमाणे 1 टँकरद्वारे 1 दिवासाआड पाणी पुरवठा करण्यास मंजूरी दिली आहे. तथापि, या गावासाठी मंजूर टँकर क्रमांक एम.एच.11 एम. 6496 चे लॉगबुक पाहता दिनांक 15/05/2015 ते दिनांक 31/05/2015 व दिनांक 01/06/2015 ते दिनांक 25/06/2015 अखेर प्रतिदिन पाणी पुरवठा केला आहे. मंजूरीपेक्षा जादा पाणी पुरवठा केल्याचे नोंदविले असल्याने त्यांना यासाठी एका आड एका दिवसाची 15 कि.मी. धावप्रमाणे 9+13 = 22 दिवस रुपये 1.69 प्रति कि.मी. प्रमाणे व 3.91 प्रति मे. टन प्रमाणे व 330 कि.मी. धावेसाठी जादा आदाई रुपये 7758.16 मान्य करता येत नाही.

4) उपरोक्त प्रमाणकाव्दारे खर्च पाणी पुरवठा टँकरच्या वाहन क्षमतेबाबतची प्रमाणपत्रे व इतर अंतर याबाबत काही वाहनांची प्रमाणपत्रे नस्तीसोबत आढळली आहेत. त्याबाबत अवलोकन केले असता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सातारा यांचे जा.क्र. भांडार/11032/सन 2015, दिनांक 08/12/2015 अन्वये वहन क्षमता असतांना त्याऐवजी 15 मे. टन व 16 मे. टन वहन क्षमता नोंदवून प्रदान केले आहे. त्यामुळे रक्कम रूपये 26,802.67/- जादा प्रदान झाले आहे.

तीन वाहनांची वहन क्षमता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सातारा पत्र क्रमांक भांडार/10594/सन2015, दिनांक 23/11/2015 अन्वये प्रमाणित केलेली क्षमता त्यापेक्षा जादा वहन क्षमता दर्शवून जादा रक्कम रूपये 1,04,697.51/- प्रदान केले आहे.

वाहनांची वहन क्षमता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग सातारा यांनी तांत्रिकदृष्टया प्रमाणित केली असतांना त्यापेक्षा जास्त वहनक्षमता दर्शवून केलेले प्रदान हे जादा झाल्याने मान्य करता येत नाही.

5) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांचे उपरोक्त दिनांक 08/12/2015 चे पत्रातील उपपरिच्छेदानुसार वाहन क्रमांक 1) एम. एच. 11 ए.एल. 1213, 2) एम.एच.04 9200, 3) एम.एच.12 क्यु.ए. 5366 हे तीन टँकर तपासणीसाठी उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे त्यांची वहन क्षमता काढता आली नाही. असे नमूद आहे. याबाबत पुढील कार्यवाहीबाबत कागदपत्रे नस्तीसोबत आढळली नाहीत. सदर वाहनांबाबत वहन क्षमतेनुसार प्रदान केल्याबाबत पुर्तता आवश्यक आहे.

6) वाहनांच्या भाडे प्रदानाच्या देयकाबाबत प्राप्त मंजूर व प्रदान अशी नोंदवही ठेवली नाही. उपरोक्त प्रमाणक क्रमांक 81 अन्वये रक्कम रुपये 15,86,948/- राघवेंद्र रोडलाईन्स यांना सन 2014-2015 मधील प्रदान केले आहे. सन 2014-2015 मध्ये सदरच्या प्रमाणकामधील काही देयकांचे पूर्णत: अथवा अंशत: प्रदान झाले नसल्याबाबत कोणतीही नोंद नाही. याबाबत खुलाशासह पुर्तता आवश्यक आहे. उपरोक्त प्रमाणकामधील उपप्रमाणक क्रमांक 1 ते 10 अन्वये केले प्रदान हे दिनांक 01/08/2014 ते दिनांक28/08/2014 या दरम्यानचे आहे. सदरचे प्रदान 1 वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित असल्याने ते प्रदान करण्यापूर्वी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती

लेखा संहिता 1968 मधील नियम 44 खालील टिपनुसार योग्य कारण नमूद न करता प्रदान केले आहे. सबब सदरचे प्रदान रक्कम रुपये 14,13,629/- नियमबाहय झाले आहे.

**4.244 टंचाई कालावधीतील टँकरद्वारे पाणीपुरवठा देयकातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती महाबळेश्वर, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** प्रमाणक क्रमांक 27, दिनांक 12/06/2015 रुपये 2,20,164/- (हस्तांतरण निधी) अन्वये माहे मे, 2014 ते जुलै, 2014 या टंचाई कालावधीत टँकरव्दारे गावांना केलेल्या पाणीपुरवठयाची देयके मक्तेदार अल्ताफ तांबोळी यांना अदा करण्यात आलेली असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी यांचेकडील मंजूर करारनाम्यानुसार 1 मेट्रीक टनासाठी प्रतिदिन 149/- रुपये भाडे तसेच रुपये 1.88 प्रती कि.मी. या दराने भाडे निश्चित करण्यात आलेले आहे. तथापि मक्तेदारने एकूण 5 वाहनांव्दारे पाणीपुरवठा केलेला असून ते किती क्षमतेचे आहेत याबाबत वाहन नोंदणी प्रमाणपत्र सादर न केलेने याबाबतची खात्री करता आलेली नाही. नोंदणी प्रमाणपत्रा आधारे देयकातून अदा रक्कम योग्य असलेबाबतची पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

2) माहे मे व जून, 2014 मधील देयकासोबतच्या तहसिलदारांचे आदेशानुसार कुरोशी, भिमनगर, वेळापूर हया गावांना प्रतीदिन एक खेप करावयाची असून दिनांक 24/05/2014, 29/05/2014, 31/05/2014, 02/06/2014, 13/06/2014, 21/06/2014 हया तारखांना मक्तेदाराने कोणत्याही खेपा केल्याचे दिसून येत नाही. खेपा न केल्याने संबंधीतावर दंडात्म्क कारवाई करणे आवश्यक असताना तशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

3) माहे मे, 2014 मधील वाहन क्रमांक एम एच 17 के 5601 व्दारे नेमून दिलेल्या गावांना प्रतिदिन दीड खेप याप्रमाणे खेपा केलेल्या आहेत. तथापि दीड खेपा करणेसंबंधी तहसिलदारांचे आदेश लेखापरीक्षणास पहावयास मिळाले नाहीत. प्रत्यक्षात दीड खेपा मक्तेदाराने कशा केल्या याबाबत साशंकता असून आर्धा टँकर पुरविणे किंवा आर्धा टँकर परत नेऊन दुसऱ्या दिवशी पुरविणे ही बाब अव्यवहार्य असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

4) करारनाम्यातील अटीनुसार उपअभियंता यांनी फिडींग पॉईंट ते गाव यामधील अंतर प्रमाणित करावयाचे आहे. तथापि, फिडींग पॉईंट ते कुरोशी यामधील अंतर 30 कि.मी. निश्चित असताना देयकांमध्ये 44 कि.मी. दर्शविलेने देयकातून अतिप्रदान होत आहे. तथापि वाहनांची क्षमता प्रमाणपत्रे नसल्याने याबाबतची अचूक अतिप्रदान रक्कम लेखापरीक्षणास काढता आलेली नाही.

**4.245 निजामपूर येथे दलित वस्तीत पाण्याचे पाईप टाकणे. (अस्तित्वातील पाईपलाईन ते सुखदेव चंदनशिवे यांचे घरापर्यत)**

**पंचायत समिती सांगोला, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर बाबत रक्कम रुपये 90,803/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भारत सरकार, आयकर आयुक्त कार्यालय, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक PN/T/PRO/85-86, दिनांक 10/04/1985 मधील अट क्रमांक 3 प्रमाणे आयकर अधिनियम 1961 मधील क्रमांक 194 (2) अन्वये कोणत्याही कंत्राटसाठी कोणत्याही कंत्राटदाराकडून ( ग्रामपंचायत किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या समावेशासहित ) आयकर कपात करणे आवश्यक आहे असे नमुद केलेले आहे. तथापी सदर आयकर कपात करावयाचा नसेल तर कलम 194(क)(4) अन्वये संबंधित ग्रामपंचायत किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आयकर सुटी बाबतचे प्रमाणपत्र त्या कार्यक्षेत्रातील आयकर कार्यालयाकडून प्राप्त करणे गरजेचे आहे, असे सुध्दा नमुद केलेले आहे. त्यामुळे उपरोक्त कामात संबंधित ठेकेदाराने (ग्रा.प.) 2 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 1,816/- वसुल करणे आवश्यक आहे.

2) सदरचे कामावरील साहित्य वापरणेपूर्वी चाचणी अहवाल घेण्यात आलेले नाहीत. त्यांमुळे सदरचे काम दर्जेदार झालेबाबत लेखापरीक्षणास खात्री करता येत नाही.

3) सदर कामाचे बाबतीत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 मधील नियम 68 व 197 नुसार बांधकाम पुर्ण झालेल्या कामांची नोंद नमुना नंबर 40 मध्ये व बांधकामाच्या तपशीलासह खर्चाची नोंद नमुना नंबर 69 मध्ये घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

**4.246 पाणीपुरवठा टँकरबाबत.**

**पंचायत समिती माळशिरस, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 15,15,230/- खर्च करण्यात आला आहे. मोटार वाहतूक संस्था मर्या. माढा व जिल्हाधिकारी, सोलापूर या मध्ये दिनांक 26/06/2013 रोजी दिनांक 01/07/2013 ते 30/09/2014 या कालावधीसाठी करारनामा करण्यात आला होता. सदर करारनाम्याच्या आधारे पंचायत समिती करमाळा यांनी श्री. बबनराव शिदें सह, मोटार वाहतूक संस्था मर्या. माढा यांचेकडील पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या गावी / वाडी वस्त्यावर पाणीपुरवठा करणेकामी ठरलेल्या म्हणजेच 12000 लिटर क्षमता असलेल्या टँकरसाठी प्रतिदिन रक्कम रुपये 1,344/- व प्रति किलोमीटर रक्कम रुपये 16.80 या दराने पाणीपुरवठा करावयाचा होता. सदर करारनाम्या प्रमाणे एकूण 47 अटी व शर्तीची पूर्तता ठेकेदाराने करणे आवश्यक होते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारपत्रातील अट क्रमांक 15 अ नुसार मान्य खेपापेक्षा कमी खेपा केल्यास त्याबाबत प्रत्येक खेपासाठी रुपये 2,000/- इतका दंड करणे आवश्यक आहे. तथापि खालील तारखांना ठेकेदाराने मान्य खेपापेक्षा कमी खेपा केल्या आहेत. तथापि त्याबाबतचा दंड वसूल करण्यात आलेला नाही. कमी खेपा केल्याने टँकर भाडे अदाईपोटी झालेले अतिप्रदान रुपये 96,000/- सबंधिताकडून वसुल करुन शासन निधीत भरणा करावी.

2) उपविभागीय अधिकारी, माळशिरस विभाग, अकलुज यांचे आदेश क्रमांक कार्या-2/रोहयो/पाणी टंचाई/ टं.मं/एसआर/03/24, दिनांक 26/05/2014 अन्वये 24,000 लिटर क्षमतेचा MH-04/CG-60402 टँकर मंजूर केला आहे. पंचायत समितीने मंजूर केलेला 24000 लि. क्षमतेच्या टँकरसाठी पाणी भरण्याचे ठिकाणा पासूनचा रस्ता ते बचेरी गावातील रस्ता हा सक्षम असलेबाबत काय आधारे मान्य केले याचा खुलासा करावा.

3) ठेकेदाराने टँकरच्या क्षमतेबाबत राज्य परिवहन विभागाकडील टँकरच्या क्षमतेच्या प्रती, टँकरचे आरसी बुक इत्यादी आवश्यक अभिलेखे पंचायत समितीने सादर केलेल्या नाहीत.

4) पाणीपुरवठयासाठी अधिग्रहीत केलेली विहीर यास जिवंत पाणी असून साठा करारनामानुसार पुरेसा आहे यांची खात्री करणे आवश्यक होते. तथापि तशी कार्यवाही झालेली नाही.

**4.247 क्षमतेपेक्षा जादा दराने इंधन भाडे प्रदान करणेबाबत (राज्य)**

**पंचायत समिती मलकापूर, जिल्हा बुलढाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रुपये 97,341/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

देयकाची पडताळणी केली असता वाहन क्रमांक MH-21-5328 ने दिनांक 30/04/2014 ते 06/03/2015 पर्यंत पाणी पुरवठा केला असुन वरीलप्रमाणे श्री.रमेशकुमार मनियार यांना रकमेचे प्रदान करण्यात आले. उपविभागीय अधिकारी, जिवन प्राधिकरण बुलढाणा जावक क्रमांक 48, दिनांक 11/02/2015 नुसार वाहन क्षमता 12 मेटन असल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले. देयकामध्ये 4247 कि.मी. करीता 1.91 प्रति कि.मी. दराने 12 क्षमतेच्या टँकरकरीता रुपये 97,341/- प्रदान करणे आवश्यक असतांना 24 मेटन क्षमतेच्या दराने आकारणी करुन रुपये 1,94,682/- चे प्रदान करण्यात आले. त्यामुळे रुपये 97,341/- चे जादा प्रदान झाले. वाहनाने दिनांक 30/04/2014 ते 06/03/2015 पर्यंत पाणी पुरवठा केला असुन यापुर्वी सुध्दा सदर दराने आकारणी केल्याची शक्यता नाकारता येत नाही. याआधी जादा प्रदान झाले नसल्याची खात्री पटवावी. तसेच वाहन क्षमतेचे प्रमाणपत्र उशिराने घेणेबाबत खुलासा करण्यात यावा.

**4.248 वाहन क्रमांक MH-04 H-4102 ने एकाच कालावधीमध्ये पंचायत समिती मोताळा व पंचायत समिती बुलढाणा अंतर्गत पाणीपुरवठा केल्याचे दर्शवुन झालेल्या टँकर भाडे प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती मोताळा, जिल्हा बुलढाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,10,531/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती मोताळा अंतर्गत क्रमांक- MH-04 H-4102 लॉगबुकातील नोंदीनुसार वाहनाने मिटकरी ते उऱ्हा 10 कि.मी. प्रतिदिन 3 ट्रीपा दिनांक 02/02/2013 ते 31/07/2013 पर्यंत पाणी पुरवठा केल्याबाबत सरपंच व सचिव, ग्रामपंचायत उऱ्हा यांनी तसेच 2 महिला यांच्या दररोज पाणी पुरवठा केला बाबत स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

2) पंचायत समिती बुलढाणा अंतर्गत सुध्दा वाहन क्रमांक- MH-04 H-4102 चे लॉगबुकातील नोंदीनुसार करडी ते कोरखेड 12 कि.मी. प्रतिदिन 3 ट्रीपा दिनांक 16/05/2013 ते 30/06/2013 पर्यंत पाणी पुरवठा केल्याबाबत सरपंच व सचिव ग्रामपंचायत धाड यांनी तसेच 2 महिलांच्या दररोज पाणी पुरवठा केल्याबाबत स्वाक्षऱ्या असुन रकमेचे प्रदान करण्यात आले. अहवाला सोबत प्रदान रक्कमेची प्रत तसेच वाहनाचे लॉगबुकाची झेरॉक्स प्रत जोडण्यात आली आहे.

एकाच वाहनाने दिनांक 16/05/2013 ते 30/06/2013 या कालावधीमध्ये दोन्ही पंचायत समिती अंतर्गत पाणी पुरवठा केल्याबाबत सशंय असुन बनावट नोंदी घेवुन भाडयाची रक्कम प्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. पंचायत समिती बुलढाणा अंतर्गत सदर वाहनाकरीता 16/05/2013 ते 30/06/2013 पर्यंत रक्कम प्रदान केली असतांना त्याच कालावधीमध्ये पंचायत समिती मोताळा अंतर्गत पाणी पुरवठा केल्याचे बनावट नोंदी दर्शवुन रकमेचे प्रदान करण्यात आले. तरी याबाबत संबंधीत पाणी पुरवठा करणे बाबतचे नोंदीची व रक्कम प्रदान करण्यात आल्याची चौकशी करुन संबंधीतावर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. अशाप्रकारे सदर वाहन व इतर वाहनाने पाणी पुरवठा न करताच बनावट बिले सादर करुन रक्कमेचा अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**4.249 पाणी टंचाई अंतर्गत पाणी पुरवठा केला नसतांना रक्कम प्रदान करणेबाबत.**

**पंचायत समिती सिंदखेड राजा, जिल्हा बुलढाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,83,065/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तहसिलदार सिंदखेडराजा यांचे आदेश क्रमांक कावी/पाणीटं/486/2015/तहसिल कार्यालय सिंदखेडराजा दिनांक 16/05/2015 चे अटी व शर्ती क्रमांक 18 नुसार पाणी टँकर नादुरुस्त असल्यास व पाणी पुरवठा केला नसतांना तेवढया दिवसाचे भाडे कमी करणे आवश्यक आहे. 16 दिवस पाणी टॅकर लॉगबुकात नोंदीप्रमाणे बंद आहे. पाणी पुरवठा केला नसतांना रक्कम रुपये 44,544/- प्रदान केली आहे.

2) तहसिलदार सिंदखेडराजा यांचे मलकापुर पांग्रा येथे प्रति दिवशी तीन खेपा टाकण्याचे आदेश आहेत. दिनांक 09/06/2015 ते 28/07/2015 या कालावधीत टँकर क्रमांक MH-28-5890 यांनी 35 दिवसात एकच खेप टाकल्याचे निदर्शनास आले आहे.

**4.250 ग्रामीण पाणी पुरवठा विहिर अधिग्रहण प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती गंगापूर, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,61,200/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-2012/प्र.क्र.53/पा.पु-14, दिनांक 30/04/2012 अन्वये खाजगी विहीर अधिग्रहीत केल्यानंतर विहीर मालकाने पाणी काढण्यासाठी विदयुत पंप/डिझेल पंप साधन सामुग्री उपलब्ध करुन दिली असल्यास दिनांक 01/05/2012 पासुन रुपये 400/- प्रतिदिन कमाल मर्यादेत मोबदला देण्यात यावा. तसेच साधनसामुग्री उपलब्ध करुन दिली नसल्यास प्रतीदिन रुपये 300/- प्रमाणे मोबदला देण्यात यावा. साधनसामुग्री उपलब्ध करुन दिली किंवा कसे याबाबत संचिकेत बोध होत नाही.

2) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1008/प्र.क्र.05/प्रा.पु-14, दिनांक 25/03/2008 मधील सुचना क्रमांक 5 नुसार विहीर अधिग्रहीत करतांना अधिनियमातील इतर तरतुदीचे

काटेकोर पालन करुन विहीर अधिग्रहण मोबदल्याची रक्कम दर तीन महिन्यानी वेळच्या वेळी संबधितांना प्रदान करावी. अश्या प्रकारच्या सुचना असतांनाही एक वर्षानंतर शेतक-यांना रक्कम विलंबाने का प्रदान करण्यात आलेली आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 44 (1) नुसार कोणत्याही देयकास एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्यास त्या देयकाचे प्रदान मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या मंजुरीशिवाय देता येणार नाही. असे नमुद असतांना एक वर्षापुर्वीच्या मागण्या मंजुर करण्यात आलेल्या आहेत.

**4.251 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकरने पाणीपुरवठा केलेल्या प्रदानातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती वैजापूर, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,86,06,209/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती वैजापूरचे सन 2015-16 चे लेखापरीक्षणात 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकर वाहतुक गुत्तेदार यांना एकुण रक्कम रुपये 4,86,06,209/- प्रदान केल्याचे दिसुन आले. जिल्हाधिकारी यांचे आदेश दिनांक 30/04/2014 नुसार दिनांक 01/05/2014 ते 30/04/2015 या कालावधीसाठी टँकर भाडे प्रतिदिन प्रति मे. टन रुपये 151 व रुपये 1.90 पैसे प्र.की.मी.प्र.मे.टन डिझेल खर्च तसेच जिल्हाधिकारी यांचे आदेश दिनांक 30/04/2015 नुसार दिनांक 01/05/2015 ते 30/04/2016 या कालावधीसाठी टँकर भाडे प्रतिदिन प्रति मे.टन रुपये 148 व रुपये 01.80 पैसे प्र.की.मी.प्र.मे.टन डिझेल खर्च असे दर निश्चित केले होते. त्याचप्रमाणे उपविभागीय अभियंता जिल्हा परिषद, उपविभाग वैजापूर यांनी त्यांचे प्रमाणपत्र दिनांक 31/05/2015 नुसार टँकरच्या खेपेचे अंतर प्रमाणित केले आहेत. लेखापरीक्षणाचे वेळी उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यांची तपासणी केली असता त्यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) उपरोक्त प्रदानाच्या संदर्भात सादर संचिकेची तपासणी केली असता सदरील टँकर्स 10,11 व 12000 लिटरचे असल्याचे दर्शवुन प्रदान केले आहे, तथापि सदरील खाजगी वाहनाचे आर.सी. बुक लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्यामुळे टँकर पाणी क्षमतेची खात्री करता आली नाही. याबाबत आर.सी.बुक / इतर अभिलेखे दर्शवुन खात्री पटवणे आवश्यक आहे. करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या टँकर्सला आर.टी.ओ.ची मान्यता असणे आवश्यक आहे.

2) लेखापरीक्षणात उक्त टँकर्सच्या लॉगबुकांची तपासणी केली असता त्यात गाडी निघाल्याची व पोहोचल्याची वेळ व किलोमीटर रिडींग नमुद न करता केवळ खेपांची संख्या नमुद करुन त्याप्रमाणे परिगणना करुन रक्कमा प्रदान केल्याचे आढळुन आले आहे. वाहनाचे स्पिडोमीटर चालु न ठेवता स्पिडोमीटर प्रमाणे अंतर दर्शविले नसुन गावाचे प्रमाणित अंतर नमुद केले आहे. सक्षम प्राधिकाऱ्याने अंतरे प्रमाणित केलेली नाहीत. प्रमाणक क्रमांक 493 व 494 माहे- 03/2016 रक्कम अनुक्रमे रुपये 3,62,365/- व 42,403/- अन्वये चिंचडगाव ते एकोडीसागज व डवाळा निर्मळ यांची विहीर ते सुदामवाडी येथे पाणीपुरवठा केल्याबाबत संबंधीतास रकमा अदा केल्या आहेत. तथापि उपरोक्त प्रकरणी दोन्ही गावांमधील अंतरे प्रमाणित केलेली दिसून आली नाहीत.

3) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई 1005/प्र.क्र.305/पापु/14, दिनांक 24/01/2006 नुसार टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या गावास प्रत्यक्षात पाणीपुरवठा होतो किंवा कसे हे पाहणे आवश्यक असल्याने संबंधीत गावाला टँकर उपलब्ध करून दिल्यानंतर वेळच्या वेळी टँकर पोहचला असल्याबाबत टँकर गावात पोहचल्याची तारीख व वेळ याची लॉगबुकमध्ये नोंद करणे आवश्यक आहे तसेच नियोजित खेपा होत आहेत किंवा नाही व प्रत्येक खेपेच्या वेळी त्या गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नियुक्त केलेल्या दोन महिला सदस्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे, तथापि अशी नियुक्तीबाबत अभिलेखे व काही प्रकरणी स्वाक्ष-या आढळुन आल्या नाहीत.

4) जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी उपरोक्त आदेशानुसार टँकर भाडे प्रतिदिन प्रति मे.टन व डिझेल / वंगण खर्च प्रति किलांमीटर प्रति मेट्रीक टन दर निश्चित केले असतांना देयके अदा करतांना टँकर भाडे प्रतिदिन प्रति

लिटर्स व डीझेल / वंगण खर्च प्रति किलोमीटर प्रति लिटर्स प्रमाणे अदा केली आहेत. लिटर्सचे मेट्रीक टनात रूपांतरण करून देयके अदा करणे आवश्यक होते.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 18 व नियम 25 नुसार "प्रदानार्थ मंजूर" आदेशावर व बिलावरील "पैसे देण्याबाबतचा आदेश" गटविकास अधिकारी यांच्याकडून संमत करण्यात आल्यावर रक्कम देण्याकरिता धनादेश काढण्यात येतील. तथापि आक्षेपात नमुद 5 प्रमाणकांचे प्रकरणी अशी कारवाई न करताच रकमा / धनादेश अदा करण्यात आलेले आहेत.

6) निवडक महिन्यातील एकूण 7 देयकांसोबत संलग्न केलेल्या लॉगबुकची पडताळणी केली असता विज कपात / नादुस्ती, टँकर नादुरुस्त व पावसामुळे टँकर बंद असल्याचे नमुद केले आहे. करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार विद्युत पुरवठा बंद असल्यास त्या दिवशीचे फक्त वाहनाचे भाडे अनुज्ञेय आहे. किलोमीटर प्रमाणे भाडे अनुज्ञेय नाही. तथापि किलोमीटर प्रमाणे भाडे अदा केल्याचे दिसून आले. त्यामुळे संबंधीतास रुपये 1,55,802/- जादा अदाई झाल्याचे दिसुन येते. जादा अदाईची रक्कम संबधिताकडून वसुल करणे आवश्यक आहे.

7) करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार टँकरची टाकी पुर्ण क्षमतेने भरुन नेवून योग्य पाणीपुरवठा केल्याबाबत तसेच केलेल्या एकूण फेऱ्याचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी तसेच गावातील सरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य किंवा ग्रामसेवक यांचेकडुन घेणे बंधनकारक आहे. तथापि बहुतांशी प्रकरणी असे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

8) करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार टँकर आतून-बाहेरुन स्वच्छ असणे व याबाबत स्वच्छता नोंदवही ठेवून तारीखवार नोंदवहीत नोंद घेणे आवश्यक असतांना अशी नोंदवही ठेवल्याचे दिसून आले नाही.

9) करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार सक्षम अधिकाऱ्याने मान्य केलेल्या उद्भवातून पाणी व सुचित केलेल्या गावांत पाणी शुध्द करून घेऊन टाकणे ठेकेदारास बंधनकारक असतांना पाणी शुध्द केलेबाबत नोंदी / अभिलेखे दिसून येत नाही.

**4.252 नैसर्गिक आपत्ती पाणीपुरवठा खाजगी टँकरवरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती पैठण, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,05,77,241/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती पैठणचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात नैसर्गिक आपत्ती खाजगी टँकरने पाणीपुरवठा केलेले निवड महिन्यातील खालील प्रमाणकांव्दारे खर्च करण्यात आलेला आहे.

1) प्रमाणक क्रमांक 09,01/2016 अन्वये हर्षी खु. येथे खाजगी टँकर क्रमांक एमएच-12-एफ-7359, दिनांक 18/07/2015 ते दिनांक 18/09/2015 या कालावधीत एकूण 68 दिवस पाणी पुरवठा केल्याबद्दल प्रतिदिन रुपये 1,776/- याप्रमाणे टँकरभाडे संबंधीतास प्रदान केले. तसेच लॉगबुक (उपरोक्त वाहनाचे) तपासणी केली असता उपरोक्त कालावधीत पाणी पुरवठा केल्याचे स्पष्ट झाले. मात्र दिनांक 18/07/2015 ते 18/09/2015 या कालावधीचे एकूण 63 दिवस (माहे जुलै-14 दिवस+ऑगस्ट-31 दिवस+सप्टेबर 18 दिवस=63 दिवस) होत असतांना 68 दिवसाचे प्रदान केले आहे. म्हणजेच 05 दिवसाचे टँकरभाडेपोटी जादा प्रदान झाले आहे. प्रतिदिन टँकरभाडे रुपये 1776 X 05 दिवस = रुपये 8,880/- संबंधीतास जादा प्रदान झाले आहे. रुपये 8,880/- संबंधीताकडून वसुल करून नियमाप्रमाणे शासन खाती भरणा करावे.

2) प्रमाणक क्रमांक 10,01/2016 अन्वये प्रमाणकान्वये कडेठाण खु. येथे टँकर क्रमांक- एमएच-12-एफ-8508 व्दारे पाणीपुरवठा केला आहे. सदर वाहनाचे लॉगबुक तपासले असता दिनांक 28/05/2015 रोजी वाहनाने ढोरकीन पॉईंट ते कडेठाण खु. असा 136 किलोमीटर धाव (2 खेपा, 68 किमी/खेप) ची लॉगबुकवर नोंद केली आहे. मात्र सदर लॉगबुकच्या लगतच्या पुढील पानावर पुन्हा दिनांक 28/05/2015 रोजीची ढोरकीन पॉईंट ते काडेठाण खु. एक खेप 68 किलोमीटर (जाणे-येणे) अशी नोंद घेतली आहे. म्हणजेच दिनांक 28/05/2015 च्या दोन नोंदी घेतल्याचे दिसुन येते. त्यामुळे दिनांक 28/05/2015 रोजीची दुसरी फेरीव्दारे प्रदान केलेली रक्कम वसुलपात्र ठरते प्रति किलोमीटर 24.60X68 किमी=1,469/- संबंधीताकडून वसुल करावे.

3) उपरोक्त प्रमाणकान्वये कडेठाण तांडा येथे टँक क्रमांक MWA 9716 व्दारे दिनांक 01/05/2015 ते 08/06/2015 एकूण 6414 किलोमीटर साठी रुपये 1,38,542/- रक्कम संबंधीतास प्रदान केली आहे. मात्र सदर वाहनाचे लॉगबुक तपसले असता लॉगबुकमध्ये उपरोक्त कालावधी एकूण 6262 किलोमीटर धाव केल्याची नोंद आहे. म्हणजेच एकूण 6262 किलोमीटर धावप्रमाणे अदायगी करण्याऐवजी 6414 किलोमीटर प्रमाणे अदायगी केली आहे. यावरून एकूण 152 किलोमीटरची जादा धाव दर्शवून जादा अदायगी केल्याचे लेखापरीक्षणात स्पष्ट झाले. प्रति किती रुपये 21.60X152 किलोमीटर = 3,283/- संबंधीतास जादा प्रदान केले आहे. जादा प्रदानाची रक्कम रुपये 3,283/- संबंधीताकडून वसुल करावे.

4) प्रमाणक क्रमांक 15,01/2016 अन्वये बन्नीतांडा दोरखेडा येथे टँकर क्रमांक एम एच-04-सी4495 व्दारे दिनांक 01/15/2015 ते दिनांक 14/06/2015 या कालावधीत पाणी पुरवठा केल्याबद्दल संबंधीतास अदायगी केली आहे. उपरोक्त वाहनाचे लॉगबुक तपासले असता दिनांक 13/06/2015 ते 14/06/2015 या दिवशी टँकर बंद केले असा शेरा लॉगबुकवर दिला आहे. तसेच या दिवशी पाणीपुरवठा केल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांची लॉगबुकवर स्वाक्षरी नाही. म्हणजेच दिनांक 13/06/2015 व दिनांक 14/06/2015 या दिवशी पाणीपुरवठा झालेला नसतांनाही सदर कालावधीची रक्कम प्रदान केली आहे.

जादा प्रदान रक्कम रुपये 3,552 + 1,166 = 4,718/- संबंधीताकडून वसुल करुन संबंधीत लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक आहे.

5) प्रमाणक क्रमांक 12,01/2016 अन्वये जांभळी येथे टँकर क्रमांक एमएच-12-आर ए-3475 व्दारे दिनांक 17/05/2015 ते 13/06/2015 (44 दिवस) या कालावधीत पाणीपुरवठा केल्याबददल रक्कम प्रदान केली आहे. मात्र दिनांक 17/05/2015 ते 13/06/2015 या कालावधीचे एकूण 28 दिवस होत असतांना देयकावर 44 दिवस दर्शवून त्याप्रमाणे अतिप्रदान केले आहे. देयकाप्रमाणे प्रतिदिन रुपये 1,776/- टँकर भाडे प्रमाणे 16 दिवसांचे एकूण रुपये 28,416/- चे अतिप्रदान झाले आहे. अतिप्रदानाची रक्कम रुपये 28,416/- संबंधीताकडून वसुल करुन संबंधीत लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक आहे.

6) प्रमाणक क्रमांक 243,03/2016 अन्वये पैठणखेडा येथे टँकर क्रमांक एम एच-19 जे-2740 व्दारे दिनांक 26/09/2015 ते 31/01/2016 या कालावधीत पाणी पुरवठा केल्याबद्दल एकूण 137 दिवसांचा कालावधी दर्शवून रक्कम प्रदान केली आहे. मात्र दिनांक 26/09/2015 ते दिनांक 31/01/2016 या कालावधीचे एकूण 128 दिवस होत असतांना देयकाप्रमाणे एकूण 137 दिवसांची अदायगी केली आहे. म्हणजेच एकूण 09 दिवसाची जादा अदाई केली आहे. प्रतिदिन प्रती मेट्रीक टन रुपये 148/- टँकर भाडे मंजूर असून देयकाप्रमाणे 12 मेट्रीक टन टँकरसाठी रक्कम रुपये 1,776/- प्रतिदिन टँकर भाडे अनुज्ञेय ठरते. तेव्हा रुपये 1776 X 9 दिवस = रुपये 15,984/- संबंधीतास जादा प्रदान झाले आहे. अतिप्रदान रुपये 15,984/- संबंधीताकडून वसुल करावे.

**4.253 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकरने पाणीपुरवठा केलेल्या प्रदानातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,05,06,300/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती सिल्लोडचे सन 2015-16 चे लेखापरीक्षणात 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकर वाहतुक गुत्तेदार यांना एकुण रक्कम रुपये 2,05,06,300/- प्रदान केल्याचे दिसुन आले. जिल्हाधिकारी यांचे आदेश दिनांक 30/04/2014 नुसार दिनांक 01/05/2014 ते 30/04/2015 या कालावधीसाठी टँकर भाडे प्रतिदिन प्रति मेट्रीक टन रुपये 151 व रुपये 01.90 पैसे प्र.की.मी.प्र.मे.टन डिझेल खर्च तसेच जिल्हाधिकारी यांचे आदेश दिनांक 30/04/2015 नुसार दिनांक 01/05/2015 ते 30/04/2016 या कालावधीसाठी टँकर भाडे प्रतिदिन प्रति मेट्रीक टन रुपये 148/- व रुपये 01.80 पैसे प्र.की.मी.प्र.मे.टन डीझेल खर्च असे दर निश्चित केले होते. त्याचप्रमाणे उपविभागीय अभियंता जिल्हा परिषद उपविभाग वैजापूर यांनी त्यांचे प्रमाणपत्र

दिनांक 31/05/2015 नुसार टँकरच्या खेपेचे अंतर प्रमाणित केले आहेत. लेखापरीक्षणाचे वेळी उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यांची तपासणी केली असता त्यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) सदर प्रकारे पाणीपुरवठा करण्यासाठी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी दिनांक 30/04/2014 व 30/04/2015 रोजी संबंधीत पुरवठादाराबरोबर करारनामा केला आहे. मंजुर दराची निविदा प्रक्रीया जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे स्तरावर झाली असल्यामुळे दर निविदा मंजुरीवर अभिप्राय देता येत नाही.

2) उपरोक्त प्रदानाच्या संदर्भात सादर संचिकेची तपासणी केली असता सदरील टँकर्स 10,11 व 12000 लिटरचे असल्याचे दर्शवुन प्रदान केले आहे, तथापि सदरील खाजगी वाहनाचे आर.सी. बुक लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्यामुळे टँकर पाणी क्षमतेची खात्री करता आली नाही. याबाबत आर.सी.बुक / इतर अभिलेखे दर्शवुन खात्री पटवणे आवश्यक आहे. करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या टँकर्सला आर.टी.ओ.ची मान्यता असणे आवश्यक आहे.

3) लेखापरीक्षणात उक्त टँकर्सच्या लॉगबुकांची तपासणी केली असता त्यात गाडी निघाल्याची व पोहोचल्याची वेळ व किलोमीटर रीडींग नमुद न करता केवळ खेपांची संख्या नमुद करुन त्याप्रमाणे परिगणना करुन रक्कमा प्रदान केल्याचे आढळुन आले आहे. वाहनाचे स्पिडोमीटर चालु न ठेवता स्पिडोमीटर प्रमाणे अंतर दर्शविले नसुन गावाचे प्रमाणित अंतर नमुद केले आहे. सक्षम प्राधिकाऱ्याने अंतरे प्रमाणित केलेली नाहीत. प्रमाणक क्रमांक 143 व 144 माहे मार्च, 2016 रक्कम अनुक्रमे रुपये 5,51,364/- व रुपये 6,21,486/- अन्वये पिशोर ते अंधारी व केऱ्हाळा तांडा येथे पाणीपुरवठा केल्याबाबत संबंधीतास रक्कमा अदा केल्या आहेत. तथापि उपरोक्त प्रकरणी दोन्ही गावांमधील अंतरे प्रमाणित केलेली दिसून आली नाहीत. पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

4) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्रक्र.12/पापु-14, दिनांक 03/02/1999 नुसार तपासणी पथक गठीत करुन क्षेत्रिय तपासण्या करण्यात आल्याचे आढळुन आले नाही.

5) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई 1005/प्र.क्र.305-पापु/14, दिनांक 24/01/2006 नुसार टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या गावास प्रत्यक्षात पाणीपुरवठा होतो किंवा कसे हे पाहणे आवश्यक असल्याने संबंधीत गावाला टँकर उपलब्ध करून दिल्यानंतर वेळच्या वेळी टँकर पोहचला असल्याबाबत टँकर गावात पोहचल्याची तारीख व वेळ याची लॉगबुकमध्ये नोंद करणे आवश्यक आहे. तसेच नियोजित खेपा होत आहेत किंवा नाही व प्रत्येक खेपेच्या वेळी त्या गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नियुक्त केलेल्या दोन महिला सदस्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे, तथापि अशी नियुक्तीबाबत अभिलेखे व काही प्रकरणी स्वाक्ष-या आढळुन आल्या नाहीत.

6) टँकर मंजुरीच्या आदेशामध्ये किती लोकसंख्येसाठी, कोणत्या नगरासाठी / भागासाठी खाजगी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे, याबाबत उल्लेख केलेला नाही. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य पाणीपुरवठा झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

7) जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी उपरोक्त आदेशानुसार टँकर भाडे प्रतिदिन प्रति मेट्रीक टन व डीझेल / वंगण खर्च प्रति किलोमीटर प्रति मेट्रीक टन दर निश्चित केले असतांना देयके अदा करतांना टँकर भाडे प्रतिदिन प्रति लिटर्स व डीझेल / वंगण खर्च प्रति किलोमीटर प्रति लिटर्स प्रमाणे अदा केली आहेत. लिटर्सचे मेट्रीक टनात रूपांतरण करुन देयके अदा करणे आवश्यक होते.

8) निवडक महिन्यातील देयाकांसोबत संलग्न केलेल्या लॉगबुकची पडताळणी केली असता विज कपात / नादुस्ती, टँकर नादुरुस्त व पावसामुळे टँकर बंद असल्याचे नमुद केले आहे. करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार विद्युत पुरवठा बंद असल्यास त्या दिवशीचे फक्त वाहनाचे भाडे अनुज्ञेय आहे किलोमीटर प्रमाणे भाडे अनुज्ञेय नाही. तथापि सर्व देयकासोबतचे लॉग बुकची पडताळणी करुन अनुज्ञेय नसलेले किलोमीटर प्रमाणे भाडे परीगणित करुन जादा अदाईची रक्कम संबधीताकडून वसुल करणे आवश्यक आहे.

9) करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार टँकरची टाकी पुर्ण क्षमतेने भरुन नेवुन योग्य पाणीपुरवठा केल्याबाबत तसेच केलेल्या एकूण फेऱ्याचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी तसेच गावातील सरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य किंवा ग्रामसेवक यांचेकडुन घेणे बंधनकारक आहे. तथापि असे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

10) करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार टँकर आतून-बाहेरून स्वच्छ असणे व याबाबत स्वच्छता नोंदवही ठेवून तारीखवार नोंदवहीत नोंद घेणे आवश्यक असतांना अशी नोंदवही ठेवल्याचे दिसून आले नाही.

11) करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार सक्षम अधिकाऱ्याने मान्य केलेल्या उदभवातून पाणी व सूचित केलेल्या गावांत पाणी शुध्द करून घेऊन टाकणे ठेकेदारास बंधनकारक असतांना पाणी शुध्द केले बाबत नोंदी / अभिलेखे दिसून येत नाही.

**4.254 विहीर अधिग्रहण भाडे दुसऱ्याच्या नावावर जमा करणेबाबत.**

**पंचायत समिती जालना, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 36) -** सदरबाबत रक्कम रुपये 12,57,600/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपयोगिता प्रमाणपत्र व तहसिलदार यांचे प्रमाणपत्रावर तसेच देयकानुसार दिनांक 23/05/2015 ते 30/06/2015 पर्यंत 98 दिवस दर्शवुन रुपये 39,200/- चे देयक काढण्यात आले असुन वरील नमुद दिनांकापर्यंत 37 दिवसच घेत असतांना 61 दिवसाचे भाडे जादा काढण्याचे लेखापरिक्षाणास आढळुन आले.

2) विहिर अधिग्रहण आदेश तहसिलदार जालना यांनी श्री.निवृत्ती जगन्नाथ कातकडे यांचे नावे असुन सदर विहिर अधिग्रहण भाडे श्री.निवृत्ती जगन्नाथ कदम जिल्हा मध्यवर्ती बँक धानोरा खाते क्रमांक 4219 वर रुपये 39,200/- जमा केल्याचे लेखापरिक्षणास दिसुन येते.

**4.255 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकरने पाणीपुरवठा केलेल्या प्रदानातील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती अंबड, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 34) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,88,07,195/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर प्रकारे पाणीपुरवठा करण्यासाठी संबंधीत पुरवठादाराबरोबर करारनामा केला आहे. मंजुर दराची निविदा प्रक्रीया जिल्हाधिकारी जालना यांचे स्तरावर झाली असल्यामुळे दर निविदा मंजुरीवर अभिप्राय देता येत नाही.

2) उपरोक्त प्रदानाच्या संदर्भात सादर संचिकेची तपासणी केली असता सदरील टँकर्स 10,11 व 12000 लिटरचे असल्याचे दर्शवुन प्रदान केले आहे. तथापि सदरील खाजगी वाहनाचे आर.सी.बुक लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्यामुळे टँकर पाणी क्षमतेची खात्री करता आली नाही. याबाबत आर.सी.बुक / इतर अभिलेखे दर्शवुन खात्री पटवणे आवश्यक आहे. करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या टँकर्सला आर.टी.ओ.ची मान्यता असणे आवश्यक आहे.

3) लेखापरीक्षणात उक्त टँकर्सच्या लॉगबुकांची तपासणी केली असता त्यात गाडी निघाल्याची व पोहोचल्याची वेळ व किलोमीटर रिडींग नमुद न करता केवळ खेपांची संख्या नमुद करून त्याप्रमाणे परिगणना करून रक्कमा प्रदान केल्याचे आढळुन आले आहे. वाहनाचे स्पिडोमिटर चालु न ठेवता स्पिडोमिटर प्रमाणे अंतर दर्शविले नसुन गावाचे प्रमाणीत अंतर नमुद केले आहे. सक्षम प्राधिकाऱ्याने अंतरे प्रमाणित केलेली नाहीत.

4) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्रक्र.12/पापु-14, दिनांक 03/02/1999 नुसार तपासणी पथक गठीत करून क्षेत्रीय तपासण्या करण्यात आल्याचे आढळुन आले नाही.

5) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई-1005/प्र.क्र.305-पापु/14, दिनांक 24/01/2006 नुसार टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या गावास प्रत्यक्षात पाणीपुरवठा होतो किंवा कसे हे पाहणे आवश्यक असल्याने संबंधीत गावाला टँकर उपलब्ध करून दिल्यानंतर वेळच्या वेळी टँकर पोहचला असल्याबाबत टँकर गावात पोहचल्याची तारीख व वेळ याची लॉगबुकमध्ये नोंद करणे आवश्यक आहे. तसेच नियोजीत खेपा होत आहेत किंवा नाही व प्रत्येक खेपेच्या वेळी त्या गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नियुक्त केलेल्या दोन महिला सदस्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. तथापि अशी नियुक्तीबाबत अभिलेखे व काही प्रकरणी स्वाक्ष-या आढळुन आल्या नाहीत.

6) टँकर मंजुरीच्या आदेशामध्ये किती लोकसंख्येसाठी, कोणत्या नगरासाठी / भागासाठी खाजगी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. याबाबत उल्लेख केलेला नाही. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य पाणीपुरवठा झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

7) जिल्हाधिकारी जालना यांनी उपरोक्त आदेशानुसार टँकर भाडे प्रतिदिन प्रति मे.टन व डीझेल / वंगण खर्च प्रति कि.मी. प्रति मे.टन दर निश्चित केले असतांना देयके अदा करतांना टँकर भाडे प्रतिदिन प्रति लिटर्स व डीझेल / वंगण खर्च प्रति कि.मी.प्रति लिटर्स प्रमाणे अदा केली आहेत. लिटर्सचे मे. टनात रूपांतरण करून देयके अदा करणे आवश्यक होते.

8) निवडक महिन्यातील देयाकांसोबत संलग्न केलेल्या लॉगबुकची पडताळणी केली असता विज कपात / नादुरुस्ती, टँकर नादुरुस्त व पावसामुळे टँकर बंद असल्याचे नमूद केले आहे. करारनाम्यातील अटी / शर्तीनुसार विद्युत पुरवठा बंद असल्यास त्या दिवशीचे फक्त वाहनाचे भाडे अनुज्ञेय आहे कि.मी. प्रमाणे भाडे अनुज्ञेय नाही. तथापि सर्व देयकासोबतचे लॉग बुक ची पडताळणी करून अनुज्ञेय नसलेले कि.मी. प्रमाणे भाडे परीगणित करून जादा अदाईची रक्कम संबधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

9) करारनाम्यातील अटी / शर्तीनुसार टँकरची टाकी पूर्ण क्षमतेने भरून नेवून योग्य पाणीपुरवठा केल्याबाबत तसेच केलेल्या एकूण फेऱ्याचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी तसेच गावातील सरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य किंवा ग्रामसेवक यांचेकडून घेणे बंधनकारक आहे. तथापि असे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

10) करारनाम्यातील अटी / शर्तीनुसार टँकर आतून-बाहेरून स्वच्छ असणे व याबाबत स्वच्छता नोंदवही ठेवून तारीखवार नोंदवहीत नोंद घेणे आवश्यक असतांना अशी नोंदवही ठेवल्याचे दिसून आले नाही.

11) करारनाम्यातील अटी / शर्तीनुसार सक्षम अधिकाऱ्याने मान्य केलेल्या उदभवातून पाणी व सूचित केलेल्या गावांत पाणी शुध्द करून घेऊन टाकणे ठेकेदारास बंधनकारक असतांना पाणी शुध्द केले बाबत नोंदी / अभिलेखे दिसून येत नाही.

**4.256 मौजे चौऱ्हाळा तालुका भोकरदन येथे दलित वस्ती पाणी पुरवठा योजनेतील अनियमितेबाबत.**

**पंचायत समिती भोकरदन, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,97,285/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जी आर34/सा-4/5989, दिनांक 08/01/2007 नुसार साहित्याचा वापर करणे आवश्यक असतांना बांधकामाच्या नस्तीत चाचणी अहवाल उपलब्ध झाला नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखसंहिता 1968 चे नियम 147 नुसार नमुना क्रमांक 48 मध्ये करारनाम्याची नोंद घेतलेली दिसुन आलेली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.44, दिनांक 22/12/2000 अन्वये मोजमाप पुस्तिकेतील नोंदी दिनांकीत करण्याचे आदेशित असतांना मोजमाप पुस्तिकेत रेकॉर्ड एन्ट्री, मोजमापे व गोषवाऱ्यावर दिनांक नमुद नसल्यामुळे उक्त शासन निर्णयाचे पालन झालेले नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118(3) व नियम 153 नुसार अंदाजपत्रकातील परिमाणापेक्षा अधिक परिमाणे करता येत नाहीत असे असतांना प्रत्यक्ष कामावरील परिमाणामध्ये कमी / अधिक प्रमाण करुन काम पुर्ण करण्यात आले आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 67 व 197 नुसार कामाची प्रगती नोंदवही नमुना नंबर 23 व कामपुर्ण नोंदवही नमुना नंबर 69 मध्ये नोंद घेणे आवश्यक आहे. परंतु सदरील नोंदवह्या लेखापरीक्षणास सादर केलेल्या नाहीत. त्यामुळे नोंदी केल्या बाबतची पडताळणी करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पं.रा.स 1040/प्र.क्र. 1113/35, दिनांक 25/10/1990 अन्वये ग्रामंपचायतीचे बाबतचे गट विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही. व सदर काम ग्रामपंचायत हद्दीत झाले याचा नमुना 8 अ चा उतारा संचिकेत उपलब्ध झाला नाही.

**4.257 खाजगी टँकर भाडे देयकातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती बदनापूर, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,15,68,493/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1099/प्र.क्र.12/ पा.पु.14, दिनांक 03/02/1999 अन्वये तहसिलदार व गट विकास अधिकारी यांनी टंचाईग्रस्त गावाची प्रत्यक्ष पाहणी करुन तसा स्थळ पाहणी अहवाल जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र भुजल अधिनियम 1993 च्या कलम 4 अन्वये टंचाईग्रस्त गाव जाहिर केल्याबाबत तसेच सतत तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीत एकाच विहिरीचे अधिग्रहण झाले तर उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकारी यांनी विहिरीची पाहणी केल्याबाबत अभिलेखे नसल्याने खात्री करता आली नाही.

3) जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे पत्र क्रमांक जा.क्र.2015/मशाका/पाट/सीआर-21, दिनांक 09/02/2015 अन्वये किलोमीटर अंतराचे प्रमाणपत्र उपअभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद जालना यांचेकडुन प्रमाणित करुन घ्यावी असे आदेश असतांना असे प्रमाणपत्र लेखापरिक्षणास सादर करण्यात आले नाही.

4) खाजगी टँकर्सची क्षमता R.T.O. कडून प्रमाणित केलेली नाही. आर.सी.बुक दर्शवून टँकरच्या क्षमतेचे अभिलेखे दर्शविले नसल्याने अभिलेखे दर्शवून लेखापरीक्षणात खात्री पटवावी. पाणी उपशापासून पाणी पुरवठा करणेपर्यंतचे अंतर सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले नाही.

5) जेथून पाणी भरतो / भरते ते ठिकाणी उपअभियंता यांनी प्रमाणित केलेले नाही.

6) जनगणनेनुसार दरडोई पाण्याची गरज / प्रमाण निश्चिती केलेली नाही. त्यामुळे केलेले पाणीपुरवठा प्रमाण योग्य आहे किंवा नाही यांची लेखापरीक्षणात खात्री पटवता आली नाही.

7) निविदा मंजूर झाल्यानंतर टँकर व ट्रक वरील टाकीची पाणी वहन क्षमता ग्रामीण पाणी पुरवठाचे कार्यकारी अभियंता यांचेकडून प्रमाणित नाही. तसेच अंतराबाबतचे प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांचेकडून प्रमाणित नाही. त्यानुसार टँकरला देण्यात येणारे प्रतिदिन व प्रति किलोमीटर भाडे 1 मेट्रीक टन एककाच्या प्रमाणात देणे आवश्यक होते. मात्र पंचायत समिती बदनापूर यांनी उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

8) शासन पत्रातील महसुल व वन विभाग अटी व शर्ती दिनांक 02/03/1994 मधील मुद्दा 18 नुसार टँकरने रोज किती फेऱ्या केल्या याबाबत ग्रामसेवकाने स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही. याबाबत अनूपालन दर्शवावे.

9) Logbook मध्ये प्रत्येक खेपेची जाण्याची येण्याची वेळे नोंदविणे आवश्यक असतांना एकूण येण्या जाण्याच्या खेपा एकाच वेळेस नोंदविण्यात आल्याचे दिसते याबाबत खात्री पटवून अनुपालन दर्शवावे.

10) GPS PRINT मध्ये अनेक त्रुटया आढळून आल्या. सर्व टँकरचे GPS Print लेखापरीक्षणात दर्शविले नाही. जिल्हाधिकारी जालना यांचे आदेश दिनांक 18/03/2014 नुसार पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर GPS प्रणाली बसविल्यानंतर GPS प्रणालीवर ज्या टँकरच्या फेऱ्यांची नोंद होईल त्याच फेऱ्या देयकाकरीता अनुज्ञेय होतील व ज्या पाणीपुरवठा करणाऱ्या टँकरवर GPS प्रणाली नसेल व टँकर वाहतूक धारकांनी टँकरच्या फेऱ्या झाल्याचा दावा केल्यास अश्या फेऱ्या बनावट ठरतील असे आदेशात स्पष्ट नमुद असूनही सर्व टँकर्सचे GPS PRINT लेखापरीक्षणात दर्शविले नाही.

**4.258 पंचायत समिती मंठा येथील 2245 अंतर्गत टँकर पाणीपुरवठा देयकामधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मंठा, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदरबाबत रक्कम रूपये 96,50,046/-खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महसुल व वन विभाग, शासन पत्र क्रमांक ATY/1394/प्र.क्र./188 मे 7, दिनांक 02/03/1994 मधील परीच्छेद क्रमांक 18 नुसार टँकरने रोज किती फेऱ्या केल्या याबाबत ग्रामसेवकाने स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

2) शासन निर्णय क्रमांक टंचाई/1008/प्र.क्र./48/पा.पु-14, दिनांक 11/06/2009 व जिल्हाधिकारी जालना यांचे आदेश जावक क्रमांक 20113/मशाका/पाट/कावि/231, दिनांक 05/03/2013 मधील अटी व शर्ती मधील अट क्रमांक 1 मध्ये नमुद केल्यानुसार कंत्राटदार यांचेकडील 10 व 12 मेट्रीक टन क्षमतेचे किमान 10 टँकर्स स्वत:च्या मालकीचे असावेत याबाबत आर सी बुक्स, टॅक्स पावत्या / इंश्युरन्स इत्यादीच्या साक्षाकित प्रती सादर करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

3) कंत्राटदारास अदा केलेल्या देयकाची नोंद देयक नोंदवहीत नोंदवुन उशीराच्या देयकांना महाराष्ट्र जिल्हा परीषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 44 नुसार मान्यता घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

4) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक टंचाई/1005/प्र.क्र.305/पापु14, दिनांक 24/01/2006 पाणीपुरवठा स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेले सदस्य व महिला व सदस्य इत्यादीच्या स्वाक्षरी स्कंध पुस्तिकेवर असल्याशिवाय देयके अदा करु नयेत. अशा स्पष्ट सुचना असतांना बऱ्याच दिनांकास अशी कार्यवाही झाल्याचे दिसुन आले नाही.

5) टँकरसाठी पुरविण्यात येणारे पाणी पिण्याएवढे असल्याने त्यात टिसीएल पावडरचा उपयोग केला किवा नाही व टीसीएलची गुणवत्ता संबंधी अभिलेखे संचिकेत दिसुन आले नाही.

6) पाणी पुवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1099/प्र.क्र.12/पा.पु/14, दिनांक 03/02/1999 नुसार तपासणी पथके गठीत करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाली नाही.

7) MH-18 8572 चे वाघाडी तांडाचे किलोमीटर 2970 लॉगबुकप्रमाणे आहे परंतु प्रत्यक्ष घेतलेले 3240 किलोमीटर दर्शविले म्हणजेच 270 किलोमीटर जादा दर्शविले आहे. 270 x 21.08 = 5,692/- जादा अदाई झाली आहे.

8) MH-04 3024 आर्डी खारीचे किलोमीटर 2870 x 21.08 = 60,499/- येते परंतु घेतलेले लॉगबुकप्रमाणे बेरीज रुपये 61,306/- म्हणजेच जादा अदाई रुपये 807/- आहे.

9) MH-04 BU-6916 पाटोदा किलोमीटर 3192 व दिवस 57 चे रक्कम रुपये लॉगबुकप्रमाणे रुपये 2,39,400/- येते संबंधितास अदा रुपये 2,40,025/- म्हणजेच रुपये 625/- जादा अदाई झालेले आहे.

10) MH-04 CP 110 अंभोरा जहॉगीर किलोमीटर 1694 व दिवस 77 चे लॉगबुक प्रमाणे रुपये 2,31,708/- येते व संबंधीतास अदाई केलेली रक्कम रुपये 2,32,012/- अदा करण्यात आली आहे. म्हणजेच रुपये 304/- जादा झालेली आहे.

**4.259 शासकीय पाणीपुरवठा खाजगी पाणी टँकरने पाणी टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा देयकातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती बीड, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** जिल्हाधिकारी, बीड यांचे आदेश क्रमांक 2014/मशाका/कक्ष-3/पिाट-कावि, दिनांक 01/01/2014 अन्वये श्री.एच.पी.घुमरे रा.पाटोदा यांना बीड जिल्हयातील टंचाई अंर्तगत पिण्याचे पाणी टँकरव्दारे पुरवठा करणेसाठी डिसेंबर 2014 पर्यंत आणि तद्नंतर दिनांक 11/12/2014 च्या आदेशान्वये दिनांक 01/01/2015 ते 31/12/2015 कालावधीसाठी पिण्याचे पाणी टँकरव्दारे पुरवठा करणेसाठी श्री.सतिश माणिकराव साखरे रा.बीड यांची नियुक्ती केलेली होती. यावर प्रमाणकनिहाय अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

<u>प्रमाणक क्रमांक 25, दिनांक 23/07/2015 रुपये 99,396/-</u>

1) श्री.बी.एस.बावने यांनी त्यांचे पत्र दिनांक 30/08/2013 अन्वये असे कळविलेले होते की, मौजे पारगांव सिरस येथे दोन टँकर खेपा पाणीपुरवठा करणेबाबत आदेश होते. परंतू तहसीलदार यांचे दिनांक 01/04/2013 च्या आदेशान्वये दिनांक 02/04/2013 पासुन टँकरची एक वाढीव खेप दिलेली होती व तशा नोंदी लॉगबुकला आहेत. परंतू दोन खेपाचे देयक मिळाले व एक खेपाचे बील मिळाले नसल्याचे नमूद करुन (बील क्रमांक 2827 व 2828 अन्वये) रुपये 99,396/- सादर केले. त्यानंतर पंचायत समितीने वरील प्रमाणक क्रमांक 25, दिनांक 23/07/2015 अन्वये

त्यांना सदरील देयकाचे प्रदान केलेले आलेले आहे. सदरील पारगांव सिरस येथील पाणी पुरवठा केलेल्या टँकर क्रमांक एचएच-12 ईएफ-1336 चे सदरील कालावधीचे मूळ लॉगबुक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आले नाही. तथापि देयकासोबतच्या एमएच-12 ईएफ-1336 या टँकरचे लॉगबुक झेरॉक्स प्रती, टँकर आदेश इ. अभिलेखाची पडताळणी केली असता जिल्हाधिकारी, बीड यांचे आदेश क्रमांक 2012/मशाका/कक्ष-3/पिपाट-148, दिनांक 11/01/2013 अन्वये पारगांव सिरस येथे 1 खाजगी टँकरने प्रतिदीन दोन खेपा अशी मंजूरी होती तसेच पाण्याचा उद्भव उकंडा तलाव होता तद्नंतर तहसीलदार बीड यांचे आदेश क्रमांक 2013/पाटं/कावि/153, दिनांक 01/04/2013 अन्वये एका वाढीव खेपेस मंजूर दिलेली आहे. वरील नमूद टँकरच्या लॉगबुकला या कालावधीत 3 खेपा मौज तलाव उद्भवावरुन केलेल्या असून दररोज 120 कि.मि. अंतर लॉगबुकात नमूद असून ते संबंधित गांवचे ग्रामसेवक व सरपंच यांनी सहीशिक्यानिशी प्रमाणित केलेले असून गटविकास अधिकारी यांनी सुध्दा लॉगबुक वरील खेपा व अंतर प्रमाणित करुन त्यानुसार माहे 01/04/2013 ते 30/04/2013 महिन्यात 3 खेपाचे 3600 कि.मी.चे रुपये 27.61 प्रतिकिमी दराने रुपये 99,385/- आणि 01/05/2013 ते 31/05/2013 कालावधीतील 3 खेपाचे 31 दिवसाचे 3720 कि.मी.चे रुपये 27.61 प्रमाणे 1,02,698/- एवढे प्रदान पूर्वीच करण्यात आलेले असून प्रदान करावयाची उर्वरित रक्कम शिल्लक राहिलेली नाही. सबब सदरचे नियमबाहय, मुदतबाहय प्रदान अंतिमत: अमान्य करण्यात येत आहे. सदरील संपूर्ण रक्कम रुपये 99,396/- वसूलपात्र ठरते.

<u>प्रमाणक क्रमांक 12, दिनांक 01/09/2015, प्रमाणक क्रमांक 7, दिनांक 27/10/2015 आणी प्रमाणक क्रमांक 20, दिनांक 09/03/2016</u>

2) जिल्हाधिकारी यांचे आदेशातील अट क्रमांक 13 व 14 नुसार टँकर ज्यादिवशी पाणी वाहतुकीचे कामी हजर करण्यात येईल. त्यावेळी त्याच्या क्षमतेबाबतची प्रमाणे सादर करण्याची जबाबदारी वहातुक ठेकेदाराची राहील. तसेच पंचायत समितीकडे आर.सी. बुकची झेरॉक्स प्रत, गाडीमालकाचे पॅनकार्ड जमा करणे तसेच टँकर कोणत्या गावी पाणी पुरवठा करीत आहे. याबाबत टँकरच्या काचावर गाव नमूद करणे आवश्यक असतांनाही पंचायत समितीकडे प्राप्त आर.सी.बुकच्या झेरॉक्स प्रती अथवा आर.सी.बुके लेखापरीक्षणास मागणी करुनही उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत.

3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी आर.सी.बुक प्रमाणे टँकरची भारवाहन क्षमता प्रमाणित केलेली यादीच्या आधारे टँकरचे लॉगबुक्स्, संचिका इ. अभिलेख्यावरुन टँकर देयकाच्या प्रदानाची तपासणी केली असता सोबत जोडलेल्या विवरणपत्रा प्रमाणे संबंधीत ठेकेदारास टँकरच्या प्रमाणित भारवाहन क्षमतेपेक्षा जादा भारक्षमतेने टँकरचे प्रतिदिन भाडे व प्रतिदिन प्रति कि.मी. भाडे अदा करण्यांत आल्याने रुपये 75,06,606/- एवढया रकमेचे अतिप्रदान झालेले असून ते वसुलपात्र ठरते. तसेच प्रमाणक क्रमांक 12, दिनांक 01/09/2015 मधील 22 टँकरचे प्रमाणक क्रमांक 7, दिनांक 27/10/2015 मधील 9 टँकरचे व प्रमाणक क्रमांक 20, दिनांक 09/03/2016 मधील 31 टँकरचे आर.सी.बुक प्रमाणे वाहन क्षमतेबाबतचे अभिलेख उपलब्ध झाले नसल्याने सदरील टँकरचे प्रदान सुयोग्य झाले असल्याबाबत पडताळणी करता आलेली नाही. पंचायत समितीने या प्रदानाची पुन:श खात्री करुन जादा प्रदान झाले असल्यास ते पण वसूल करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्च्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 2013/प्र.क्र.41/पापु-14, दिनांक 04/01/2014 व महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे पत्र जावक क्रमांक टंचाई/प्र.क्रं.20/पापु-14, दिनांक 15/03/2014 मध्ये निर्देशित केल्यानुसार टँकरवर जीपीएस प्रणाली बसवुन त्याचे नियंत्रक उपकरण जी.पी.एस.प्रणालीचे नोडल अधिकार यांचेकडे बसवुन घेवून सदर संगणकीय प्रणालीव्दारे टँकर फे-यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. जी.पी.एस. प्रणालीवरुन टँकर फे-याच्या अंतराबाबतच्या अहवालावर संबंधीत अधिका-यांच्या स्वाक्ष-या नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई-1002/प्रक्र290/पापु-14, दिनांक 19/09/2002 नुसार टँकर / इतर वाहनाने पाणी पुरवठा मंजूर झाल्यानंतर प्रत्यक्षात ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार व विहित प्रमाणात प्रत्यक्षात गाव / वाडीला पाणी पुरवठा होतो किंवा नाही यावर देखरेख ठेवणे तसेच पाणीपुरवठा करतांना काही गैरप्रकार होत असल्यास ते शासनाच्या निदर्शणा आनुन देण्यासाठी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता

समिती स्थापन करणे आवश्यक आहे. पाणी पुरवठादारास मंजुरी आदेशानंतर गटविकास अधिकारी यांनी ग्रामस्वच्छता व पाणीपुरवठा समितीस पाणी पुरवठाच्या तारीखनिहाय वेळापत्रक, प्रत्येक दिवशी टँकरच्या किती फेऱ्या होतील. टँकरची क्षमता किती असेल, इ. तपशिलवार वेळापत्रक तयार करुन त्याची प्रत प्रत्येक आठवडयाच्या सुरुवातीस संबंधीत गावाच्या ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीस उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. समितीने त्यानुसार पाणी पुरवठा झाल्याचे प्रत्येक आठवडयाच्या शेवटी गटविकास अधिकारी / तहसीलदार यांचेकडे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. व सदर प्रमाणपत्र मिळालयानंतरच टँकरच्या बिलाची अदायगी करण्यात यावी असे शासन आदेश आहेत. तथापि सदरचे अहवाल संचिकेत आढळुन आले नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 3099/प्र.क्र.39 पा पु/14, दिनांक 01/02/1999 अन्वये टंचाईग्रस्त गावाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात दरडोई किमान 20 लिटर पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे. परंतु टंचाईग्रस्त गावाचे तहसीलदार यांचे लोकसंख्येच्या बाबतचे प्रमाणपत्र संचिकेत नाही. लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा वाढीव पाणीपुरवठा केलेला नाही. याबाबत पडताळणी करता आली नाही.

7) पाणी उद्भव विहीरीची व टंचाईग्रस्त गावाची गटविकास अधिकारी व तहसीलदार यांनी संयुक्त पाहणी करुन अंतराची प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. परंतू अशी प्रमाणपत्र संचिकेत नाहीत.

8) वाहनाच्या लॉगबुकातील नोंदीवर स्पीडोमिटरच्या नोंदी नाहीत. त्यामुळे प्रदानातील किमी योग्य असल्याबाबतचे खातरजमा करता आली नाही.

9) प्रपत्र-ब भुवैज्ञानिक यांनी स्थळपाहणी करुन प्रत्येक जलस्तोत्र / उद्भवाचे ठिकाणाचे पाहणी प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. परंतु असे प्रमाणपत्रे संचिकेत आढळले नाही.

10) ठेकेदाराने पुरविलेली पाणी ग्रामपंचायतीने शुध्दीकरण करुन वापरल्याचे देखील संचिकेत नाहीत.

**4.260 नैसर्गिक आपत्ती अंतर्गत इंजिन भाडे, विहीर / बोअर अधिग्रहण प्रदानातील अनियमितता.**

**पंचायत समिती बीड, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदरबाबत रक्कम रुपये 26,47,100/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्र.क्र.53/पापु-14, दिनांक 30/04/2012 व शासन निर्णय क्रमांक टंचाई 1008/प्र.क्रं.05/पापु-14, दिनांक 25/03/2008 अन्वये महाराष्ट्र पिण्याच्या पाणी पुरवठयाचे अधिग्रहण अधिनियम 1983 मधील कलम 8 मध्ये 1992 मध्ये केलेल्या सुधारणेनुसार पाणी टंचाईच्या कालावधीमध्ये अधिगहीत केलेल्या विहिरीच्या मोबदल्याचे सुधारित दर मंजूर केलेले आहेत. त्यानुसार " खाजगी विहिर अधिग्रहीत केल्यानंतर त्या विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विदयुत / डिझेल पंप व विदयुत कनेक्शनसह साधन सामुग्री उपलब्ध करुन दिली नसल्यास प्रतिदिन रुपये रुपये 300/- या कमाल मर्यादेत व विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विदयुत पंप / डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामुग्री उपलब्ध करुन दिली असल्यास प्रतिदिन रुपये 400/- कमाल मर्यादेत विहिर अधिग्रहण मोबदला द्वयाचा असून वरीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेला मोबदल्या संदर्भात विहिर मालकांशी कायदेशीर करार करण्यात येवून विहीर अधिग्रहण मोबदल्याची रक्कम दर तीन महिन्यांनी वेळच्या वेळी संबंधीताना अदा करणे बाबत शासन आदेशात सूचना आहेत.

2) वर अनुक्रमांक 1 व 2 वरील प्रमाणकान्वये केलेल्या प्रदानामध्ये गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड यांच्या आदेशान्वये मौजे पाली, मौजे, उखंडा आणि लिंबारुई ई. येथील तलावावर इंजिन भाडयाने लावण्यांत आलेली असून त्याची प्रतिदिन रुपये 400/- नुसार भाडे अदाई करण्यांत आलेली आहे. प्रमाणक क्रमांक 4, दिनांक 27/10/2015 ची तपासणी केलेली असता तलावावर लावलेल्या इंजिन भाडेची अदाई रुपये 6,13,800/- इतकी करण्यात आलेली आहे.

संबंधीताचे तलावावर इंजिन भाडयाने लावल्यानंतर त्यांना रुपये 400/- प्रतिदीन भाडे अनुज्ञेय नसतांना अदाई केलेली आहे. त्यामुळे रुपये 4,60,350/- अतिप्रदान झालेले आहे. सन 2015-2016 मध्ये अशाप्रकारच्या इंजिनभाडे प्रदान केलेल्या सर्व प्रकरणचा गटविकास यांनी आढावा घेऊन वसुली करण्याची आवश्यकता आहे.

3) वर नमूद केलेल्या विहीर / बोअर अधिग्रहण बाबत विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या संबंधीत विहीर मालकाचा अधिग्रहण प्रस्तावात विदयुत कनेक्शन असल्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे प्रमाणपत्र किवा देयकासोबत प्रदान कालावधीचे विद्युत देयके न जोडल्याने किंवा विभागाच्या उपअभियंताच्या किंवा सक्षम प्राधिका-याच्या स्थळ पाहणी अहवालात विद्युत कनेक्शन किंवा डिझेल पंप असल्याचे नमुद नाही. त्यामुळे त्यांना करण्यांत आलेले सरसकट रुपये 400/- दराने प्रदान नियमबाहय ठरते.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1968 चे कलम 77(2) नुसार प्रदान धनादेशाची पोचपावती घेण्याची आवश्यकता असताना घेतलेल्या नाहीत.

5) जिल्हाधिकारी बीड यांच्या विहीर अधिग्रहण आदेशातील अट क्र.14 नुसार वरिष्ठ भवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण यंत्रणा बीड यांनी टंचाईग्रस्त मंजुर गावाचे स्थळ पाहणी करुन पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र / अहवाल तहसिदार व गटविकास अधिकारी यांना सादर करावयाचे आहे. परत सदरचे प्रमाणपत्र न घेताच तसेच प्रदान करण्यात आले आहे. त्यानुसार पाहणी अहवालात पाणी पिण्यायोग्य असल्याचे नमुद केलेले नाही.

6) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्च्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2014/प्र.क्र.48/पापु-14, दिनांक 06/05/2014 अन्वये राज्यातील ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या योजना बाबत मार्गदर्शक तत्वे विषद केलेली असुन त्यानुसार पंचायत समितीमार्फत टंचाईग्रस्त गावात टँकर चालू होऊ नये, म्हणुन केल्या उपाययोजनेबाबतची माहिती अर्धसमासपत्राव्दारे मागविण्यात आली असता ती सादर करण्यांत आली नाही.

7) तहसिलदार बीड यांचे अधिग्रहण आदेशानुसार ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर अधिग्रहण नावे प्रसिध्द करणेबाबत आदेशीत केले आहे. याबाबतचे अभिलेखे उपलब्ध न झाल्याने खात्री करता आली नाही.

8) तहसिलदार, बीड यांचे आदेशानुसार गावात एकापेक्षा जास्त अधिग्रहण असतील तर शासन परिपत्रक दिनांक 10/04/2003 नुसार कार्यवाही करण्याचे आदेशीत केले आहे. अधिग्रहण एकापेक्षा जास्त झाले आहे. परंतु सदर परिपत्रकाप्रमाणे कार्यवाहीचे अभिलेखे दर्शविले नाहीत.

9) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1008/प्रक्र.05/पापु-14, दिनांक 25/03/2008 नुसार अधिग्रहणधारकाशी करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु असा करारनामा केलेला असुन तहसिलदार / गटविकास अधिकारी यांच्या दिनांकीत स्वाक्षरी नाही. त्यामुळे असा करारनामा अवैध ठरतो.

10) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक 1099/प्र.क्र.12/पा.पु.14, दिनांक 03/02/1999 नुसार त्या गावातील विहीरी अधिग्रहण करावयाची आहे. ते गाव टंचाईग्रस्त म्हणुन घोषीत करावयाची आहेत. त्या बाबतचे आदेश न दर्शविल्याने या बाबतची खात्री करता आली नाही.

## 4.261 टंचाईग्रस्त गावांना खाजगी टँकरने पाणी पुरवठा देयकातील अनियमिततेबाबत.

**पंचायत समिती गेवराई, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 3,30,58,530/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्र.क्र.53/पापु 14, दिनांक 30/04/2012 अन्वये अट क्र.2 नुसार पाणी पुरवठा करणा-या टँकर / ट्रकवरील टाकीची पाणी वाहन क्षमता आरटीओ मार्फत प्रमाणीत करुन घ्यावी, असे असताना टाकीचे वजन करुन टाकीची क्षमता ठरविली आहे, आरटीओचे प्रमाणपत्र घेतले नाही.

2) जिल्हा परिषद बीड यांनी पत्र जावक क्रमांक ग्रापापु/लेखा-2/कावि/2017/00481, दिनांक 20/03/2017 अन्वये सकल भारक्षमतेपेक्षा अधिक भार वहन करणा-या वाहनावर दंडात्मक कारवाई करणे बाबत कळविले होते. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांनी त्यांचे पत्र क्रमाक जाक्र.56/आस्था/उपप्रापका 2017, दिनांक 29/03/2017 नुसार वाहनाची आरसी बुकाप्रमाणे क्षमता व प्रत्यक्ष केलेली वाहतुक याची पडताळणी केली. सदर पडताळणीमध्ये सन 2015-2016 मध्ये आदा केलेल्या देयकामधील टँकर व त्याच्या क्षमता निर्दर्शनास आल्या, त्या अनुषंगाने आरसी बुकाच्या क्षमतेप्रमाणे देयक अदा न केल्याने रुपये 13,69,898/- इतकी रक्कमेची जादा अदाई झाली आहे.

प्राप्त माहिती मध्ये विवरणपत्रातील टँकर व्यतिरिक्त पाणी वाहतुक केलेल्या टँकरची क्षमता तपासली नसल्याने सदर टँकरणे क्षमते इतकेच पाणी वाहतुक केले बाबत तपासणी करता आली नाही.

3) प्रमाणक क्रमांक 5-10/2015 रुपये 56,77,475/- या देयकामधील अ.क्र.44, मौजे.चकलांबा या गावास पाणीपुरवठा दिनांक 01/05/2015 ते 31/05/2015 या कालावधीत टँकर क्रमांक MH-04/5370 या टँकरणे पाणी पुरवठा केल्याचे देयक रुपये 1,42,585/- समाविष्ट आहे, परंतु सदर टँकरचे लॉग बुक पंचायत समितीकडे नसल्याने सदर रक्कम वसुल पात्र ठरते.

4) प्रमाणक क्रमांक 1-1/2016 रुपये 2,46,44,320/- या देयकामधील मौजे.शिंपेगाव या गावास दिनांक 01/05/2015 ते 31/05/2015 या कालावधीत टँकर क्रमांक MH-16/2355 ने पाणी पुरवठा केला असुन रुपये 67,400/- चे देयक अ.क्र.4 व 162 वर दोन वेळा अदा केले आहे, त्यामुळे दुबार दिलेले रुपये 67,400/- वसुल पात्र ठरतात.

5) प्रमाणक क्रमांक 9-2/2016 रुपये 27,36,725/- या देयकामधील अ.क्र.7,मौ.पाचेगाव तांडा या गावास पाणीपुरवठा दिनांक 30/04/2015 ते 31/05/2015 या कालावधीत टँकर क्रमांक MH-04/5642 या टँकरणे पाणी पुरवठा केल्याचे देयक रुपये 1,37,359/ अदा केले आहे. सदर देयक प्रमाणक क्रमांक 5, दिनांक 10/2015 रुपये 56,77,475/- मधील अ.क्र.54 नुसार यापूर्वी अदा झाले आहे, यामुळे सदरचे प्रदान दुबार असल्याने रुपये 1,37,359/- वसुलपात्र ठरतात.

6) प्रमाणक क्रमांक 9- 2/2016 रुपये 27,36,725/- या देयकामधील अ.क्र.11,मौ.दिमाखवाडी या गावास पाणीपुरवठा दिनांक 05/05/2015 ते 31/05/2015 या कालावधीत टँकर क्रमांक MH-42/8255 या टँकरणे पाणीपुरवठा केल्याचे देयक रुपये 99,208/- अदा केले आहे. सदर देयक प्रमाणक क्रमांक 5, दिनांक 10/2015 रुपये 56,77,475/- मधील अ.क्र.56 नुसार यापूर्वी अदा झाले आहे, यामुळे सदरचे प्रदान दुबार असल्याने रुपये 99,208/- वसुलपात्र ठरतात.

7) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1099/प्र.क्र.12/पापु 2014, दिनांक 14/02/1999 मधील परिच्छेद क्रमांक 07 प्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी एक किंवा आवश्यकते नुसार अधिक तपासणी पथके गठीत करुन त्या करवी क्षेत्रिय तपासण्या करुन घेतील असे असताना पंचायत समितीकडे तपासणी पथकाचे अहवाल नसल्यामुळे अशा तपासण्या झाल्याबाबत तपासणी करता आली नाही.

**4.262 खाजगी टँकरने पाणी टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा देयकातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती आष्टी, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 93,45,579/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी आर.सी.बुक प्रमाणे टँकरची भार वाहन क्षमता प्रमाणित केलेली यादी. (उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड यांचे पत्र क्रमांक जा.क्र.56/आस्था/उपप्रापका/2017, दिनांक 29/03/2017 आणि पत्र क्रमांक 65, दिनांक 05/04/2017 च्या पत्रानुसार जिल्हा परिषदेला प्राप्त असलेली) च्या आधारे टँकरचे लॉगबुक, संचिका इ. अभिलेख्यावरुन टँकर देयकाच्या प्रदानाची तपासणी केली असता सोबत जोडलेल्या विवरण पत्राप्रमाणे संबंधीत ठेकेदारास टँकरच्या प्रमाणीत भार वाहन क्षमतेपेक्षा जादा भार क्षमतेने टँकरचे प्रतिदिन भाडे व प्रति कि.मी.भाडे आदा करण्यात आल्याने उपरोक्त प्रमाणकामध्ये सोबतच्या विवरणपत्रानुसार निवड महिन्यांमध्ये अ.क्र.(2) प्र.क्र. 154 माहे 3/2016 रुपये 1,68,079/- (3) प्र.क्र.45-माहे 3/2016 रुपये 1,22,873/- असे रुपये 2,90,952/- एवढ्या रकमेचे अतिप्रदान झालेले आहे.

सदरबाब उदाहरणादाखल असुन सर्व प्रदानांचा आढावा घेण्यात येवुन सुयोग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 2013/प्र.क्र.41/पापु-14, दिनांक 04/01/2014 व महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे पत्र जावक क्रमांक टंचाई/प्र.क्र.20/पापु-14, दिनांक 15/03/2014 निर्देशित केल्यानुसार टँकरवर GPS प्रणाली बसवुन त्याचे नियंत्रक, उपकरण जिपीएस

प्रणालीचे नोडल अधिकार यांचेकडे बसुन घेवून सदर संगणकीय प्रणालीद्वारे टँकर फे-यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. जिपीएस प्रणालीवरुन टँकर फे-याच्या अंतरा बाबतच्या अहवालावर संबंधीत अधिका-याच्या स्वाक्ष-या नाहीत.

3) पाणी उद्भव विहिरीची व टंचाईग्रस्त गावाची गटविकास अधिकारी व तहसिलदार यांची संयुक्त पहाणी करुन अंतराचे प्रमाणपत्र देणे आवशययक आहे. परंतु अशी प्रमाणपत्रे संचिकेत नाहीत.

4) ठेकेदाराने पुरविलेले पाणी ग्रामपंचायतीने शुध्दीकरण करुन वापरल्याचे देखील संचिकेत नाहीत.

5) निवड महिन्या व्यतिरीक्त अ.क्र.(1) प्र.क्र.2-माहे 8/2015 रुपये 2,00,668/- (4) प्र.क्र.7-माहे 10/2015 रुपये 1,33,119 (5) प्र.क्र.6-माहे 12/2015 रुपये 7,72,196 (6) प्र.क्र.214-माहे 11/2015 रुपये 10,19,552/- (7) प्र.क्र.14-माहे 7/2015 रुपये 1,74,900/- (8) प्र.क्र.5-माहे 12/2015 रुपये 2,95,594/- (9) प्र.क्र.212-माहे 11/2015 रुपये 4,00,864/- (10) प्र.क्र.211-माहे 11/2015 रुपये 5,07,400/- (11) प्र.क्र.7-माहे 6/2015 रुपये 4,45,796/- असे एकुण रुपये 39,50,089/- एवढया रकमेचे अतिप्रदान झालेले आहे.

**4.263 खाजगी टँकरने टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करण्यातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती केज, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 2,00,54,985/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचे पत्र क्रमांक 20/पा.पु.-14, दिनांक 15/03/2014 मध्ये निर्देशीत केल्यानुसार कंत्राटदाराने पाणी पुरवठयासाठी वापरण्यात येणाऱ्या त्यांचे सर्व टँकर्सवर जी.पी.एस. प्रणाली बसवून घेणे. तसेच जी.पी.एस. उपकरण दुरुस्त ठेवणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. तसेच खाजगी टँकरचे देयक देण्यापुर्वी महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचे पत्र दिनांक 15/03/2014, जिल्हाधिकारी बीड यांचे पत्र क्रमांक जा.क्र.2014/मशाका/कक्ष-3/पीपांट/कावी/2931, दिनांक 20/12/2014 तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचे पत्र दिनांक 16/01/2015 अन्वये जी.पी.एस. यंत्रणेवर नोंदवीलेल्या टँकरचे पाणी पुरवठाच्या अंतराबाबत तसेच नोंद झालेल्या खेपा बाबतच्या अहवालाची तुलना प्रत्यक्षात केलेल्या खेपा व अंतराशी करुन व प्रत्यक्ष खात्री करुन देयकाची अदाई करावी असे निर्देशीत असताना या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी आर.सी.बुक प्रमाणे टँकरची भारवाहन क्षमता प्रमाणित केलेली यादी (उपप्रादेशिक परिवाहन कार्यालय बीड यांचे पत्र क्रमांक जा.क्रं.56/आस्था/उपप्रापका/2017, दिनांक 29/03/2017 आणि पमाणक क्रमांक 65, दिनांक 05/04/2017 पत्रानुसार जिल्हा परिषदेला प्राप्त असलेली) च्या आधारे टँकरचे लॉगबुक्स, संचिका इ. अभिलेख्यावरुन टँकर देयकाच्या प्रदानाची तपासणी केली असता सोबत जोडलेल्या विवरणपत्रा प्रमाणे संबंधीत ठेकेदारास टँकरच्या प्रमाणित भारवाहन क्षमतेपेक्षा जादा भारक्षमतेने टँकरचे प्रतिदिन भाडे व प्रतिदिन प्रति कि.मि. भाडे अदा करण्यांत आल्याने रुपये 2,10,772 + 10,16,048 = 12,26,820/- एकुण रुपये 12,26,820/- चे जादा प्रदान झालेले आहे. तर सदरील रक्कम संबंधीताकडून वसूलपात्र ठरते. विवरणपत्र क्रमांक 03 मध्ये नमुद केलेल्या टँकर क्रमांक MH-27 X 2590, MH-12-F-8799, MH-06 K 6493, MH-44 - 5463, MWE-1531, MH-12 QA 8831, MH-04 P 9499, MH-23-511, MH-10-6983, MH-12 QA 8643, MH-12 QA 9239, MH-21 D 1100, MH-23 5871, MH-23 2637, MH-04 5011, MH-12 Q 9898, MH-12 7000, MH-15 G-7534, MH-23 5086, MH-18 C-7793, MH-12 AU-4539, MH-11 AL-643, MH-14 AS-7498, MH-04 DD-3274, MH-14 V-5729, MH-24 A-2309 या व्यतिरीक्त इतर टँकरची आर.सी.बुक प्रमाणे वाहन क्षमतेबाबतचे अभिलेख उपलब्ध झाले नसल्याने सदरील टँकरचे प्रदान सुयोग्य झाले असल्याबाबत पडताळणी करता आलेली नाही. पंचायत समितीने या प्रदानाची पुन:श खात्री करुन जादा प्रदान झाले असल्यास ते पण वसूल करणे आवश्यक आहे. सदरबाब उदाहरणादाखल असुन आर्थिक वर्षातील सर्व प्रदानांचा आढावा घेवून वरीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्च्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2014/प्र.क्र.48/पापु-14, दिनांक 06/05/2014 अन्वये राज्यातील ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ

घ्यावयाच्या योजना बाबत मार्गदर्शक तत्वे विषद केलेली असुन त्यानुसार पंचायत समिती मार्फत टंचाईग्रस्त गावात टँकर चालू होऊ नये म्हणुन केल्या उपाययोजनेबाबतची माहिती अर्धसमासपत्राव्दारे मागविण्यात आली असता ती सादर करण्यात आली नाही.

4) टंचाईग्रस्त गावांना पुरविलेल्या वाहनाच्या सुस्थितीचे व क्षमतेचे करारनाम्या प्रमाणे व जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार योग्य असल्याबाबतचे तांत्रिक क्षमतेचे शासकीय परिवहन विभाग किंवा जिल्हा परिषद वाहन विभागाचे प्रमाणपत्र संचिकेत नाही. त्यामूळे सुयोग्य क्षमतेने व प्रमाणाचा पाणी पुरवठा झाला याबाबत खात्री करता आली नाही.

5) सर्व वाहनांचे ॲडोमीटर चालू असल्याचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी यांनी दिलेले नाहीत.

6) जिल्हाधीकारी बीड यांचे ओदश दिनांक 11/12/2014 मधील अट क्र.20 अन्वये काही कारणास्तव पाणी पुरवठा बंद असल्यास त्याकालावधीचे भाडे अनुज्ञेय राहणार नाही. तरी विद्युत पुरवठा खंडीत झाल्यामुळे खालील टँकरचा पाणी पुरवठा बंद असतांना त्याची देयके आदा केलेली आहेत. उदा. टँकर क्रमांक MH-27 x - 2090, दिनांक 10/09/2015.

7) टँकरच्या लॉगबुक प्रमाणपत्रावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती केज यांची स्वाक्षरी नाही.

8) टँकर क्रमांक MH-21 /9900 बनसारोळा ते भालगाव खालील कालावधीत महिला प्रतिनिधींची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. दिनांक 02/09/2015 ते 04/09/2015, दिनांक 07/09/2015 ते 08/09/2015, दिनांक 10/09/2015 ते 12/09/2015, दिनांक 15/09/2015 ते 16/09/2015, दिनांक 19/09/2015 ते 20/09/2015, दिनांक 22/09/2015 ते 24/09/2015.

9) टँकर क्रमांक MH-04/ P 9499 कोरेगांव - पाण्याचा उद्भव एकुरका ते ब्रम्हवस्तीचे प्रमाणित अंतर 13 की.मी.चे असतांना लॉगबुकमध्ये 14/ की.मी. म्हणजेच 1 की.मी. जास्त दर्शविण्यात आलेले आहे. त्यामुळे संबंधीतास 60 की.मी. x 13.680 x 1.60 60x21.89 = रुपये 1,313/- चे जादा प्रदान करण्यात आलेले आहे.

10) करारनाम्यानुसार बंद टँकरची टाकी पुर्ण क्षमतेने भरुन नेऊन योग्य पाणी पुरवठा केल्याबाबत तसेच एकुण फेऱ्यांचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी तसेच गावातील सरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य / ग्रामसेवक यांचेकडून घेणे, फेरी नोंदवही ठेवणे इत्यादी अभिलेखे उपलब्ध नसल्याने वरील प्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

11) जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने आदेशीत केलेल्या क्षमतेपेक्षा जास्त क्षमतेच्या टँकरणे पाणी पुरवठा केल्यास आदेशीत केलेल्या क्षमते प्रमाणेच भाडे देण्यात येईल. जास्तीच्या पाणी पुरवठयाचा कोणताही विचार केला जाणार नाही. आदेशीत केलेल्या क्षमतेपेक्षा कमी क्षमतेच्या टँकरणे पाणी पुरवठा केल्यास कोणत्याही प्रकारची देयके दिली जाणार नाही. तथापि, तहसिलदार केज, गटविकास अधिकारी यांनी वरील प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

12) जिल्हाधिकारी बीड यांच्या करार नाम्यातील अट क्रमांक 13 नुसार ज्या दिवशी पाणी वाहतुकीचे कामी टँकर हजर करण्यात येईल. त्यावेळी क्षमतेबाबची प्रमाणपत्रे सादर करण्याची जबाबदारी ही वाहतूक ठेकेदार यांची राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद बीड यांनी प्रस्तुतचे प्रमाणपत्र संबंधीत ठेकेदाराने दाखल केल्याशिवाय त्यांना बीले अदा करुन नयेत. तथापि, गटविकास अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांचे आदेशाप्रमाणे ठेकेदार यांनी पुरविलेले वाहन योग्य त्या तांत्रिक क्षमतेचे असल्याबाबत वाहनांचे आर.सी.बुक इत्यादी कागदपत्रे घेतलेले दिसून आले नाहीत. तथापि, संबंधीत ठेकेदारांनी टँकरच्या वजन स्लिप जोडलेल्या आहेत. परंतु आर सी बुक उपलब्ध न केल्यामुळे टँकरच्या वजनाच्या क्षमतेची खात्री न करता अदाई केलेली आहे.

13) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 3099/प्र.क्र.39/पा.पु-14, दिनांक 01/02/1999 अन्वये टंचाईग्रस्त गावाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात दरडोई किमान 20 लीटर पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे. परंतु टंचाईग्रस्त् गावाचे तहसिलदार यांचे लोकसंख्येच्सया बाबतचे प्रमाणपत्र संचिकेत नही. लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा वाढीव पाणीपुरवठा केलेला नाही. याबाबत पडताळणी करता आली नाही.

14) पाणी पुरवठादारास मंजुरी आदेशानंतर गटविकास अधिकारी यांनी ठेकेदारास व ग्रामस्वच्छता व पाणी पुरवठा समितीस पाणी पुरवठाच्या वेळापत्रक उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. समितीने त्यानुसार पाणी पुरवठा झाल्याचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे. परंतु असे अहवाल संचिकेत आढळुन आले नाहीत.

15) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी जी.पी.एस. प्रणालीचा पासवर्ड वापर करुन टँकरनिहाय विवरण उपलब्ध करुन त्यानुसार त्याची खात्री करुन करारनाम्यानुसार रक्कम अदा होत असल्याची खात्री करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

परंतु देयकात ठेकेदाराने सादर केलेली टँकरची क्षमता व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने प्रमाणित केलेल्या टँकरच्या क्षमतेमध्ये तफावत असल्याचे आढळून येते. त्याप्रमाणे विवरणपत्र क्रमांक 3 मध्ये दर्शविले प्रमाणे ठेकेदारास प्रदान केलेल्या रक्कमेमध्ये व प्रत्यक्षात देय रक्कमेमध्ये रुपये 2,10,772 + 10,16,048 = 12,26,820/- एकुण रुपये 12,26,820/- चे जादा प्रदान झालेले आहे. तर सदरील रक्कम संबंधीताकडून वसूलपात्र ठरते.

**4.264 खाजगी पाणी टँकरने टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा देयकातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती पाटोदा, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 62,51,518/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गुत्तेदाराने केलेल्या पाणी पुरवठ्याचा कालावधी व तहसिलदार / गटविकास अधिकारी यांच्या आदेशामध्ये पाणी टाकण्याची मुदत पहाता बरीच तफ़ावत दिसुन येते. ज्या कालावधीत पाणीपुरवठा केला आहे, त्या काळाचे आदेश नाहीत.

विनापरवानगी पाणी पुरवठा कालावधीचा आदेश लेखापरिक्षणास सादर करणेबाबत अर्धसमास पत्र दिनांक 08/05/2017 अन्वये मागणी करुनही उपलब्ध केलेले नाही. त्यामुळे विनापरवानगी कालावधीचा खर्च रक्कम रुपये 46,79,602/- तात्पुरती अमान्य ठरते. नाळवंडी या गावास पाणी पुरवठायाचे तहसिलदार यांनी दिनांक 10/04/2015 रोजी आदेश दिले आहेत. परंतु पाणी पुरवठायाची मुदत दिली नाही. तहसिलदार यांच्या कोणत्याच आदेशाला जावक क्रमांक नमुद नाही व आदेश झेरॉक्स प्रत आहे. ती प्रत सांक्षकित (Attested) नाही. तसेच प्र.क्र.3,02/01/2016 व प्र.क्र.121,31/03/2016 अन्वये टॅकर / पाणी पुरवठ्याचे आदेश पहावयास मिळाले नाही.

2) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्र.क्र.53/पापु14, दिनांक 30/04/2012 अन्वये अट क्र.2 नुसार पाणी पुरवठा करणा-या टँकर / ट्रकवरील टाकीची पाणी वाहन क्षमता आरटीओ मार्फत प्रमाणीत करुन घ्यावी, असे असताना टाकीचे वजन खाजगी वजन काट्यावर वजन करुन टाकीची क्षमता ठरविली आहे, आरटीओचे प्रमाणपत्र दर्शविलेले नाही, परंतु लेखापरिक्षणास उपलब्ध केलेल्या माहिती नुसार खाजगी वजन काट्यावरचे वजन व आरटीओ ने दर्शवलेली टाकीची क्षमता यात तफ़ावत आहे. त्यानुसार रक्कम रुपये 7,62,022/- जादा अदाई झालेली आहे. सदरबाबी उदाहरणादाखल असुन सर्व प्रकरणांचा सुयोग्य आढावा घेवुन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करणे आवशयक आहे.

3) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1099/प्र.क्र.12/पापु 2014, दिनांक 14/02/1999 मधील परिच्छेद क्रमांक 07 प्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी एक किंवा आवश्यकतेनुसार अधिक तपासणी पथके गठीत करुन त्याकरवी क्षेत्रिय तपासण्या करुन घेतील असे असताना पंचायत समितीकडे तपासणी पथकाचे अहवाल नसल्यामुळे अशा तपासण्या झाल्याबाबत तपासणी करता आली नाही. जिल्हाधिकारी यांच्या आदेशातील अटी व शर्ती नुसार टँकरच्या फे-या निश्चित करण्याकरिता जी. पी. एस. यंत्रणेचा वापर करणे बंधनकारक असतांना वापरले बाबतचे अहवाल व जी. पी. एस. प्रणालीतील अंतर याचा अहवाल उपलब्ध झाला नाही.

4) ताबां राजुरी गावास टॅकर क्र.MH-14 FS-7550 ने दिनांक 29/08/2015 ते 10/09/2015 या काळात 12 दिवस पाणी पुरवठा केला. परंतु देयक 13 दिवसाचे अदा केले आहे. (Log Book मध्ये दिनांक 05/09/2015 ची नोंद नाही) एक दिवसाचे रक्क्म रुपये 2,272/- वसुलपात्र ठरते.

5) लॉगबुक मध्ये उद्धवात, खेपा व गांवात होणाऱ्या बदलास मंजुरी घेतेलेली नाही. उदा. सावरगांव घाटच्या लॉगबुक मध्ये अंतापुर या गावास पाणी पुरवठा केल्याचे नमुद केले आहे. तसेच मंझरी घाटच्या लॉगबुक मध्ये वोंजाळा गांवास पाणी पुरवठा केल्याचे नमुद केले आहे. प्र.क्र.121,31/03/2016 नुसार अंतापुरला दिनांक 05/07/2015 ते 31/07/2015 याकाळात टँकर क्रमांक MH-04 1614 व MH-41 G-5164 अन्वये दिनांक 05/07/2015 ते 10/09/2015 या काळात पाणी पुरवठा केल्याचे नमुद आहे. परंतु अंतापुरला प्रमाणक क्रमांक 02,02/01/2016 अन्वये दिनांक 05/07/2015 ते 10/09/2015 पाणी पुरवठा झालेला आहे. सदर अदाईही दुबार झालेली आहे. या वरील झालेला खर्च रुपये 64,890/- वसुलीस पात्र आहे.

6) डोंमरी या गावाचे टँकरचे लॉगबुक मध्ये दिनांक 26/08/2015 ते 10/09/2015 या काळात 16 दिवसापैकी फक्त 10 दिवस ग्रामसेवक सरपंच व महिलांचे स्वाक्षऱ्या आहेत. तसेच टँकर क्रमांक MH-41 G-5164 च्या लॉगबुकवर दिनांक 01/09/2015 ते 10/09/2015 या काळात फक्त एकच महिलेची स्वाक्षरी आहे.

7) कुसळंब या गावास दिनांक 04/08/2015 ते 26/08/2015 या कालावधीत अंतर 8 किलो मीटर दर्शविले व नंतर दिनांक 27/08/2015 ते 10/09/2015 या काळात अंतर 10 कि.मी. दर्शविले आहे. यास मंजुरी नाही, त्यामुळे जादाच्या 2 कि.मी. वरील खर्च रुपये 1,080/- वसुलपात्र ठरते.

**4.265 खाजगी टँकरने टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करण्यातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती धारुर, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 68,68,306/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी यांचे आदेशातील अ.क्र.13 व 14 नुसार टॉकर ज्यादिवशी पाणी वाहतुकीचे कामी हजर करण्यात येईल त्यावेळी त्यांच्या क्षमतेबाबचे प्रमाणे सादर करण्याची जबाबदारी वाहतुक ठेकेदाराची राहील. तसेच पंचायत समितीकडे आर.सी.बुक झेरॉक्सची प्रत गाडीमालकाचे पॅन कार्ड जमा करणे तसेच टँकर कोणत्या गावी पाणी पुरवठा करीत आहे. या बाबत टँकरच्या काचार गाव नमुद करणे आवश्यक असतानाही पंचायत समितीकडे प्राप्त आर.सी.बुकच्या झेरॉक्स प्रती किंवा आर.सी.बुके लेखापरीक्षणास मागणी करुन ही उपलबध करुन देण्यात आले नाहीत.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी आसर.सी.बुक प्रमाणे टँकरची भार वाहन क्षमता प्रमाणित केलेली यादी. (उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय बीड यांचे पत्र क्रमांक जा.क्र.56/आस्था/उपप्रापका/2017, दिनांक 29/03/2017 आणि पत्र क्रमांक 65, दिनांक 05/04/2017 च्या पत्रानुसार जिल्हा परिषदेला प्राप्त असलेली) च्या आधारे टँकरचे लॉग्बुक, संचिका इ. अभिलेख्यावरुन टँकर देयकाच्या प्रदानाची तपासणी केली असता सोबत जोडलेल्या विविरणपत्रा प्रमाणे संबंधीत ठेकेदारास टँकरच्या प्रमाणित भार वाहन क्षमतेपेक्षा जादा भार क्षेमतेने टँकरचे प्रतिदिन भाडे व प्रति कि.मी.भाडे आदा करण्यात आल्याने अ.क्र.(1)प्र.क्र.6, दिनांक 7/2015 रुपये 95,332/- (2)प्र.क्र.7, दिनांक 10/2015 रु.209834 (3) प्र.क्र.8 दिनांक 12/2015 रुपये 50,895/- असे एकुण रुपये 3,56,061/- एवढया रकमेचे अतिप्रदान झालेले असुन ते वसुल पात्र ठरते. तसेच प्र.क्र.6/दिनांक 7/2015 अन्वये प्रदान केलेल्या देयकातील टँकर क्र.MH-23 E26 MTB 3876, MH-31 M 8911, प्र.क्र.7-10/2015 अन्वये प्रदान केलेल्या देयकातील टँकर क्र.MH23-E26, MTB 3876, MH-31 M 8911, MH-44-5644 व प्र.क्र.8-12/2015 अन्वये प्रदान केलेल्या देयकातील टँकर क्रमांक MH-44–5644, MTB-3876 या सर्व टँकरचे आर.सी.बुक प्रमाणे वाहनक्षमते बाबतचे अभिलेखे उपलबध झाले नसल्याने सदरील टँकरचे पदान सुयोग्य झाले असल्या बाबत पडताळणी करता आली नाही. पंचायत समितीने या प्रदानाची पुन:श खात्री करुन जादा प्रदान झाले असल्यास ते पण वसुल करणे आवश्यक आहे. सदरबाब उदाहरणा दाखल असून यापूर्वीच्या वर्षातील व या वर्षातील सर्व प्रदानांची खात्री करून नियमानुसार सुयोग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 2013/प्र.क्र.41/पापु-14, दिनांक 04/01/2014 व महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा स्वच्छता विभागाचे पत्र जावक क्रमांक टंचाई प्र.क्र.20/पापु-

14, दिनांक 15/03/2014 निर्देशित केल्यानुसार टँकरवर GPS प्रणाली बसवुन त्याचे नियंत्रक, उपकरण जिपीएस प्रणालीचे नोडल अधिकार यांचेकडे बसुन घेवून सदर संगणकीय प्रणालीद्वारे टँकर फे-यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. जिपीएस प्रणालीवरुन टँकर फे-याच्या अंतराबाबतच्या अहवालावर संबंधीत अधिका-याच्या स्वाक्ष-या नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2014/प्र.क्र.48/पापु14, दिनांक 06/05/2014 अन्वये राज्यातील ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या योजने बाबत मार्गदर्शकतत्वे विशद केलेली असुन त्यानुसार पंचायत समितीमार्फत टंचाईग्रस्त गावात टँकर चालु होवु नये म्हणून केलेल्या उपाययोजने बाबतची माहिती लेखापरिक्षणास उपलबध झाली नाही.

5) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई-1002/प्रक्र290/पापु-14, दिनांक 19/09/2002 नुसार टँकर/ इतर वाहनाने पाणी पुरवठा मंजूर झाल्यानंतर प्रत्यक्षात ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार व विहित प्रामाणात प्रत्यक्षात गांव वाडीला पाणी पुरवठा होतो किंवा नाही. व त्यांच्या देखभालीसाठी ग्रामपंचायत पातळीवर पाणीपुरवठा स्वच्छता समिती स्थापन करणे यावर देशरेख ठेवणे तसेच पाणी पुरवठा करताना काही गैरप्रकार होत असल्यास ते शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करणे आवश्यक आहे. पाणी पुरवठादारास मंजूरी आदेशानंतर गटविकास अधिकारी यांनी ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस पाणी पुरवठयाच्या तारीखनिहाय वेळापत्रक प्रत्येक दिवशी टँकरच्या किती फे-या होतील, टँकरची क्षमता किती असेल इ. तपशिलवार वेळापत्रक तयार करुन त्याची प्रत प्रत्येक आठवडयाच्या सुरुवातीस संबंधीत गावाच्या ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीस उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. समितीने त्यानुसार पाठी पुरवठा झाल्याचे प्रत्येक आठवडयाच्या शेवटी गटविकास अधिकारी, तहसिलदार यांच्याकडे प्रमाणपत्र सादरकरणे आवश्यक आहे व सदर प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच टँकरच्या बिलाचा आदाई करण्यात यावी असे शासन आदेश आहेत. तथापि सदरचे अहवाल संचिकेत आढळून आले नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 3099/प्र.क्र.39/पापु14, दिनांक 01/02/1999 अन्वये टंचाईग्रस्त गावाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात दरडोई किमान 20 लीटर पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे. परंतु टंचाईग्रस्त गावाचे तहसिलदार यांचे लोकसंख्येच्या बाबतचे प्रमाणपत्र संचिकेत नाही. लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा वाढीव पाणी पुरवठा केलेला नाही. याबाबत पडताळणी करता आली नाही.

7) पाणी उद्भव विहिरीची व टंचाईग्रस्त गावाची गटविकास अधिकारी व तहसिलदार यांची संयुक्त पहाणी करुन अंतराची प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. परंतु अशी प्रमाणपत्रे संचिकेत नाही.

8) लॉगबुकातील नोंदीवर स्पीडोमिटरच्या नोंदी नाहीत. त्यामुळे प्रदानातील किमी योग्य असल्याबाबतचे खातर जमा करता आली नाही.

9) ठेकेदाराने पुरविलेली पाणी ग्रामपंचायतीने शुध्दीकरण करुन वापरल्याचे देखील संचिकेत नहीत.

10) प्रपत्र ब भुवैद्यानिक यांनी स्थळ पहाणी करुन प्रत्येक जलस्तोत्र / उद्भवाचे ठिकाणाचे पाहणी प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. परंतु असे प्रमाणपत्र संचिकेत आढळून आले नाही.

**4.266 टंचाई काळात टँकरने पाणीपुरवठा करण्यातील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती परभणी, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती परभणी यांनी 2015-16 या वर्षात टँकर अधिग्रहित करून पाणीपुरवठा करण्यावर 3 प्रमाणकान्वये रककम रुपये 28,95,600/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अधिग्रहित केलेल्या वाहनाची साठवण क्षमता उपविभागीय परिवहन अधिकारी यांच्याकडून प्रमाणित केल्याबाबतचे अभिलेखे अधिग्रहण आदेशासोबत दिसून आले नाही.

2) टँकरद्वारे, कोटंबवाडी, टाकळी कुंभकर्ण, ब्रह्मपुरी तर्फे पाथरी, नांदखेडा, अंगलगाव वसाहत, साळापुरी तांडा / वसाहत / पारधी तांडा, पिंगळी बाजार, धर्मपुरी, माळसोन्ना व सिंगणापूर या 10 गावांना टँकरने पाणीपुरवठा केल्याचे उपलब्ध अभिलेख्यांवरून दिसून येते. परंतु यापैकी ब्रह्मपुरी, धर्मापुरी व साळापुरी ही 4 गावे वगळता इतर 6 गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबतचे तहसीलदार यांचे आदेश संचिकेत दिसून आले नाहीत.

3) संबंधीत ठेकेदारांच्या देयकातून 2 टक्के दराने TDS कपात केला नसल्याचे प्रमाणकावरून दिसून येते. सबब रुपये 28,95,600/- इतक्या रकमेच्या 2 टक्के म्हणजे रुपये 57,912/- संबंधीत ठेकेदाराकडून वसूल करून योग्य त्या लेखाशीर्षकाखाली जमा करावी.

4) उपलब्ध 4 आदेशांपैकी ब्रह्मपुरी वगळता इतर गावांसाठी अधिग्रहित केलेल्या टँकरच्या आदेशांमध्ये पाण्याच्या उद्भव स्थानाचा उल्लेख नाही. त्यामुळे देयक सादर करताना ठेकेदाराने टँकरची जेवढी धाव दर्शविली आहे. तेवढी धाव घेण्याची खरोखरच आवश्यकता होती किंवा नाही, याची तपासणी करता आली नाही.

5) सदर योजने अंतर्गत खाजगी टँकरद्वारे विविध गावांना केलेल्या पाणीपुरवठ्यासाठी गावनिहाय वापरण्यात आलेल्या टँकरच तपशील दर्शविला आहे. त्यामध्ये 09 वाहनांपैकी (क्र.1 व क्र.09 च्या गावासाठी एकच वाहन वापरले आहे) क्र.1,3,6 व 8 क्रमांकाची वाहने वगळता इतर 5 वाहनांचे log book व history sheet लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात न आल्यामुळे वाहनांच्या खेपांची तसेच log book मध्ये दर्शविलेल्या वेळेत त्या खेपा पूर्ण करणे शक्य होते किंवा नाही याची तपासणी करता आली नाही.

6) सदर योजनेच्या e-tendering चे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

7) क्रमांक 1 च्या टँकरद्वारे माळसोन्ना या गावास दिनांक 18/11/2015 ते 22/02/2016 या कलावधीत व कोटंबवाडी या गावास दिनांक 21/11/2015 ते 30/01/2016 या कालावधीत पाणीपुरवठा केल्याचे दिसून येते. त्यापैकी दिनांक 21/11/2015 ते 30/01/2016 ह्या 71 दिवसांच्या कालावधीत सदर टँकरद्वारे एकाच दिवशी दोन्ही गावांना पाणीपुरवठा केल्याचे दिसून येते. या दोन्ही गावांच्या आदेशामध्ये पाण्याच्या उद्भव स्थानाचा उल्लेख नसल्यामुळे या दोन्ही गावांना एकाच वेळी पाणीपुरवठा करणे शक्य होते किंवा कसे,याची लेखापरीक्षणास तपासणी करता आली नाही.

**4.267 2245- नै.आ.पाणीटंचाई निवाणार्थ खाजगी टँकरवर केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती पाथरी, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती पाथरीचे सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात टंचाई अंतर्गत खाजगी टँकरने उन्हाळी पाणीपुरवठा केला असून जिल्हाधिकारी परभणी यांनी केलेल्या करारनामानुसार प्रमाणक क्रमांक 185, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 4,24,864/- खाजगी टँकर भाडे पोटी प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी परभणी यांचे आदेशान्वये ठराविक भाडे रूपये 1,824/- व प्रती कि मी प्रती टन रूपये 2 प्रमाणे टॅकंर क्षमता 12,000 लिटरचे प्रतिदिन भाडे मंजुर असुन मंजुरीची निविदा प्रक्रीया जिल्हाधिकारी स्तरावरून पार पाडण्यात आली असुन याबाबत अभिलेखे पहावयास मिळाले नाही.

2) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई 1005/प्र.क्र.305/पा.पु.14, दिनांक 24/01/2006 परिच्छेद ब (6) नुसार टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या गावास प्रत्यक्षात पाणीपुरवठा होतो किंवा कसे हे पाहणे आवश्यक असल्याने संबंधीत गावाला टँकर उपलब्ध करून दिल्यानंतर वेळच्या वेळी टँकर पोहचला असल्याबाबत टँकर गावात पोहचल्याची वेळ व तारीख याची लॉगबुकमध्ये नोंद करणे आवश्यक आहे. अशा नोंदी घेतलेल्या नाहीत. तसेच नियोजित खेपा होत असल्याबाबत प्रत्येक खेपेच्या वेळी त्या गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नियुक्त केलेल्या दोन महिला सदस्याची स्वाक्षरी घेतलेली नाही.

3) खाजगी वाहनाचे आर.सी.बुक लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्यामुळे टँकर पाणी क्षमतेची खात्री करता आली नाही. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी प्रमाणीत केलेली वाहन क्षमतेबाबत अभिलेखे दर्शविले नाहीत. तसेच वाहनाचे स्पिडोमिटर चालु न ठेवता स्पिडोमिटर प्रमाणे अंतर दर्शविले नसुन गावाचे प्रमाणीत अंतर नमुद केले आहे. खाजगी वाहनाचे विहीत नमुन्यात लॉगबुक ठेवलेले नाही.

4) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्रक्र.12/पापु-14, दिनांक 03/02/1999 नुसार तपासणी पथक गठीत करून क्षेत्रीय तपासण्या करण्यात आल्याचे अहवाल संचिकेत नाही.

**4.268 पंचायत समिती जिंतूर खाजगी टँकर व विहीर अधिग्रहण प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती जिंतूर, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती जिंतूर सन 2015-2016 मध्ये विहीर अधिग्रहण व खाजगी टँकर अधिग्रहण मोबदला प्रदान केलेल्या प्रमाणकापैकी लेखापरीक्षणाचे निवड महिन्यातील खर्चाचे अनुषंगाने रुपये 29,94,504/- एकूण 48 प्रमाणकांचे लेखापरीक्षण करण्यात आले, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र भूजल अधिनियम 1993 अन्वये सतत तीन वर्षापेक्षा जास्त एकाच विहीरीचे अधिग्रहण झाले असेल तर उपविभागीय अधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी यांनी विहीरीची पाहणी करावयाची आहे. पंचायत समिती परभणी यांनी अधिग्रहण केलेल्या विहीरी / बोअर तीन वर्षापेक्षा जुन्या अधिग्रहीत असल्याची माहिती दर्शविली नाही. तसेच विहीर / बोअर ज्यांच्या मालकीची आहे, त्याबाबतचे 7/12 पुरावा दर्शविला नाही. त्यामुळे अधिग्रहण केलेल्या अशा विहीरींची खात्री करता आली नाही.

2) अधिग्रहण केलेल्या विहीर / बोअर तलाठी, मंडळनिरीक्षका मार्फत विहीर गांवाच्या सर्वात जवळ अंतरावर असल्याचे प्रमाणीत करावयाचे आहे. त्यानंतर तहसिलदार यांनी स्वत:विहीर गावाच्या जवळ असल्याची व पाणीपुरवठा होऊ शकेल याची खात्री करुन तसे आदेशात नमुद करणे आवश्यक आहे. परंतु असे प्रमाणपत्र दिलेले दिसून आले नाही. त्यामुळे गावाजवळची विहीर अधिग्रहण करुन त्यांनाच रक्कम प्रदान केल्याची खात्री करता आली नाही.

3) विवरणपत्रातील अ.क्र.30 प्रमाणक क्रमांक 864/03.2016 रुपये 36,400/- व अ.क्र.43 प्रमाणक क्रमांक 877/03.2016 रुपये 36,400/- हे दिनांक 01/03/2015 ते 30/05/2015 या एकाच कालावधीसाठी श्री रघुनाथ बालचंद्र राठोड यांना दुबार प्रदान करण्यात आले आहे.

4) विवरणपत्रातील अ.क्र.1,2 व 28 अन्वये रुपये 3,76,380 + रुपये 97,924 = रुपये 4,74,304/- रक्कम खाजगी टँकर अधिग्रहणाची प्रदान करण्यात आली असुन सदर रक्कमेतुन आयकराची रुपये 9,771/- रक्कम कपात करण्यात आलेली नाही,

5) विवरणपत्रातील अ.क्र.28 प्रमाणक क्रमांक 858/03.2016 रुपये 9,00,000/- रक्कम खाजगी टँकर अधिग्रहणाबाबतची श्री ओमप्रकाश कुंदनमल कोटेचा यांना वाटप केली असुन जिल्हाधिकारी परभणी यांनी निश्चित केलेल्या दरापेक्षा जादा दराने गणना करुन प्रदान केलेली असुन उपलब्ध अभिलेख्याप्रमाणे प्रत्यक्षात रास्त दराने गणना केल्यास एकूण रुपये 84,698/- अतिप्रदानीत रक्कम निश्चीत होत आहे.

**4.269 टंचाई काळात टँकरने पाणीपुरवठा करण्यातील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती गंगाखेड, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** पंचायत समिती गंगाखेड यांनी 2015-2016 या वर्षात टँकर अधिग्रहित करून पाणीपुरवठा करण्यावर 22 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 75,16,844/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अधिग्रहित केलेल्या वाहनाची साठवण क्षमता उपविभागीय परिवहन अधिकारी यांच्याकडून प्रमाणित केल्याबाबतचे अभिलेखे अधिग्रहण आदेशासोबत दिसून आले नाही.

2) संबंधीत ठेकेदारांच्या देयकातून 2.3 टक्के दराने TDS कपात केला नसल्याचे प्रमाणकावरून दिसून येते. सबब रुपये 75,16,844/- इतक्या रकमेच्या 2.3 टक्के म्हणजे रुपये 1,72,887/- संबंधीत ठेकेदाराकडून वसूल करून योग्य त्या लेखाशीर्षकाखाली जमा करावी.

3) तहसीलदार यांच्या आदेशांमध्ये संबंधीत टँकरद्वारे नेमका किती कलावधीसाठी पाणीपुरवठा करावयाचा आहे. याचा उल्लेख नाही. त्यामुळे संबंधीत गावाला खरोखरच पाणीपुरवठा करावयाची आवश्यकता होती किंवा नाही, याची तपासणी करता आली नाही.

4) सदर योजनेच्या e-tendering चे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

5) निवड महिन्यात 22 गावांना खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्याबाबत प्रमाणके उपलब्ध आहेत. परंतु तहसीलदार यांनी निर्गमित केलेल्या आदेशात पाणीपुरवठा करावयाच्या टँकरचा RTO passing क्र.,त्याची क्षमता व

ठेकेदाराला ज्या दराने अदायी करावयाची आहे. त्याचा दर नमूद केलेला नाही. त्यामुळे योग्य दराने अदायी झाल्याचे प्रमाणित करता येत नाही.

**4.270 2245 उन्हाळी पाणीपुरवठा टंचाई निवारणा अंतर्गत योजनेतील अनियमिततेबाबत व झालेल्या जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती पालम, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती पालमच्या सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात पंचायत समितीने खालील प्रमाणकाद्वारे निवड महिन्यात 2245-उन्हाळी पाणीपुरवठा टंचाई निवारणा अंतर्गत या लेखाशिर्षाखाली पाणी टंचाई निवारणार्थ शासकीय टँकर इंधन व दुरुस्ती व खाजगी टँकर वाहतूक भाडेकरीता रक्कम रुपये 12,79,318/-, वाहन चालक व स्वच्छक यांच्या प्रवास भत्ता व अतिकालिक भत्ताकरीता रक्कम रुपये 15,69,150/- व बोअर व विहीर अधिग्रहण खर्चाकरीता रक्कम रुपये 41,53,600/- असे एकुण रक्कम रुपये 70,02,068/- एवढा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 94 अन्वये वाहनात भरलेल्या इंधनाच्या नोंदी नमुना नं.37 वाहनाच्या रोजवही (लॉग बुक) मध्ये घेऊन, त्या नोंदी वाहन वापरणारे अधिकारी यांनी तपासून दर महिन्याला त्या आशयाचे प्रमाणपत्र त्यावर नोंदून ठेवतील. असे असताना शासकीय टँकर मध्ये भरलेल्या इंधनाच्या नोंदी लॉग बुक मध्ये दिसून आल्या नाहीत. त्यामुळे सदर रक्कम रुपये 69,170/- संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

2) प्रमाणक क्रमांक 123, दिनांक 23/03/2016 अन्वये 150 लिटर डिझेलवर खर्च नोंदविलेला आहे. सदर पावतीवर वाहन क्रमांक MTD-7464 मध्ये 150 लिटर डिझेल भरल्याचे नमूद आहे. परंतु सदर वाहन हे शासकीय टँकर नसतांना सदर देयकाची अदाई मात्र पंचायत समितीने केलेली आहे.

3) लेखा संहिता 1968 मधील नियम 83(3) नुसार वाहन दुरुस्तीच्या उपप्रमाणकावर गटविकास अधिकारी यांनी प्रमाणपत्र नोंदविले आहे. त्या प्रमाणपत्रावर मात्र लॉगबुक मधील पृष्ठ क्रमांक नमूद केलेली आहेत. मात्र लॉग बुक व इतिहास पुस्तिकेमध्ये दुरुस्तीच्या नोंदी दिसून आल्या नाहीत. तेव्हा गटविकास अधिकारी यांनी कोणत्या आधारे प्रमाणपत्र नोंदविले याबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. तसेच लेखासंहिता 1968 मधील नियम 95 (1) नुसार वाहनाची दुरुस्ती आवश्यक असलेचा वाहन चालकाचा दुरुस्तीबाबतचा लेखी अर्ज नाही. तसेच लेखासंहिता 1968 मधील नियम 95 (3) नुसार रुपये 1,000/- पेक्षा कमी रकमेच्या दुरुस्तींच्या बिलांचे परिनिरीक्षण कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद यांनी करणे आवश्यक आहे. पंचायत समितीने कोणतीच विहित प्रक्रिया अवलंबिली नाही. सदरील खर्चाची रक्कम रुपये 27,170/- संबंधिताकडून वसूल होणे आवश्यक आहे.

4) प्रमाणकांची तपासणी केली असता सदरील प्रमाणकासंबंधीचे देयक, खर्चाचे मंजुरी आदेश, देयकातील पावत्या या सर्व प्रक्रिया एकाच दिवशी झालेल्या असताना लेखा शाखेने देखील त्याच दिवशी देयके पारित करून देयकांचे नियमबाहृय प्रदान केलेले आहे.

5) शासकीय टेंकरच्या रोजवही (लॉग बुक) तपासले असता लॉग बुक मध्ये फक्त ग्रामसेवक यांच्या स्वाक्षऱ्या दिसून आल्या. संबंधीत गावातील सरपंच, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे सदस्य व महिला प्रतिनिधी यांच्या स्वाक्षऱ्या लॉग बुक मध्ये दिसून आल्या नाहीत.

6) शासकीय टेंकरच्या बाबतीत - (i) अधिग्रहित विहीर/बोअर ते पाणीपुरवठा करावयाचे ठिकाण हे अंतर बांधकाम विभागाकडून प्रमाणित करून घेतलेले नाही. त्यामुळे दर्शविलेले अंतर योग्य असल्याबाबतची पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

7) अ.क्र.17 मधील प्रमाणक क्रमांक 359, दिनांक 31/03/2016 अन्वये शाकेर मुसा पटेल यांना खाजगी टेंकर वाहतूक भाडेपोटी रक्कम रुपये 7,34,884/- चे प्रदान केलेले आहे. सदर देयकातून 2.24 टक्के आयकराची रक्कम रुपये 16,461/- संबंधीताकडून वसूल करून आयकर खाती भरणा करणे आवश्यक आहे.

8) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-3498/प्र.क्र.-167/पापु-14, दिनांक 27/08/1999 अन्वये पिण्याच्या पाण्याचा पुरवठ्यासाठी उपलब्ध करण्यात आलेल्या शासकीय टँकर्सच्या चालकांना अतिकालिक भत्ता अनुज्ञेय केलेला आहे. त्यात स्वच्छकचा (क्लिनरचा) उल्लेख नाही. परंतु पंचायत समितीने शासकीय टँकर वरील स्वच्छक (क्लिनर) यांना नियमबाह्य अतिकालिक भत्याचे प्रदान केलेले आहे. त्यामुळे रक्कम रुपये 5,28,190/- चे जादा प्रदान संबंधीतांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

9) प्रमाणक क्रमांक 128 अन्वये श्री.जी.ए.कदम, स्वच्छक यांना माहे जुलै 15 चा अतिकालिक भत्ता रुपये 6,220/- प्रदान केलेला आहे. त्यानंतर प्रमाणक क्रमांक 353 अन्वये देखील श्री.जी.ए.कदम-स्वच्छक यांना माहे जुलै 15 ची अतिकालिक भत्याची रक्कम रुपये 6,220/- दुबार प्रदान केलेली आहे. तरी दुबार प्रदानाची रक्कम रुपये 6,220/- संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

10) विहित मर्यादेपेक्षा जास्त रक्कमेचे रोख रकमेत प्रदान करू नये असे स्पष्ट निर्देश असताना पंचायत समितीने सदर बाबीकडे दुर्लक्ष करून निवड महिन्यात इंधन व दुरुस्ती तसेच प्रवास भत्ता व अतिकालिक भत्याचे संबंधीतास रक्कम रुपये 21,13,584/- चे रोखीने प्रदान केलेले आहे. तरी सदर कृती ही नियमबाह्य असून ती वित्तीय औचीत्यांच्या तत्वांचे पालन न करणारी आहे.

11) पंचायत समितीने नैसर्गिक आपत्ती अंतर्गत बोअर व विहीर अधिग्रहित केलेल्या मालकांना पाण्याच्या मोबदल्यापोटी प्रचलित शासन निर्णयानुसार मंजूर दराने रक्कमा प्रदान केलेल्या आहेत. परंतु संबंधीची अभिलेखे, नोंदवह्या, संचिका व लेखापरीक्षणास आवश्यक असलेली अनुषंगिक अभिलेखे / माहिती लेखापरीक्षणात सादर करणेविषयी वारंवार तोंडी व अर्धसमास पत्र क्रमांक 14, दिनांक 24/4/2017 व अर्धसमास पत्र क्रमांक 23, दिनांक 05/05/2017 अन्वये लेखी मागणी करूनही सादर केलेली नाहीत.

12) प्रमाणक क्रमांक 251, दिनांक 31/03/2016 अन्वये श्री.पाराजी मारोती सपुरे या बोअर मालकाला रुपये 46,800/- चे प्रदान केलेले आहे. परंतु सदर प्रमाणकाचे देयक हे रुपये 34,400/- चे असून मंजुरी आदेश देखील रुपये 34,400/- चेच आहेत. त्यामुळे रक्कम रुपये 12,400/- चे जादा प्रदान झालेले आहे. ते वसूल करण्यात यावे.

**4.271 उन्हाळी पाणीपुरवठा विहिर अधीग्रहणाचे प्रदानातील अनियमितता व जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती पुर्णा, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती पुर्णाचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत विहीर अधीग्रहणापोटी 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 23,40,400/- प्रदान केल्याचे दिसुन आले. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्र.क्र.12/पा.पु-14, दिनांक 03/02/1999 अन्वये तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी टंचाईग्रस्त गावांची पाहणी करुन अहवाल जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावयाचे आहे. परंतु अहवालाची प्रत सादर न केल्यामुळे टंचाईग्रस्त गांवे, वाडी / तांडे महाराष्ट्र भुजल अधीनियम 1993 च्या कलम 4 अन्वये टंचाईग्रस्त जाहीर केल्याची खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र भुजल अधिनियम 1993 अन्वये सतत तीन वर्षापेक्षा जास्त एकाच विहीरीचे अधिग्रहण झाले असेल तर उपविभागीय अधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी यांनी विहीरीची पाहणी करावयाची आहे. पंचायत समिती पुर्णा यांनी अधिग्रहण केलेल्या विहीरी तीन वर्षापेक्षा जुन्या अधिग्रहीत असल्याची माहिती दर्शविली नाही. त्यामुळे अधिग्रहण केलेल्या अशा विहीरींची खात्री करता आली नाही.

3) अधिग्रहण केलेल्या विहीरी तलाठी, मंडळ निरीक्षकामार्फत विहीर गावांच्या सर्वात जवळ अंतरावर असल्याचे प्रमाणीत करावयाचे आहे. त्यानंतर तहसिलदार यांनी स्वत:विहीर गावाच्या जवळ असल्याची व पाणीपुरवठा होवु शकेल याची खात्री करुन तसे आदेशात नमुद करणे आवश्यक आहे. परंतु तसे प्रमाणपत्र दिलेले नाही. त्यामुळे गावाजवळची विहीर अधिग्रहण करुन त्यांनाच रक्कम प्रदान केल्याची खात्री करता आली नाही. याबाबत अभिलेख्यासह अनुपालन अहवाल सादर करावा.

4) महाराष्ट्र पाणीपुरवठा अधिनियम 1983, दिनांक 15/04/1983 चे कलम 11 (2) मधील (ब) प्रमाणे प्रत्येक व्यक्ती अथवा कुटूंब यांना किती पाण्याची आवश्यकता आहे, याची परिगणना करुन याबाबतच्या

अहवालानुसार पाण्याचे स्त्रोत निश्चीत करणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारचा अहवाल प्रमाणकासोबत जोडला नाही. त्यामुळे अधिग्रहण केलेल्या विहीरीतून गावास योग्य प्रमाणात पाणीपुरवठा झाल्याबाबतची खात्री उक्त नमुद अहवालाशिवाय करता आला नाही.

5) लेखापरीक्षणामध्ये प्रमाणक क्रमांक 36 व 139 ची तपासणी करता अनियमिततांबाबत रक्कम रुपये 2,04,000/- जादा प्रदान झाले आहे. सदर जादा प्रदानाची वसूली करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

6) लेखापरीक्षणात प्रमाणक क्रमांक 139 च्या संदर्भात सादर लाभार्थ्यांच्या संचिका तपासल्या असता श्रीमती गयाबाई विजय तनपुरे, महातपुरी, श्री.देवराव आबाजी शिंदे, मरसुल, श्री.दिगांबर राजाराम वैद्य, आडगाव(ला), श्री.गजानन प्रल्हाद दुधाटे, देउळगाव दुधाटे यांचे सातबारा/नमुना नंबर आठ अ वर विहीर / बोअर असल्याबाबत नोंद आढळुन आली नाही त्यामुळे संबंधीताकडे विहिर/बोअर असल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1008/प्र.क्र.05/पापु 14, दिनांक 25/03/2008 अन्वये खाजगी विहीर अधीग्रहीत केल्यानंतर त्या विहीर मालकाने पाणी काढण्यास विदयुत पंप व विदयुत कनेक्शनसह साधन सामुग्री उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तरच सुधारीत आदेशानुसार रुपये 400/- प्रतिदिन मोबदला अनुज्ञेय आहे. तथापि लेखापरीक्षणात सादर केलेल्या संचिकांमध्ये अशी प्रमाणपत्रे अथवा संबंधीत विहीर मालकाचे नावे सदरील विहीरीवर विदयुत कनेक्शन असल्याबाबत विदयुत बिले आढळुन आली नाहीत. असे असतानाही सरसकट सर्वांना रुपये 400/- प्रतिदिन मोबदला प्रदान करण्याबाबत खुलासा होणे व सर्वांची विदयुत बिले दर्शवणे आवश्यक आहे.

8) उक्त दिनांक 25/03/2008 चे शासन निर्णयाप्रमाणे संबंधीत विहीर मालकांशी मोबदल्यासंदर्भात करारनामे करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केल्याचे आढळुन आले नाही.

### 4.272 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकरने पाणीपुरवठा केलेल्या प्रदानातील अनियमितता व जादा प्रदानाबाबत.

**पंचायत समिती पुर्णा, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती पुर्णाचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात 2245 नैसर्गिक आपत्ती उन्हाळी पाणीपुरवठा अंतर्गत खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्याबाबत खाजगी टँकर वाहतुक ठेकेदार यांना 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 49,91,730/- प्रदान केल्याचे दिसुन आले आहे.

1) उपरोक्त प्रदानाच्या संदर्भात सादर संचीकेची तपासणी केली असता सदरील टँकर्स 12,000 लिटरचे असल्याचे दर्शवून प्रदान केले आहे. तथापि सदरील खाजगी वाहनाचे आर.सी.बुक लेखापरीक्षणात उपलब्ध न केल्यामुळे टँकरच्या पाणी क्षमतेची पडताळणी करता आली नाही.

2) लेखापरीक्षणात सदरील टँकर्सची लॉगबुके सादर केली नाहीत. देयकासोबत केवळ दररोज सदरील टँकरने किती अंतर प्रवास केला त्याचे Distance Summery Reports जोडले आहेत. ज्यावरुन केवळ सदरील टँकर त्यादिवशी किती अंतर चालले हेच नमुद आहे. कोणत्या गावापासुन / उद्भवापासुन पाणीपुरवठा करावयाच्या गावाचे अंतर किती आहे याचा बोध होत नाही.

3) शासन परिपत्रक क्रमांक टंचाई-1005/प्र.क्र.305-पापु-14, दिनांक 24/01/2006 तसेच तहसिलदार पुर्णा यांचे आदेशानुसार टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या गावास प्रत्यक्षात पाणीपुरवठा होतो किंवा कसे हे पाहणे आवश्यक असल्याने संबंधीत गावाला टँकर उपलब्ध करुन दिल्यानंतर वेळच्या वेळी टँकर पोहचला असल्याबाबत टँकर गावात पोहचल्याची तारीख व वेळ याची लॉगबुकमध्ये नोंद करणे आवश्यक आहे. तसेच नियोजीत खेपा होत आहेत किंवा नाही व प्रत्येक खेपेच्या वेळी त्या गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नियुक्त केलेल्या दोन महिला सदस्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. तथापि अशी नियुक्तीबाबत अभिलेखे संचीकेत आढळून आली नाहीत. तसेच लॉगबुकाअभावी संबंधीतांच्या स्वाक्ष-या घेतल्या किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही.

4) उक्त प्रमाणकांची व विहिर अधीग्रहणाच्या प्रमाणकांची तपासणी केली असता सारख्याच गावात खाजगी टँकरने व विहीर अधीग्रहणाच्या माध्यमातुन पाणीपुरवठा केल्याचे दर्शवले आहे. तथापि, टँकर पाठविण्याच्या आदेशामध्ये कोणत्या नगरासाठी / भागासाठी खाजगी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. याबाबत उल्लेख केलेला नाही. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य पाणीपुरवठा झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

5) जिल्हाधिकारी यांचे उपरोक्त आदेशानुसार दर निश्चीत केलेले असताना प्रत्यक्षात प्र.क्र.10 ची तपासणी केली असता त्यात रुपये 1,812/- प्रतिदिन ऐवजी जादा दराने प्रदान केल्यामुळे रुपये 89,469/- चे जादा प्रदान झाले आहे. ते संबंधीताकडुन वसुल करुन शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे. तसेच आयकराची दुबार परिगणना करुन त्याप्रमाणे आयकराची रक्कम निश्चीत करणे आवश्यक आहे.

6) प्रमाणक क्रमांक 186 ची तपासणी केली असता, जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त दराने तसेच विहिर अधिग्रहण कालावधी संपलेनंतरही पाणीपुरवठा केलेचे दर्शवून रक्कम रुपये 11,95,991/- चे जादा प्रदान केलेले आहे. ते वसूल करावे.

7) प्रमाणक क्रमांक 128 ची तपासणी केली असता जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त दराने पाणीपुरवठाचे देयकाचे प्रदान केलेमुळे रक्कम रुपये 6,97,162/- चे अतिप्रदान झालेले आहे. ते वसूल करावे.

8) ताडकळस, देउळगाव दुधाटे, ईटलापुर माळी, खंडाळा, पिंपळा(लो), कळगाववाडी, एकरुखा, ईस्माईलपुर व आलेगाव सौराते साठी खाजगी टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी सदरील कालावधीत विहीरच अधीग्रहण केलेली नव्हती त्यामुळे सदर गावांना सदरील कालावधीत खरोखरच खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा केल्याची पडताळणी करता येत नाही. सदरील गावांना देयकात दर्शवलेल्या कालावधीत कोठून पाणीपुरवठा करण्यात आला याची खात्री पटवावी अन्यथा सदरील गावांसाठी प्रदान करण्यात आलेली जादा प्रदानाची रक्कम परिगणीत करुन शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

9) काही देयके दिनांक 28/03/2016 रोजी पारीत केलेली आहेत. मात्र सदर देयकामधील मागणी ही दिनांक 31/03/2016 रोजी मंजुर केलेली आहे व त्या मागणीमध्ये एप्रिल 2016 ची मागणीचाही समावेश आहे. याबाबत खुलासा व्हावा.

**4.273 हातपंप सुटे भाग खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,98,328/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदा प्रसिध्दी कालावधी, प्राप्त निविदा व करारनामा बाबत अभिलेखे लेखापरीक्षणात उपलब्ध करण्यात आलेले नाही.

2) साहित्य पुरवठा आदेश संबंधीतास दिनांक 18/12/2015 च्या आदेशान्वये देण्यात आला असून संबधीतांची आदेशाची प्रत संचिकेतच पडून आहे. तेव्हा आदेश कशाचे आधारे दिला याबाबत खुलासा व्हावा. पुरवठा आदेशात साहित्य व किमतीचा कोणत्याही तपशील नमूद केलेला नाही.

3) पुरवठादाराने नोंदणी प्रमाणपत्रात संबधीताचे धंद्याचे स्वरूप इलेक्ट्रीकल्स साहित्याचे असून त्यांनी हातपंपाचे सुटे भाग पुरविण्याबाबतचे निविदा कशी मंजूर करण्यात आली.

4) हातपंपाची सुटे भागाची मागणी असलेली संचिका / नोंदवही व साठावही दर्शविली नाही. तेव्हा कशाचे आधारे मागणी केली. तसेच साहित्य वापरली गेली याबाबतची नोंदवही ठेवल्याचे दर्शविले नाही.

5) हातपंप दुरुस्ती केल्याने त्याचे जुने साहित्य ठेवल्याची नोंदवही ठेवण्यात आली असल्याची दर्शविली नाही.

6) पुरवठा आदेशात साहित्याचा पुरवठा सात दिवसात न केल्यास 10 टक्के दंडाची तरतूद आहे. परंतु चलनावर दिनांक नमूद नसल्याने साहित्य पुरवठा मर्यादित कालावधीत झाला असल्याची खात्री पटली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 प्रमाणे साहित्याचा चाचणी अहवाल घेतलेला नाही. त्यामूळे साहित्याचा दर्जा गुणवत्ता असल्याचे व पुरवठा अटीची पुर्तता झाल्याची पडताळणी करता आली नाही.

**4.274 उन्हाळी पाणीपुरवठा करिता शासकीय टँकरवर केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती नांदेड, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती नांदेड सन 2015-2016 च्या माहे 2/16 व 3/16 च्या प्रमाणकांच्या तपासणीत उन्हाळी पाणीपुरवठा करिता शासकीय टँकर च्या इंधन देयकांवर रक्कम रूपये 6,93,227/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1099/प्र.क्र.12/पा.पु.14, दिनांक 03/02/1999 तसेच शासन निर्णय क्रमांक टंचाई 1008/प्र.क्र.89/पा.पु.14, दिनांक 02/08/2008 अन्वये तहसीलदार व गटविकास अधिकारी यांनी टंचाई ग्रस्त गावांची प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल लेखापरीक्षणास न दर्शविल्यामुळे टंचाईग्रस्त गावांची योग्य निवड झाल्याबाबतची पडताळणी करता आली नाही. तसेच टंचाईग्रस्त गावे, वाड्या / तांडे, महाराष्ट्र भूजल अधिनियम 1993 च्या कलम 4 अन्वये टंचाईग्रस्त जाहीर केल्याची खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 1099/प्र.क्र.12/पापु-14, दिनांक 03/02/1999 प्रमाणे पावसाळा संपल्यानंतर जिल्ह्याच्या वरिष्ठ भू-वैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी भूजल बाबतीत आवश्यक त्या सर्व बाबींचा अभ्यास करुन संबंधीत गावाच्या / वाड्याच्या 1.5 किमी. च्या परिसरातील सार्वजनिक उद्भवातून दरडोई दर दिवशी 20 लिटरपेक्षा कमी पाणी उपलब्ध होण्याची शक्यता असणाऱ्या गावांची यादी तयार करुन तहसिलदार व गटविकास अधिकारी यांच्या संयुक्त अहवालासह जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवून गावाची निवड बाबतचे आदेश व अहवाल दर्शविण्यात आलेले नाही.

3) प्रमाणक क्रमांक 25,16/03/2016 नुसार उपप्रमानकांची अदाइ करण्यात आली. सदर प्रमाणकाकरिता गट विकास अधिकारी यांचे खर्च मान्यता आदेश दिनांक 17/03/2016 चे आहेत. त्यापूर्वीचे देयक / प्रमाणक दिनांक 16/03/2016 ला पारित केले आहे.

4) प्रमाणक क्रमांक 69,31/03/2016 अन्वये पारित करण्यात आलेल्या देयकात संलग्न असलेल्या खर्च प्रमाणकांची नोंद संबंधीत लॉग बुक MHQ 3890 मध्ये घेण्यात आली नाही.

5) प्रमाणक क्रमांक 63,30/03/2016 व प्रमाणक क्रमांक 70,31/03/2016 अन्वये MTB 3708 या टँकर वर खर्च केल्याचे संबंधीत उपप्रमाणकांच्या (5018,29/03/2016 व 5110,31/03/2016) तपासणीत निदर्शनास आले तथापि संबंधीत MTB 3708 या टँकर च्या लॉग बुकची तपासणी केली असता पृष्ठ क्रमांक 32 ते 35 वर नमूद केल्याप्रमाणे टँकर दिनांक 21/03/2016 ते 31/03/2016 व पुढे 04/04/2016 पर्यंत दुरुस्ती साठी असल्याचे नमूद आहे. व पृष्ठ क्रमांक 33 वर उपरोक्त देयकान्वये खरेदी केलेले इंधन MWP 6473 या वाहनास देण्यात आल्याचे नमूद केले आहे. याबाबत संबंधीत वाहनास सदर इंधन देण्याचे प्रयोजन लॉग बुक अथवा संबंधीत संचिकेत नमूद केले नाही. टँकर दुरुस्तीच्या कामाकरिता असताना त्याच टँकर चा उल्लेख उपप्रमाणकावर करून इंधन का खरेदी करण्यात आले, याचा खुलासा करावा व खरेदी केलेले इंधन ज्या वाहनाकरीता देण्यात आले त्याचा वापर कोणत्या प्रयोजनाकरिता करण्यात आला ? याचा खुलासा करून खर्चाच्या योग्यतेची खात्री पटवून अनुपालन दर्शवावे. तोपावेतो रक्कम रुपये 19,672/- लेखापरीक्षणात तात्पुरती अमान्य ठेवण्यात येते.

6) टँकरद्वारे पुरवठा केलेल्या पाण्याची गुणवत्ता तपासून त्याचा तयार केलेला अहवाल तसेच पाणीपुरवठा करण्यापूर्वी टँकर स्वच्छ धुवून ब्लिचिंग पावडरचा वापर केले बाबतचा अहवाल / तपशील संबंधीत संचिकेत आढळून आला नाही.

7) टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या जिल्हाधिकारी नांदेड यांच्या आदेश दिनांक 01/12/2015 मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती क्रमांक 4 नुसार दोन महिला सदस्यांच्या टँकर प्राप्त झाल्याबाबत प्रत्येक टँकर फेरीसाठी लॉग बुक वर सह्या घेणे आवश्यक असताना MHB 3708, MTB 7048, MHQ 4768, MHQ 3890 या टँकर च्या

लॉग बुकच्या तपासणीत एका दिवशी दोन महिला सदस्यांच्या सह्या घेण्यात आल्या आहेत. तथापि प्रत्येक फेरीकरिता महिला सदस्यांच्या सह्या घेतल्याचे निदर्शनास आले नाही. सबब जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

**4.275 हातपंप सुटे भाग खरेदीतील अनियमितता.**

**पंचायत समिती कंधार, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती कंधारचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणास प्रमाणक क्रमांक 2, दिनांक 27/3/2016 अन्वये रक्कम रुपये 99,450/- चे हातपंपाचे सुटे भाग खरेदी केल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, दिनांक 17/06/1986 च्या अधिसूचनेनुसार जिल्हा परिषदेने ग्रामीण पाणीपुरवठा योजना देखभाल व दुरुस्ती विशेष निधी स्थापन करावयाचा असून सदर निधीतून ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असताना पंचायत समिती उपकरातून सुटेभाग खरेदी केल्यामुळे पंचायत समितीच्या उत्पनाची साधने विचारात घेता लोककल्याणकारी योजना राबविण्यास निधी अपुरा पडतो व अशा योजनापासून लाभार्थी वंचित राहतात. तरी याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) किती हातपंप नादुरुस्त होते. याबाबत ग्रामपंचायतीचा अर्ज तसेच नादुरुस्त हातपंप पैकी कोणते हातपंप दुरुस्त करणे गरजेचे आहे. याबाबतचा अभियांत्रिकी विभागाचा अहवाल लेखापरीक्षणास,दर्शविला नाही.त्यामुळे साहित्य खरेदी योग्य प्रमाणात केल्याबाबत खात्री करता आली नाही.

3) हातपंप दुरुस्ती मध्ये नादुरुस्त सुटे भाग बदलून नवीन सुटेभाग बसविली. परंतु जुन्या सुटेभागांची काय विल्हेवाट लावली याबाबतची निरुपयोगी साहित्याची साठा नोंदवही लेखापरीक्षणास दर्शविली नाही.

4) साठ नोंदवही नमुना नं.33 विहीत नमुन्यात ठेवलेली नाही. साठा नोंदवहीची तपासणी केली असता खरेदी केलेल्या बकेट वाशेर (1000 नग) पैकी लेखापरीक्षण कालावधीपर्यंत 942 नग शिल्लक आढळून आले.तसेच ball bearing-200 नग खरेदी पूर्णपणे शिल्लक आहे. यावरून गरज नसताना अनावश्यक खरेदी केले असल्याचे दिसून येते.

**4.276 हातपंप सुटेभाग खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती देगलूर, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती देगलुर सन 2015-2016 मध्ये प्रमाण क्रमांक 1, दिनांक 02/03/2016, रुपये 49,500/- श्रीराम एजन्सी ॲन्ड अटोमोबाईल्स नांदेड पावती क्रमांक 674, प्रमाणक क्रमांक 2, दिनांक 02/03/2016 रुपये 49,900/- श्रीराम एजन्सी ॲन्ड अटोमोबाईल्स नांदेड यांच्याकडुन हातपंप सुटेभाग खरेदी पंचायत समिती उपकरातुन केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रमाणकानुसार एकुण रुपये 99,400/- ची साहित्य खरेदी एकाच दिनांकात वेगवेगळ्या प्रमाणकानुसार एकाच पुरवठा दाराकडुन करण्यात आलेली आहे.

2) पंचायत समिती देगलुर यांनी स्थानिक तीन पुरवठादारास पत्र देवुन दर पत्रके मागुन त्यातील कमी दराच्या पत्रकास मंजुरी देवुन साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. यानुसार साहित्य खरेदी करताना कार्यवाही केलेली नाही.

3) समितीने ग्रामपंचायत निहाय मागणी प्राप्त करुन घेवुन खरेदी करणे आवश्यक होते. तथापि पंचायत समितीने अशी कार्यवाही न करता खरेदी केल्याचे दिसुन येते.

4) महाराष्ट्र जिल्हापरीषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 83 (03) नुसार संबंधीत विभागाने खरेदी केलेल्या वस्तुचा दर्जा आणि योग्यता याची पडताळणी करुन खरेदी पुर्व न चुकता मान्यता प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. यानुसार कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हापरीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 91 नुसार गटविकास अधिकारी यांनी दर सहा महिन्याने साहित्य साठ्याची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु साठा नोंदवही न दर्शविल्याने यानुसार कार्यवाही केल्याबाबत तपासणी करता आली नाही.

6) खरेदी केलेले साहित्य कोणत्या हातपंपास बसवले आहे, याचा अहवाल ग्रामसेवक / सरपंच यांच्याकडुन प्राप्त करुन घेतलेला नाही. त्यामुळे साहित्य विनियोगाची खात्री होत नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, दिनांक 17/06/1986 च्या अधिसुचनेनुसार जिल्हा परीषदेने ग्रामीण पाणीपुरवठा योजना देखभाल व दुरुस्ती विशेष निधी स्थापन करावयाचा असुन सदर निधीतुन ग्रामीण पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असतांना पंचायत समिती उपकरातुन सुटेभाग खरेदी केल्यामुळे पंचायत समितीच्या उत्पन्नाची साधने विचारात घेता लोककल्याणकारी योजना राबविण्यास निधी अपुरा पडतो. अशा योजनांपासुन लाभार्थी वंचीत राहतात.

**4.277 उन्हाळी पाणी पुरवठा प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती लोहा, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती लोहा सन 2015-2016 निवड महिन्यात 4 प्रमाणकानुसार रक्कम रुपये 3,99,49,622/- उन्हाळी पाणी पुरवठा खाजगी टँकर गुत्तेदारांना रक्कमा प्रदान करण्यात आलेल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त पाणी पुरवठा प्रमाणकाची तपासणी केली असता असे दिसुन आले की, ज्या गावांना पाणी पुरवठा करावयाचा आहे. त्या गावांना टँकरने पाणी पुरवठा केला आहे. परंतु देयकासोबत जिल्हाधिकारी यांचे मुळ मंजुर आदेशपत्र जोडलेले नाही.

2) उपरोक्त प्रमाणकात जिल्हाधिकारी यांच्या दिनांक 18/01/2016 च्या टँकर आदेश पत्रावर जावक क्रमांक व तसेच जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

3) आक्षेप बाब क्रमांक 3 ते 9 मधील टँकरने पाणीपुरवठा केल्याच्या नोंदी लॉगबुकात नसल्याने रक्कम रुपये 3,30,635/- अतिप्रदानाची वसूली करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

**4.278 हातपंप सुटे भाग खरेदीतील अनियमितता.**

**पंचायत समिती नायगांव, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती नायगावचे सन 2015-2016 चे प्रमाणक क्रमांक 5, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 59,940/- चे हातपंपाचे सुटे भाग खरेदी केल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग दिनांक 17/06/1986 च्या अधिसूचनेनुसार जिल्हा परिषदेने ग्रामीण पाणीपुरवठा योजना देखभाल व दुरुस्ती विशेष निधी स्थापन करावयाचा असून सदर निधीतून ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असताना पंचायत समिती उपकरातून सुटेभाग खरेदी केल्यामुळे पंचायत समितीच्या उत्पनाची साधने विचारात घेता लोककल्याणकारी योजना राबविण्यास निधी अपुरा पडतो व अशा योजनापासून लाभार्थी वंचित राहतात. तरी याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) किती हातपंप नादुरुस्त होते. याबाबत ग्रामपंचायतीचा अर्ज तसेच नादुरुस्त हातपंप पैकी कोणते हातपंप दुरुस्त करणे गरजेचे आहे. याबाबतचा अभियांत्रिकी विभागाचा अहवाल लेखापरीक्षणास, दर्शविला नाही. त्यामुळे साहित्य खरेदी योग्य प्रमाणात केल्याबाबत ,खात्री करता आली नाही.

3) हातपंप दुरुस्ती मध्ये नादुरुस्त सुटे भाग बदलून नवीन सुटेभाग बसविली. परंतु जुन्या सुटेभागांची काय विल्हेवाट लावली. याबाबतची निरुपयोगी साहित्याची साठा नोंदवही लेखापरीक्षणास दर्शविली नाही.

**4.279 पाणी टंचाई टँकर भाडे अदायी देयकातील अतिप्रदान रक्कमेबाबत.**

**पंचायत समिती कळंब, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती कळंब सन 2015-2016 या वित्तीय वर्षातील पाणी टंचाई टँकर अदायीच्या रक्कमांच्या प्रदानांची देयके पडताळणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती कळंब यांनी प्रमाणक क्रमांक 14,1,2,3,4,5,6,7 चे लेखापरिक्षण केले असता वाहन टँकरच्या लॉगबुकात पाणीपुरवठा केलेल्या फेरींच्या किलोमिटरच्या नोंदी नसतांनाही जादा भाडे रक्कम रुपये 87,675/- आदा करणेत आलेले आहे. सदर जादा अदाई वसूल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

2) तरी वरील प्रमाणे टँकरचे देयक तपासणीमध्ये काही लॉगबुकवर प्रत्येक पानावर अथवा सुरुवातीस गाडी नंबर टाकने आवश्यक आहे परंतु तसे केलेले नाही. त्याचप्रमाणे पाणी कोठून घेतलेले आहे याचा उल्लेख केलेला दिसून येत नाही.

3) वरील प्रमाणकांसोबत जोडणेत आलेल्या लॉगबुकाचे लेखापरीक्षण करतांना वाहन बंद असतांनाही बंद कालावधीमधील भाडे आदा करणेत आले आहे. वाहन बंद असतांना ज्यादा आदा केलेली रक्कम रुपये 3,69,844/- वसूल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

4) पाणीपुरवठा करावयाच्या टँकरची क्षमतेपेक्षा जादा लिटर क्षमता दाखवून रक्कम रुपये 77,754/- जादा आदाई झाली असल्याने रक्कम रुपये 77,754/- वसूल करुन शासन सदरी भरणा करावी.

5) GPS प्रमाणीनुसार व लॉगबुकाला घेणेत आलेल्या नोंदींची तपासणी करता तफावत असून GPS नुसार किलोमिटर भाडे अदा करणे आवश्यक असतांना जादा किलोमिटर एकूण रक्कम रुपये 48,196/- जादा अदाई झालेली आहे. सदर जादा अदा रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करावी.

6) प्रमाणक क्रमांक 02 दिनांक 12/01/2016

अ) मौ.मोहा-3 येथील टँकरचे दि.24/05/2015 ची जीपीएस नोंद आहे. परंतु लॉगबुकला नोंद नाही.

ब) मौ.नागझरवाडी येथील टँकरचे दि.29/07/2015 ची जीपीएस नोंद आहे. परंतु लॉगबुकला नोंद नाही.

7) प्रमाणक क्रमांक 03 दिनांक 12/01/2016

अ) मौ.ताडगांव येथील वाहनाचे लॉगबुक नाही. म्हणून दैनिक भत्ता अदायीबाबत खात्री करता आली नाही.

8) प्रमाणक क्रमांक 05, दिनांक 12/01/2016 अन्वये लोहटा पं - देयकासोबत लॉगबुकची प्रत जोडले नसल्यामुळे दिवसासाठी अदायी झालेल्या रक्कमेबाबत खात्री करता आली नाही.

9) प्रमाणक क्रमांक 06, दिनांक 12/01/2016 अन्वये आदा केलेल्या मौजे आडसुळवाडी, गौर-1, गौर-2, परतापूर, कन्हेरवाडी, नायगांव चे अभिलेखे तपासणी केली असता जी.पी.एस प्रणालिचा तपशिल, लॉगबुक न लिहिणे, देयकासोबत लॉगबुक प्रत न जोडणे, टँकर क्षमता नमुद न करणे इत्यादी कारणांनी आदा करणेत आलेल्या रक्कमांची खात्री करता आली नाही. तसेच वाहन क्रमांक एमडब्ल्युपी-8708 या टँकरची क्षमता 12000 लिटर असतांना 13000 लिटर क्षमता प्रमाणे अदायी करण्यांत आलेली आहे. त्यामुळे दैनिक भाडे रक्कम रुपये 12,636/- व कि.मी भाडे रक्कम रुपये 25,514/- अशी एकुण रक्कम रुपये 38,150/- ची जादा अदायी करण्यांत आलेली आहे.

10) प्रमाणक क्रमांक 07, दिनांक 12/01/2016 अन्व्ये आदा केलेल्या परतापूर, करंजकल्ला, कन्हेरवाडी चे अभिलेखे तपासणी केली असता जी.पी.एस प्रणालीचा तपशिल जोडण्यांत आलेला नाही व सोबत लॉगबुक प्रतीवर कि.मी नमुद केलेले नसल्यामुळे कि.मी भाडे रक्कम आदा करणेत आली आहे.

**4.280 2245-नैसर्गिक आपत्ती अंतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती उदगीर, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती उदगीरचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात 2245-नैसर्गिक आपत्ती या लेखाशिर्षात विहीर, बोअर अधिग्रहणावर एकुण रुपये 1,87,33,858/- खर्च नोंदवलेला आहे. याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-2012/प्र.क्र.53/पापु-14, दिनांक 30/04/2012 नुसार खाजगी विहिर अधिग्रहीत केल्यानंतर त्या विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विद्युत /

डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामग्री उपलब्ध करुन दिली नसल्यास प्रती दिन रुपये 300/- या कमाल मर्यादेत व विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विद्युत / डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामग्री उपलब्ध करुन दिली असल्यास प्रती दिन रुपये 400/- कमालमर्यादेत विहिर अधिग्रहण मोबदला देण्यात यावा असे आदेश आहेत. सदर आदेशाच्या अनुषंगाने पंचायत समितीने लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यांची तपासणी केली असता अधिग्रहित केलेल्या विहिर / बोअर मालकाने वरीलप्रमाणे विद्युत / डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन साम्रगी उपलब्ध करुन दिल्याबाबत संबंधिताचे विद्युत देयक / डिझेल पंपाच्या क्रमांकासह मोका तपासणीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाही. विहिर मालकांना रुपये 400/- प्रती दिन विहिर अधिग्रहण मोबदला दिलेला योग्य असल्याबाबतची लेखापरीक्षणाची खात्री पटवावी. तसेच उपलब्ध अभिलेख्यावरुन अधिग्रहित करण्यात आलेल्या विहिरीतील पाणी उपसा बंद असताना सुध्दा अदायी करण्यात आलेली आहे किंवा नाही याबाबत खात्री पटवावी.

2) जिल्हाधिकारी आणि संबंधीत ठेकेदार यांचे मधील करारनाम्यातील अट क्रमांक 19 प्रमाणे टँकर पुरवठा क्षमताचेबाबत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी दिलेले योग्यता प्रमाणपत्र (Fitness Certificate) जोडण्यात आलेले नाही.

3) पाणीपुरवठा केलेल्या टँकर्सचे लॉग बुक वरील दर्शविण्यात आलेले अंतर व जीपीएस प्रणालीवरुन घेतलेल्या अहवालावरील अंतर यांचा ताळमेळ घेतला असता ज्यादा अंतराचे प्रदान केल्याचे दिसून येते. रक्कम रुपये 2,85,194/- चे वसूली करण्यात यावी. सदर जादा प्रदान हे निवड महिन्यातील असून इतर महिन्यातील असे जादा प्रदान झाले नसल्याबाबतचे खात्री पटवावी अन्यथा झालेले प्रदान हे वसूलात आणून अनुपालन दर्शवावे.

4) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्र.क्र./पापु-14, दिनांक 03/02/1999 नुसार, टँकरची मागणी आलेल्या गावांची यादी भूवैज्ञानिक यांचेकडून तपासणी करुन त्यांचे विहित नमुन्यातील प्रपत्र-ब घेतल्याचे अभिलेखे संचिकेत दिसून आले नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1008/प्र.क्र.05/पापु-14, दिनांक 25/03/2009 नुसार अधिग्रहित केलेल्या विहिर / बोअरवर विद्युत पंप असणे आवश्यक आहे. परंतु विद्युत पंपाच्या नोंदी संबंधीत विहीर मालकाचे 7/12 उताऱ्यावर नाहीत. तसेच अनेक विहिर/बोअर यांच्याही नोंदी 7/12 उताऱ्यावर नाहीत. तलाठी यांचे विहिर / बोअर असल्याबाबतचे स्वतंत्र प्रमाणपत्र जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे संबंधितास झालेली अदाई योग्य असल्याची खात्री करता आलेली नाही. सदर नोंदी दर्शवून अनुपालन दर्शवावे.

6) शासन निर्णय क्रमांक टंचाई-1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 नुसार मुद्दा क्रमांक 7 नुसार उद्भव नोंदवही ठेवून अधिग्रहित केलेल्या विहिर / बोअर वरुन पाणीपुरवठा नियमित होत असल्याची खात्री पर्यवेक्षिय यंत्रणेने वेळोवेळी भेटी देवून केलेल्याबाबत उपलब्ध केलेल्या अभिलेख्यावरुन दिसून आले नाही. तसेच विहिर / बोअर अधिग्रहणासंबंधी देयके प्रदान करताना देयकांस मासिक पाणीपुरवठा अहवाल जोडला नाही.

7) विहिर / बोअर अधिग्रहणापूर्वी पाणी पिण्यायोग्य असल्याबाबत आरोग्य विभागाचे प्रमाणपत्र जोडलेले नाही.

8) देयकांचे दुबार प्रदान होऊ नये. यास्तव दुबार प्रदान प्रतिबंध नोंदवही ठेवली नसल्याने देयकांचे दुबार प्रदान झाले नसलेबाबत खात्री पटवावी.

9) पाणी पुरवठा करण्याचे ठिकाण ते उद्भवाचे ठिकाण यामधील अंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केल्याबाबत प्रमाणपत्र नसल्याने अंतर वाढीने अतिप्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पाणी पुरवठा करण्याचे ठिकाण ते उद्भवाचे ठिकाण यामधील अंतर योग्य असल्याबाबत खात्री पटवावी.

10) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-3099/प्र.क्र.126/ पापु-14, दिनांक 16/06/2012 नुसार ज्या गावात / वाडयात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली आहे. व जेथे दरडोई दर दिवशी 20 लिटर पेक्षा कमी पाणी मिळते अशा ठिकाणी यापुढे एक किलोमीटर च्या परिसरात पिण्याच्या पाण्याच्या कोणताही स्त्रोत / उद्भव नसल्यास तेथे पेयजल टंचाई जाहिर करुन पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निर्माण झालेली आहे. व जेथे दरडोई दर दिवशी 20 लिटर पेक्षा कमी पाणी मिळते अशा ठिकाणी यापुढे एक

किलोमीटर च्या परिसरात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ विहित निकषानुसार आवश्यक उपाययोजना राबविण्याचे आदेश आहेत. उक्त अटीचे पालन झाल्याची खात्री पटवावी.

11) तहसिलदार यांनी टँकरव्दारे पाणी पुरवठा तथा बोअर व विहिर अधिग्रहण करणेबाबतच्या दिलेल्या आदेशामध्ये अधिग्रहणाचा अंतिम दिनांक नमूद नाही. तसेच पाण्याचे प्रथम उद्भवाचे ठिकाण ते पाणी पुरवठा करण्याचे ठिकाण यामधील अंतर अंदाजे नमूद केले आहे. तसेच उद्भवाचे ठिकाण बदलल्याचे तहसिलदार यांचे आदेशामध्ये पाणी पुरवठा करण्याचे ठिकाण ते उद्भवाचे ठिकाण यामधील अंतर नमूद नाही. यावरुन प्रत्यक्ष अंतराची खात्री न करताच आदेश दिलेले असल्याने जादा प्रदानाची शक्यता नाकारता येत नाही. देयकात नमूद अंतराबाबत खात्री पटवावी.

12) तहसिलदार यांचे आदेशात अधिग्रहित विहिर / बोअरचे सर्व्हे क्रमांक नमूद नाही.

13) तहसिलदार यांनी अनेक प्रकरणी अधिग्रहणाचे पुर्वीलक्षी प्रभावाने आदेश दिलेले आहेत. तरी पुर्वीलक्षी प्रभावाने पाणी पुरवठा असलेबाबत अभिलेखे दर्शविण्यात यावे.

14) विहिर तथा बोअर अधिग्रहित मालकांना प्रदान करण्यात आलेले रकमेचे पोच संचिकेत आढळून आली नाही.

15) जी.पी.एस. अहवाल सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रमाणित करण्यात आलेला नाही.

16) टँकर बंद असून टँकरचे भाडे अदा करण्यात आले आहेत. टँकर कोणत्या कारणास्तव बंद होता याबाबतचे अभिलेखे दर्शवावे. तसेच टँकर मालकाच्या चुकी / दुरुस्तीमुळे टँकर बंद असेल तर रक्कम वसूलात आणावी आणि जर शासकीय कारणास्तव असेल तर तसे अभिलेखे दर्शवावे. त्याचप्रमाणे तहसिलदारांनी मंजूर केलेल्या कालावधीचे टँकर भाडे संबंधितास प्रदान झालेबाबत खात्री पटवावी.

17) करारनाम्यातील अट क्रमांक 13 व 15 प्रमाणे कार्यवाही झाल्याची खात्री पटवावी.

**4.281 विहीर / बोअर अधिग्रहण देयक प्रदानात दुबार अदायीबाबत.**

**पंचायत समिती रेणापूर, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदरबाबत रक्कम रूपये 4,45,600/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई 2012/प्र.क्र.53/ पा.पु.14, दिनांक 30/04/2012 अन्वये खाजगी विहीर / बोअर अधिग्रहीत केल्यानंतर त्या विहीर मालकाने पाणी काढण्यासाठी विधूत / डिझेल पंप व विधूत कनेक्शनसह साधन सामुग्री करून दिली असल्यास प्रतिदिन रुपये 400/- विहीर / बोअर अधिग्रहण मोबदला देय आहे. परंतु उपरोक्त प्रमाणकान्वये एकाच कालावधीतील वेगवेगळया प्रमाणकान्वये संबंधीत शेतक-यांना दुबार प्रदान झाले आहे. याबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित करून रक्कम रुपये 21,200/- वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन दर्शवावे.

2) सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या निवड महिन्याच्या लेखापरीक्षण व्यतिरिक्त इतर महिन्यामध्ये अशा प्रकारची दुबार अदाई झाली नसल्याबाबत पंचायत समिती स्तरावर अंतर्गत लेखापरीक्षणामार्फत लेखापरीक्षण करून दुबार अदाई झाली नस्त्या प्रमाणित करून तसे प्रमाणपत्र घेवून अनुपालन दर्शवावे.

3) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1099/प्र.क्र.12/पापु-14, दिनांक 03/02/1999 व टंचाई/1008/प्र.क्र.89/पापु-14, दिनांक 27/08/2008 नुसार पंचायत समिती स्तरावरील कोणती गावे टंचाईग्रस्त आहेत. यास्तव आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती तालुक्यातील गावाचा आढावा घेऊन टंचाईग्रस्त घोषीत केल्याचे अभिलेखे संचिकेत नाहीत. त्यामुळे गावे टंचाईग्रस्त असल्याची खात्री पटली नाही.

4) शासन निर्णय क्रमांक टंचाई-3099/प्र.क्र.39/पापु-14, दिनांक 01/02/1999 व दिनांक 15/02/2003 च्या शासन निर्णयानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात पाणीपुरवठा करणे आवश्यक असताना विहीर / बोअर अधिग्रहण करताना सदरील निकषाचे पालन केलेले नाही.

5) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-1008/प्र.क्र.05/पापु 014, दिनांक 25/03/2009 नुसार अधिग्रहीत केलेल्या विहीर / बोअरवर विद्युतपंप असणे आवश्यक आहे. परंतु विद्युत पंप असल्याचे 7/12 उतारावर नोंदी नाहीत. त्यामुळे करण्यात आलेली अदाई योग्य असल्याची खात्री पटत नाही.

6) शासन निर्णय क्रमांक टंचाई-1005/प्र.क्र.305/पापु-14, दिनांक 24/01/2006 मुद्दा क्रमांक 7 नुसार उदभव नोंदवही ठेवून अधिग्रहीत केलेल्या विहीर / बोअर वरुन पाणीपुरवठा नियमित होत असल्याची खात्री वेळोवेळी भेटी देवून करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

7) सर्व अधिग्रहन कर्त्याचे करारनाम्यावर गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

8) सदर अधिग्रहीत विहीर व बोअर मध्ये टिसीएल पावडर नियमित टाकण्यात येते प्रमाणपत्र आहे. परंतु त्यावर सरपंचाच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

9) तहिसलदार यांचे आदेशात सदर विहीर / बोअरचे सर्व्हे क्रमांक नमूद नाही. तसेच आदेशावर जावक क्रमांक दिनांक नमूद नाही. त्यामुळे आदेश कधी प्राप्त झाले याचा बोध होत नाही. सदर अधिग्रहीत केलेल्या विहीरी / बोअर अधिग्रहण कालावधी हा या सर्व प्रक्रियेतील दिनांकापूर्वीचा असल्याचे यावरुन दिसून येते. म्हणजेच अधिग्रहण दिनांकानंतर सर्व कार्यालयीन प्रक्रिया कागदोपत्री पुर्ण केल्याचे दिसून येते.

**4.282 नैसर्गिक आपत्ती अंतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती देवणी, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती, देवणीचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात 2245-नैसर्गिक आपत्ती या लेखाशिर्षात विहीर,बोअर अधिग्रहणावर एकुण रुपये 65,32,347/- खर्च नोंदवलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-2012/प्र.क्र.53/पापु-14, दिनांक 30/04/2012 नुसार खाजगी विहिर अधिग्रहीत केल्यानंतर त्या विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विद्युत / डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन साम्रगी उपलब्ध करुन दिली नसल्यास प्रती दिन रुपये 300/- या कमाल मर्यादेत व विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विद्युत / डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामग्री उपलब्ध करुन दिली असल्यास प्रती दिन रुपये 400/- कमालमर्यादेत विहिर अधिग्रहण मोबदला देण्यात यावा असे आदेश आहेत.

सदर आदेशाच्या अनुषंगाने पंचायत समितीने लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यांची तपासणी केली असता अधिग्रहित केलेल्या विहिर/बोअर मालकाने वरीलप्रमाणे विद्युत/डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन साम्रगी उपलब्ध करुन दिल्याबाबत संबंधिताचे विद्युत देयक /डिझेल पंपाच्या क्रमांकासह मोका तपासणीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाही. विहिर मालकांना रुपये 400/- प्रती दिन विहिर अधिग्रहण मोबदला दिलेला योग्य असल्याबाबतची लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

2) जिल्हाधिकारी आणि संबंधीत ठेकेदार यांचेमधील करारनाम्यातील अट क्रमांक 19 प्रमाणे टँकर पुरवठा क्षमतेबाबतचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी दिलेले योग्यता प्रमाणपत्र (Fitness Certificate) जोडण्यात आलेले नाही.

3) पाणीपुरवठा केलेल्या टँकर्सचे लॉगबुक वरील दर्शविण्यात आलेले अंतर व जीपीएस प्रणालीवरुन घेतलेल्या अहवालावरील अंतर यांचा नमुनादाखल ताळमेळ घेतला असता ज्यादा कि.मी. / अंतराचे प्रदान झालेले दिसून येते. अशी ज्यादा प्रंदानाची रक्कम रुपये 15,389/- वसूल करुन शासन खाती जमा केलेचे अनुपालन सादर करावे.

सदर जादा प्रदान हे निवडक महिन्यातील असून इतर महिन्यांतही असे जादा प्रदान झाले नसल्याबाबतचे खात्री पटवावी. अन्यथा झालेले प्रदान हे वसूलात आणून अनुपालन दर्शवावे.

4) श्री.पिरसाब उस्मानसाब सय्यद रा बटनपूर यांना 03 दिवसांचे रुपये 400/- प्रति दिन दराने ज्यादा प्रदान केलेली रक्कम रुपये 1,200/- वसूलपात्र करुन अनुपालन सादर करावे.

5) श्री व्यंकट भिमराव बोडके यांना ज्यादा प्रदानाची रक्कम रुपये 1,000/- तात्काळ वसूलात आणून शासन खाती भरणा केलेचे अनुपालन सादर करावे.

6) प्रमाणक क्रमांक 309, दिनांक 31/03/2016 रक्कम रुपये 30,000/- द्वारे, श्री गजेंद्र बळवंतराव पाटील यांना विहिर अधिग्रहणापोटी रुपये 400/- प्रतिदिन दराने x 75 दिवसासाठी (16/01/2016 ते 30/03/2016) रुपये 30,000/- ची अदाई केलेली आहे. तथापि, सदर प्रमाणकांशी संलग्न संचिका पाहता मूळ प्रस्ताव श्री गजानन बळवंत पाटील यांचे नावे मंजूर असून तहसिलदार देवणी यांनी त्यांचे आदेश दिनांक 06/01/2016 अन्वये श्री गजानन पाटील यांचे विहिर अधिग्रहणास मंजूरी दिलेली आहे. सबब, उक्त रक्कम रुपये 30,000/- योग्य लाभार्थ्याला न दिलेने चुकिचे प्रदान झालेचे सकृतदर्शनी दिसून येते. तरी यांबाबत खुलासा करुन योग्य प्रदान करावे व अनुपालन सादर करावे.

7) तहसिलदार यांचे आदेशात अधिग्रहित विहिर / बोअरचे सर्व्हे क्रमांक नमूद नाहीत. तसेच अनेक आदेशांमध्ये पाणी पुरवठा करण्याचे ठिकाण ते उद्भवाचे ठिकाण यामधील अंतर नमूद नाही. यावरुन प्रत्यक्ष अंतराची खात्री न करताच आदेश दिलेले असल्याने जादा प्रदानाची शक्यता नाकारता येत नाही. देयकात नमूद अंतराबाबत खात्री पटवावी.

8) विहिर तथा बोअर अधिग्रहित मालकांना प्रदान करण्यात आलेले रकमेचे पोच संचिकेत आढळून आली नाही.

9) जी.पी.एस. अहवाल सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रमाणित करण्यात आलेला नाही.

10) काही दिनांकास टँकर बंद असून टँकरचे भाडे अदा करण्यात आले आहेत. टँकर कोणत्या कारणास्तव बंद होता याबाबतचे अभिलेखे दर्शवावे. तसेच टँकर मालकाच्या चुकी/दुरुस्तीमुळे टँकर बंद असेल तर अदा केलेली रक्कम वसूलात आणावी. आणि जर शासकीय कारणास्तव असेल तर तसे अभिलेखे दर्शवावे. अन्यथा रक्कम रुपये 70,668/- वसूलात आणून अनुपालन दर्शवावे.

11) दिनांक 18/03/2016 व 24/03/2016 या दोन दिवशी टँकर बंद असून टँकर भाडे रक्कम रुपये 1,812/- प्रतिदिन याप्रमाणे 02 दिवसाचे रुपये 3,624/- अदाई केली आहे. त्यामूळे रक्कम रुपये 3,624/- वसूलात आणून अनुपालन दर्शवावे.

12) प्रमाणक क्रमांक 346, दिनांक 31/03/2016 रक्कम रुपये 3,36,049/ अंतर्गत श्री अमरचंद बियाणी यांना दिनांक 05/12/2015 ते 30/03/2016 या 117 दिवस कालावधिचे टँकर भाडे प्रतिदिन रुपये 1,812/- प्रमाणे रुपये 2,12,004/- देय ठरतात. तथापि श्री बियांनी यांना 177 दिवसाचे टँकर भाडे दिलेने 60 दिवसाचे प्रतिदिन रुपये 1,812/- प्रमाणे रुपये 1,08,720/- चे ज्यादा प्रदान झालेले आहे.